सोलापूर
SOLAPUR TARUN BHARAT
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित

सोलापूर | शनिवार, ३ जानेवारी २०२६ | युगाब्द ५१२७ | वर्ष ४२ वे अंक ३८ | पाने १२ | किंमत रु. ६/-

| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |
ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

# महापालिका निवडणुकीला गालबोट; मनसे पदाधिकाऱ्याचा खून?

- तिकीट वाटपावरुन झाला राडा
- 'भाजपा'तील दोन गटात धुमश्चक्री
- 'मनसे'च्या जिल्हाध्यक्षांचा गंभीर आरोप

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२ जानेवारी-**

सोलापूर महानगरपालिका निवडणुकीच्या अनुषंगाने सत्ताधारी व विरोधी पक्षात अहमहमिका लागली आहे. पक्षातंर्गत वादावादीही विकोपाला जात आहे. हे कमी म्हणून की काय, यंदाच्या निवडणुकीला खूनाचे गालबोट लागले असून तिकीट वाटपावरुन प्रचंड राडा झाला. शुक्रवार, दि.२ जानेवारी २०२६ रोजी 'भाजपा'तील दोन गटात धुमश्चक्री उडाली. प्रभाग क्रमांक २ मधील जोशी गल्ली येथील एका तरुणाचा मृत्यू झाल्यानंतर त्याचा खून झाल्याचा आरोप मनसे जिल्हाध्यक्षासह नातेवाईकांनी केला आहे. बाळासाहेब सरवदे असे मृताचे नाव आहे. बाळासाहेब सरवदे हे महाराष्ट्र नवनिर्माण विद्यार्थी सेनेचे शहराध्यक्ष बाळासाहेब सरवदे यांच्या काकू रेखा सरवदे यादेखील 'भाजपा'कडून निवडणूक लढविण्यासाठी




युवक सेनेचे शहराध्यक्ष असून 'भाजपा'च्या राड्यात त्यांचा नाहक बळी गेला, असा गंभीर आरोप 'मनसे'चे जिल्हाध्यक्ष प्रशांत इंगळे यांनी केला.

याबाबतचे वृत्त असे की, प्रभाग क्रमांक २ मध्ये भाजपाकडून आमदार पुत्र डॉ. किरण देशमुख, नारायण बनसोडे, कल्पना कारभारी व शालन शिंदे यांना उमेदवारी देण्यात आली. मनसे इच्छुक होत्या. परंतु त्यांच्याऐवजी शालन शिंदे यांना भाजपाची उमेदवारी मिळाल्याने रेखा सरवदे या 'बंडखोरी'च्या पवित्र्यात होत्या. समाजात तणाव नको या उद्देशाने आणि काकूला तिकीट नाकारण्यामागचे कारण विचारण्यासाठी बाळासाहेब सरवदे हे शंकर शिंदे यांच्या संपर्क कार्यालयात गेले होते. त्यावेळी शिंदे व सरवदे समर्थकांमध्ये बाचाबाची आणि शिंदे यांच्या संपर्क कार्यालयाची तोडफोड झाली. आणि बघता बघता या घटनेला हिंसक वळण लागले. बाळासाहेब सरवदे यांच्यावर प्राणघातक हल्ला करण्यात आला. यात इतर काहीजण जखमी झाले आहेत. बाळासाहेब सरवदे आणि जखमींना श्री मार्कंडेय सोलापूर सहकारी रुग्णालय येथे उपचारासाठी आणण्यात आले. मात्र, उपचारादरम्यान बाळासाहेब सरवदे यांचा मृत्यू झाल्याचे डॉक्टरांकडून सांगण्यात आले. ही बातमी शहरभर वाऱ्यासारखी पसरताच बघ्यांनी घटनास्थळ व रुग्णालय येथे एकच गर्दी केली. याप्रकरणात भाजपा आमदार आणि माजी नगरसेवक यांच्यावरही मनसेकडून आरोप करण्यात आले आहेत.

(उर्वरित वृत्त पान २ वर)

# ५३० बंडोबा थंडावले; नेत्यांची धावपळ

- सोलापूर महापालिका निवडणूक
- नाट्यमय घडामोडी; भावना उफाळल्या
- कमळासाठी माघार, पण डोळ्यांत अश्रू
- ७०० जण रिंगणात, ५३० जणांची माघार
- आज होणार चिन्हांचे वाटप




**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२ जानेवारी-**

सोलापूर महापालिका सार्वत्रिक निवडणुकीसाठी शुक्रवारी अर्ज मागे घेण्याच्या शेवटच्या दिवशी नॉर्थकोर्ट परिसरात नाट्यमय घडामोडी घडत राजकीय वातावरण तापले होते. विविध पक्षांचे प्रमुख नेते, पदाधिकारी आणि कार्यकर्ते निवडणूक कार्यालय परिसरात तळ ठोकून होते. बंडखोरी रोखण्यासाठी, नाराज उमेदवारांची समजूत काढण्यासाठी आणि शेवटच्या क्षणी तोडगे काढण्यासाठी सर्वच पक्षांकडून जोरदार प्रयत्न झाले. बंडखोरी शमविण्यासाठी नेत्यांची धावपळ दिसून आली.

भाजपमध्ये कमळासाठी माघार, पण डोळ्यांत अश्रू असे चित्र पाहायला मिळाले. महापालिका निवडणुकीसाठी २३ ते ३० डिसेंबर २०२५ या कालावधीत अर्ज विक्री व स्वीकृती प्रक्रिया राबविण्यात आली होती. या कालावधीत ४ हजार २० नामनिर्देशन अर्जांची विक्री झाली. एकूण १४६० उमेदवारी अर्ज दाखल झाले. प्राप्त अर्जांची बुधवारी छाननी करण्यात आली. यात २३० अर्ज बाद झाले. तर १ हजार २३० अर्ज वैध ठरले.

महापालिकेच्या २६ प्रभागातील एकूण १०२ जागांवर निवडणूक लागली आहे. या निवडणुकीत ५३० जणांनी माघार घेतली असून आता ७०० जण निवडणुकीच्या रिंगणात आहेत. दरम्यान, 'कमळ' हाच आपला खरा उमेदवार आहे, या भावनेतून भाजपातील काही इच्छुकांनी उमेदवारी माघार घेतली. यावेळी 'नॉर्थकोट'मध्ये कार्यकर्त्यांच्या भावना उफाळून आल्या होत्या. अनेकांना अश्रु आवरता आले नाही. अर्ज माघारीची वेळ संपण्याच्या सुमारास काही ठिकाणी वादावादीचे प्रसंग घडले.

(उर्वरित वृत्त पान २ वर)

### शिवसेनेच्या कुमुद अंकाराम यांना भाजपा आ.देवेंद्र कोठेंनी अर्ज माघार घ्यायला लावले

भाजपचे आमदार देवेंद्र कोठे यांच्या आत्या तथा माजी नगरसेविका कुमुद अंकारम ह्या शिवसेनेकडून उमेदवारी अर्ज दाखल केल्या होत्या. मात्र, आमदार देवेंद्र कोठे हे आपल्या आत्यांना घेवून नॉर्थकोर्ट प्रशाला येथे आले आणि त्यांना उमेदवारी अर्ज माघार घ्यायला लावले. आ.देवेंद्र कोठे म्हणाले, कुमुद अंकाराम ह्या माझ्या आत्या आहेत. त्यांना भाजपकडून उमेदवारी देण्यात मी कमी पडलो. मात्र मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी आदेश दिले. त्यानुसार मी आत्यांना विनंती केली असता त्यांनी अर्ज मागे घेतला.

सोलापूर
SOLAPUR TARUN BHARAT
तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा

'सोलापूर तरुण भारतची दिनदर्शिका सांगे भविष्याची दिशा'

- नव्या वर्षाची नवी कोरी दिनदर्शिका
- वर्षभर संग्रही राहील अशा वाचनीय मजकुरासह २४ पानांची रंगीत दिनदर्शिका
- प्रत्येक तारखेचा बारीक-सारिक तपशील
- तिथी वार, नक्षत्र, बारा राशींचे भविष्य
- संकष्टी चतुर्थी, गावोगावचे चंद्रोदय
- आरोग्य विषय व बारा ज्योतिर्लिंग माहितीसह भरगच्च मजकूर

आजच आपल्या दिनदर्शिकेची अंक वितरकाकडे नोंदणी करा.

2026




नोंदणीसाठी संपर्क : 8888847267




# सन २०२५ ला निरोप अन् २६ चे स्वागत वादावादीतच!

## ● महापालिका निवडणुकीमुळे तापले वातावरण; तोडफोड, हाणामारी, हत्येच्या प्रकाराने गालबोट; विकासाच्या गप्पा मारणारे बेशिस्त

**तभा वृत्तसेवा । सोलापूर, दि. २ जानेवारी-**


**एकेकाळी दंगलीचे शहर म्हणून ओळखल्या जाणारे सोलापूर गेल्या काही वर्षात शांतीप्रिय तर आहेच पण मुख्यमंत्री फडणवीसांमुळे विकासाच्या मार्गावर धावत आहे. परंतु महापालिका निवडणुकीचे वातावरण तापल्यामुळे सरलेल्या सन २०२५ ला निरोप आणि २०२६ चे स्वागत देखील वादावादीतच गेले. महापालिका निवडणुकीला सोलापुरात गालबोट लागल्याचे चित्र आहे. ३० डिसेंबरला उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या शेवटच्या दिवशी आणि ३१ डिसेंबरला अर्ज छाननीप्रसंगी राजकारण्यांमधील वादावादी टोकाला पोहचल्याचे सोलापूरकरांनी पाहिले. १ आणि २ जानेवारी या अर्ज माघारीच्या दिवशी तर इच्छुक उमेदवारांमध्ये हाणामारी, कार्यालयाची तोडफोड आणि मनसे पदाधिकाऱ्यांच्या मृत्यूनंतर करण्यात आलेल्या हत्येच्या आरोपाने सोलापूरचे राजकीय वातावरण खूपच तापले आहे. सर्वच राजकीय पक्षांना बेशिस्तीचे ग्रहण लागले आहे. राजकीय पक्ष आणि त्यांच्या नेत्यांवर आत्मपरीक्षण करण्याची वेळ आली आहे. तर मतदारांनी डोळस होवून कर्तव्य बजावणे ही आता काळाची गरज बनली आहे.**




राज्यातील विविध पक्षाच्या नेत्यांनी सत्तेसाठी केलेले राजकारण आणि पक्ष फोडून सत्तेत मिळवलेला वाटा पाहून कार्यकर्ते देखील त्याच वाटेवर जाताना दिसत आहेत. महापालिकेच्या निवडणुकांचा कार्यक्रम असा जाहीर झाला आहे की, सन २०२५ ची अखेर आणि २०२६ शुभारंभच या निवडणुकीच्या धामधुमीत झाला आहे. लोक आनंदाने सरत्या वर्षाला निरोप देतात आणि उत्साहाने नूतन वर्षाचे स्वागत करतात पण महापालिका निवडणुकीच्या रणधुमाळीमुळे सरत्या वर्षाला निरोप आणि नूतन वर्षाचे स्वागत राजकीय वादावादी, हाणामारी, तोडफोड आणि कहर म्हणजे राजकीय कार्यकर्त्यांच्या मृत्यूनंतर झालेल्या हत्येच्या आरोपामुळे नूतन वर्षाच्या स्वागतासह महापालिका निवडणुकीला गालबोट लागल्याने सोलापूरकर नाराजी व्यक्त करीत आहेत. सोलापूरच्या विकासासाठी हजारोंच्या संख्येने निवडणुकीच्या मैदानात उतरलेल्यांचे वर्तन, वादावादी, बेशिस्त पाहता ही मंडळी खरंच करणार का सोलापूरचा विकास? अशी शंका मतदारांना येणे साहजिक आहे. आपले नेते सत्ता आणि स्वार्थासाठी पक्ष बदलतात.

मग आपण केले तर काय होते, असे म्हणत कार्यकर्ते देखील सैरभैर झाले आहेत. राजकीय पक्षांना नैतिकता, तत्वे उरलीत की नाही ही शंका कार्यकर्ते आपल्या वर्तणुकीतून खरी ठरवित असल्याचे नागरिक बोलत आहेत. सोलापूरकरांना गेल्या अनेक वर्षांपासून आठवड्यातून एकदा पाणीपुरवठा होतो. विशेष म्हणजे, उजनी धरणात शंभर टक्के पाणीसाठा असतानाही महापालिका प्रशासन सुरळीत पाणीपुरवठा करू शकत नाही. प्रशासन जसे याबाबत निष्क्रिय आहे तसे त्यांच्यावर अंकुश ठेवणारे नगरसेवक देखील सक्षम नसल्याचेच सिध्द होत आहे. शहरातील दोन उड्डाणपूलांच्या भूसंपादनासाठी दहा वर्षांपेक्षाही जास्तीचा कालावधी लोटला. पण या कामाला काही सुरुवात होत नाही. शहरातील वाहतुकीची समस्या दैनंदिन वाढते आहे. शहरातील बहुतांश रस्त्यांची दुर्दशा आहे. शहरात मोठ्या प्रमाणावर अनधिकृत बांधकामे, अतिक्रमणे फोफावली असून त्याकडे प्रशासनाचे तर दुर्लक्षच पण लोकप्रतिनिधीही मौन बाळगून आहेत. महापालिकेच्या अधिकाऱ्यांनीच बोगस बांधकाम परवाना देण्याची समांतर प्रशासकीय यंत्रणा राबविली, अशा अनेक समस्या आणि भ्रष्टाचाराने बरबटलेल्या महापालिकेत येण्यासाठी धडपडणाऱ्यांकडे विकासाची दूरदृष्टी किती आहे हेदेखील मतदारांनी पाहणे गरजेचे आहे. कारण यापूर्वी अनेक वर्षे महापालिकेत नगरसेवक असणारे यंदाही निवडणुकीच्या मैदानात आहेत. मग त्यांनी यापूर्वी सोलापूरचा विकास सक्षमपणे का केला नाही, अशीही शंका उपस्थित होणे साहजिक आहे.

सोलापूर महापालिकेच्या निवडणुकीत यंदा वादाचे राजकारण रंगणार अशी चर्चा जाणकार व्यक्त करीत होते. निवडणूक आयोगाच्या प्रशासनाचा गलथान कारभार देखील वादाच्या प्रकाराला




कुठे तरी कारणीभूत असल्याचे लोक बोलू लागले आहेत. किमान निवडणुकीच्या कालावधीत तर प्रशासनाने निष्पक्षपाती कारभार करुन महापालिकेला चांगले कारभारी मिळतील यासाठी घटनेचे पालन करणे अपेक्षित आहे. परंतु असे होत नसल्यामुळे कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न देखील निर्माण होत असल्याचे जाणवते आहे. सर्वच प्रशासनाने आणि प्रशासन प्रमुखांनी कोणत्याही दबावाला बळी न पडता नियमांचे काटेकोरपणे पालन करुन कायदा सर्वांसाठी समान असतो, हे दाखवून दिल्यास सामान्यांसह सर्वांचाच प्रशासनावरील विश्वास वाढणार आहे.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका २०१७ साली झालेल्या होत्या. २०२२ साली महापालिकेची पंचवार्षिक मुदत संपल्यानंतर ओबीसी आरक्षणाचा मुद्दा न्यायप्रविष्ठ झाला अन् या निवडणुका जवळपास तीन वर्षे लांबल्या. तीन वर्षांच्या कालावधीत सर्वच महापालिका, जिल्हा परिषदा, नगरपालिका आदींवर शासनाने प्रशासक नियुक्त केले. यामुळे प्रशासन आणि नागरिक यांच्यातील दुआ असणारा नगरसेवक, मेंबर तीन वर्षे नसल्यामुळे लोकांना नागरी समस्यांना तोंड द्यावे लागले. कारण शासनाचे प्रशासन सामान्य नागरिकांशी कसे वागते हे सांगण्यासाठी कोण्या ज्योतिषाची गरज नाही. खासदार, आमदारकीच्या निवडणुका पार पडल्यानंतर अपेक्षेप्रमाणे स्थानिक स्वराज्य संस्थांचा बिगुल वाजला. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका या प्रामुख्याने कार्यकर्त्यांच्या निवडणुका म्हणून ओळखल्या जातात. तीन वर्षांपासून कार्यकर्ते या निवडणुकांची आतुरतेने वाट पहात होते. तर मागील काही वर्षात महाराष्ट्राच्या राजकारणात झालेले खळबळजनक बदल आणि युती-आघाड्या पाहून कार्यकर्त्यांनाही कधी एकदा लोकप्रतिनिधी म्हणून राजकारणात सक्रीय होतो, असे झाले होते. सत्तेतून पैसा आणि पैशातून सत्ता हे राजकीय समीकरण सर्वदूर आणि सर्वच निवडणुकांमध्ये साथरोगाप्रमाणे पसरल्यामुळे जनसेवेसाठी आसुसलेल्यांची निवडणुकीच्या मैदानात उतरण्याची गर्दी यंदा डोळे दिपवणारी आहे. शहराच्या विकासासाठी इच्छुकांची तळमळ, पक्षनिष्ठा पणाला लावणारी असल्याचे दिसून येत आहे. विकास या गोंडस नावाखाली कोण, कोणत्याही पक्षात कधीही प्रवेश करून उमेदवारी मिळविण्यासाठी करत असलेली धडपड पाहता निवडणुका संपताच सोलापूरचा झपाट्याने विकास होईल, यात मतदारांनाही शंका नसावी.

### निवडणुकानंतर जाहीरनामे जातात बासनात तर नेते म्हणतात हे तर चुनावी जुमले...

महापालिका निवडणुकीसाठी इलेक्टिव्ह मेरिट पाहून उमेदवारांना मैदानात उतरविण्यासाठी धडपड करणाऱ्या राजकीय पक्षांकडून अद्याप सोलापूरच्या विकासासाठी पक्षाचा जाहीरनामा प्रसिध्द करण्याबाबत काहीच सूतोवाच होताना दिसत नाही. जाहीरनाम्यात मोठ्या गप्पा मारल्या जातात, स्वप्ने दाखवली जातात. पण निवडणूकीनंतर मात्र जाहीरनाम बासनात जातात. इतकेच काय तर नेते उघडपणे म्हणतात, पक्षाचे निवडणूक जाहीरनामे म्हणजे चुनावी जुमले असतात. महापालिका निवडणुकीला उभारण्यासाठी सोलापूरचा विकास यावर निबंध किती जणांनी लिहिलाय हे देखील उघड करणे गरजेचे आहे. सोलापूरची हद्द किती, सोलापुरात पाण्याच्या टाक्या किती, शहराला कुठून आणि कसा पाणीपुरवठा होतो, शहरात किती उद्याने आणि त्याची दशा काय, बीपीएमसी ॲक्टची माहिती किती जणांना आहे. महापालिकेची सभा कशी चालते हे देखील अनेकांना माहिती नसेल. पण नगरसेवक मात्र व्हायचे हे नक्की.

---


### विचारपुष्प



नि संस्कारांना संक्रमित करण्यात भजन-कीर्तनाचे योगदान महत्त्वपूर्ण आहे. श्रीकृष्ण चैतन्य महाप्रभूंच्याद्वारे पूर्वोत्तर भारतात पेरलेल्या आस्थेचा चमत्कार सर्व जाणतातच. मोगलकालीन महाराष्ट्रात तुकारामांसारख्या संतांनी भजन-कीर्तनाच्या माध्यमातून केलेले प्रज्वलित नवजागरण नवोन्मेष उत्पन्न करणारे होते.

**- रंगा हरी**
रा. स्व. संघाचे पूर्व अ. भा. बौद्धिक प्रमुख

### विनम्र अभिवादन



राजमाता जिजाऊ माँसाहेब भोसले यांची तिथीप्रमाणे आज जयंती



क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांची आज जयंती

### बाजारात परतली तेजी

मुंबई : आठवड्याच्या शेवटच्या दिवशी भारतीय शेअर बाजारात जोरदार तेजी पाहायला मिळाली. जागतिक बाजारातून मिळालेल्या सकारात्मक संकेतांमुळे आणि लार्ज कॅप शेअर्समध्ये पुन्हा खरेदी वाढल्याने निर्देशांक आणि निफ्टी दोन्हींमध्ये तेजीचे वातावरण होते. दिवसअखेर निर्देशांक ५७३ अंकांनी वाढून ८५,७६२ वर बंद झाला तर निफ्टी १८२ अंकांच्या वाढीसह २६,३२८ वर पोहोचला.

---

# महाराष्ट्रात फक्त मराठीचीच सक्ती

## ● मुख्यमंत्र्यांची सारस्वतांच्या मेळ्यात स्पष्टोक्ती ● साहित्य संमेलनाचे थाटात उद्घाटन






सातारा येथील ९९ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे उद्घाटन करताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस. यावेळी उपस्थित संमेलनाध्यक्ष 'पानिपत'कार विश्वास पाटील आणि मान्यवर

◆ **सातारा, २ जानेवारी**

महाराष्ट्रात फक्त आणि फक्त मराठीचीच सक्ती आहे. इतर कोणत्याही भाषेची सक्ती नाही. पण इंग्रजी, फ्रेंच व स्पॅनिशसारख्या परदेशी भाषांना पायघड्या घालायच्या आणि इतर भारतीय भाषांना विरोध करायचा हे योग्य नाही. सर्व भाषांचा सन्मान झाला पाहिजे. पण मातृभाषेचा सन्मान त्याहून अधिक झाला पाहिजे, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

साताऱ्यात अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. मुख्यमंत्री म्हणाले, आता नुकताच या ठिकाणी मावळत्या संमेलन अध्यक्षांनी नव्या अध्यक्षांना पदभार सोपवला. किती चांगला हा कार्यक्रम झाला. त्यांनी यांच्या हाती राज्य सोपवले. त्यांनी ते स्वीकारले. सर्वांनी टाळ्या वाजवल्या. असे राजकारणातही झाले तर किती चांगले होईल. किमान साहित्य क्षेत्रात तरी अजून होत आहे ही चांगली गोष्ट आहे. हे असेच होत राहावे, अशी माझी अपेक्षा आहे.

अध्यात्म, तत्त्वज्ञान व सामाजिक जीवनात संगम हेच आपल्या संस्कृतीचे ब्रीदवाक्य राहिले आहे. त्यामुळे जगातील जेवढी आक्रमणे झालीत, ती सगळी आक्रमणे पचवत त्या संस्कृतीतील जे चांगले आहे, ते या ठिकाणी अनुसरून आपली संस्कृती अबाधित ठेवण्याचे काम केले. ज्या प्रकारे कोयना कृष्णेस मिळते, वारणा कृष्णेस मिळते, यमुना गंगेत मिळते अशा वेगवेगळ्या नद्या मिळून शेवटी एका नदीचे पात्र तयार होते. त्याच प्रकारे विचारांची आपली संस्कृती ती त्या एका नदीसारखी आहे. त्यात विविध प्रकारचे (पान ५ वर)

### पाटील, कुलकर्ण्यांना युती करावीच लागते

#### संमेलनाध्यक्ष विश्वास पाटील

◆ **सातारा, २ जानेवारी**

मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष विश्वास पाटील यांनी बिघडलेले गाव सुधारण्यासाठी पाटील आणि कुलकर्ण्यांना युती करावीच लागते असे विधान करून एका वेगळ्याच सामाजिक चर्चेचा बार उडवून दिला आहे.

मराठी साहित्य संमेलनाचा अध्यक्ष एका पाटलाला करा, अशी मागणी कुलकर्णी व जोशींनी केली. त्यामुळे बिघडलेले गाव सुधारायचे असेल तर पाटील व कुलकर्ण्यांना युती करावीच लागते, असे ते म्हणाले. त्यांच्या या विधानाची साहित्य व राजकीय वर्तुळात खमंग चर्चा रंगली आहे. विश्वास पाटलांनी यावेळी अण्णाभाऊ साठे यांचा भारतरत्न या देशाच्या सर्वोच्च नागरी पुरस्काराने सन्मान करण्याचीही मागणी केली.

साताराच्या ९९ व्या साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदासाठी आपण एका पाटलाला बोलावले आहे. पाटील हे आडनाव घेतले की तीन फड डोळ्यापुढे उभे राहतात. कुस्तीचा फड, तमाशाचा फड व उसाचा फड. पण तुमच्यासमोर बोलणारा हा पाटील फक्त शब्दांच्या फडामध्ये रमणारा आहे. येथे ९९ व्या साहित्य संमेलनाचा अध्यक्ष एका पाटलाला करा अशी मागणी जोशी व कुलकर्णींनी केली. तुम्हाला माहिती आहे की बिघडलेले गाव सुधारायचे असेल तर पाटील व कुलकर्ण्यांना युती करावीच लागते. ही आपली जुनी वहिवाट आहे, असे ते म्हणाले. *(वृत्तसंस्था)*

### किडनी विक्री प्रकरण

### आरोपी गुरुवारीच न्यायालयात हजर

◆ **चंद्रपूर, २ जानेवारी**

किडनी विक्री प्रकरणातील दिल्लीतील आरोपी डॉक्टर रवींद्रपाल सिंह याला २ जानेवारीला चंद्रपूर जिल्हा न्यायालयात हजर होण्याचा आदेश होता. मात्र, तो १ जानेवारीलाच हजर झाला. त्याने अटकपूर्व जामिनासाठी अर्ज केला आणि निघूनही गेला. त्याच्या अर्जावर ३ जानेवारीला सुनावणी होणार आहे. अटकपूर्व जामीन मिळू नये म्हणून पोलिस प्रयत्न करणार आहेत. मात्र, गुरुवारी आरोपी चंद्रपुरात येऊन गेला, त्याची भनकही पोलिसांना लागली नाही.

**पोलिसांना भनकही लागली नाही**

दिल्ली न्यायालयाने आरोपीला २ जानेवारीपर्यंत चंद्रपूर न्यायालयात हजर राहण्याचा आदेश दिला होता. त्यानुसार, १ जानेवारी रोजी तो चंद्रपूरच्या न्यायालयात हजर झाला. आता चंद्रपूर न्यायालयात ३ जानेवारी रोजी सुनावणी होणार असल्याची माहिती आहे. दिल्ली आणि तामिळनाडूतील डॉक्टरांच्या सहभागानंतर पोलिस पथकाने २९ डिसेंबर रोजी डॉक्टर सिंहला दिल्लीत ताब्यात घेतले होते. *(तभा वृत्तसेवा)*

---

### 'लोकांचा ईव्हीएमवर विश्वास'

नवी दिल्ली : काँग्रेस मागील काही दिवसांपासून ईव्हीएम मशीनबाबत वेगवेगळे दावे करत आहे. खासदार राहुल गांधींनीही यावरून निवडणूक आयोगावर आरोप केले आहे. ईव्हीएम मशीनबाबत कर्नाटक सरकारने एक अधिकृत सर्व्हे केला आहे. या सर्व्हेमध्ये ईव्हीएमवरील प्रश्नाला नवीन वळण दिले आहे. सर्व्हे क्षणानुसार, कर्नाटकातील जनतेचा एक मोठा वर्ग ईव्हीएम सुरक्षित आणि अचूक मानतो. या निकालांनंतर, राहुल गांधी यांच्या मत चोरीच्या आरोपांवरून भाजपाने काँग्रेसवर टीका केली.

# महायुतीचे ६५ उमेदवार विजयी

## भाजपाच्या सर्वाधिक ४४ नगरसेवकांचा समावेश

**मुंबई, २ जानेवारी -**

राज्यातील २९ महानगर पालिकेच्या निवडणुकीआधीच महायुतीचे तब्बल ६५ उमेदवार बिनविरोधी निवडून आले असून, यात सर्वाधिक ४४ भाजपाचे आहेत. तर, विरोधी पक्षाचा १ उमेदवार मालेगावमधून इस्लाम पार्टीच्या मुनिरा शेख फकीर मोहम्मद निवडून आल्या आहेत. राज्यातील २९ महानगर पालिकेतील २ हजार ८६९ पदांसाठी ३३ हजार ६०६ उमेदवारी अर्ज प्राप्त झाले होते. त्यापैकी ७ हजारांपेक्षा अधिकांनी निवडणुकीतून माघार घेतली आहे.

अर्ज माघारीनंतर राज्यातील तब्बल ६६ उमेदवार बिनविरोध निवडून आले आहेत. यात सर्वाधिक ४५ भाजपाचे असून, शिवसेनेचे १८ आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे २ अहिल्यानगर मधून निवडून आले आहेत.भाजपाचे सर्वाधिक १५ उमेदवार भाजपाचे प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांच्या कल्याण-डोंबिवली क्षेत्रातून बिनविरोध निवडून आले आहेत. त्यापाठोपाठ अहिल्यानगर, पनवेल, पुणे, जळगाव, धुळे आदी महापालिकांमध्ये महायुतीचे उमेदवार बिनविरोधी निवडून आले आहेत. नगर पालिका निवडणुकीत महाविकास आघाडीला अस्मान दाखविल्यानंतर, आता महानगर पालिका निवडणुकीच्या रणांगणात उतरण्याआधीच महायुतीने मोठी आघाडी घेतल्याने, महायुतीचा आत्मविश्वास बळावला आहे. तर, दुसरीकडे विरोधकांचे धाबे दणाणले असून, विरोधी खेम्यात स्मशानशांतता पसरलेली दिसत आहे.

## पान १ वरुन

### ....जोशी गल्लीत एकाचा खून

दरम्यान, आजच्या घटनेने 'भाजपा'मधील अंतर्गत चव्हाट्यावर आला आहे. प्रभाग क्रमांक २ मधील 'भाजपा'च्या चारही जागा बिनविरोध करण्यासाठी मोठा दबाव आणला जात होता, असा आरोपही 'मनसे'चे जिल्हाध्यक्ष प्रशांत इंगळे यांनी माध्यमांशी बोलताना केला.

### ...बंडखोरी शमविण्यासाठी नेत्यांची धावपळ

परिस्थिती चिघळू नये म्हणून पोलिसांनी तात्काळ हस्तक्षेप करत परिस्थिती नियंत्रणात आणली. काही प्रभागांमध्ये उमेदवारांची संख्या कमी असल्याने त्या प्रभागाची निवडणूक बिनविरोध करण्याच्या उद्देशाने भाजपने प्रयत्न केले मात्र ते अपयशी ठरले.

**-आज होणार निवडणूक चिन्ह वाटप :** सोलापूर महापालिका सार्वत्रिक निवडणुकीसाठी अर्ज देणे व स्वीकारण्याची प्रक्रिया २३ ते ३० डिसेंबर २०२५ दरम्यान पार पडली. बुधवार, दि. ३१ डिसेंबर २०२५ रोजी अर्जांची छाननी व वैध उमेदवारांची यादी प्रसिध्द करण्यात आली. अर्ज मागे घेण्यासाठी शुक्रवार, दि.२ जानेवारी २०२६ पर्यंत मुदत होती. शनिवार, दि.३ जानेवारी रोजी निवडणूक चिन्ह वाटप आणि अंतिम यादी प्रसिध्द करण्यात येणार आहे. गुरुवार, दि.१५ जानेवारी रोजी मतदान तर शुक्रवार, १६ जानेवारी २०२६ रोजी मतमोजणी होणार आहे.

**-पांडुरंग दिड्डी, प्रभाकर जामगुंडे यांचीही माघार :** भाजपातील अभ्यासू, अनुभवी, ज्येष्ठ नेते म्हणून परिचित असलेले माजी विरोधी पक्षनेते पांडुरंग दिड्डी, प्रभाकर जामगुंडे या दोघांनीही पक्षाचे आदेश शिरसांवद्य मानून आपापले उमेदवारी अर्ज मागे घेतले. अनेक वर्ष पक्षाशी एकनिष्ठ राहिलो. पक्षाने इतर नवीन उमेदवारास संधी दिली. त्यांना निवडून आणण्याकामी कसोशीने प्रयत्न करणार असल्याने दिड्डी व जामगुंडे यांनी सांगितले.

**-जगदीश पाटील यांना अश्रू अनावर :** भाजपाचे माजी नगरसेवक जगदीश पाटील यांनीही आपला उमेदवारी अर्ज अखेर मागे घेतला.



यावेळी पत्रकारांशी बोलताना ते म्हणाले, गेल्या ४० वर्षापासून एकनिष्ठपणे मी भाजपाशी जोडून आहे. मात्र उमेदवारी न मिळाल्याने पक्षासाठी मी अर्ज माघारी घेतला. अन्याय झाला का? असे विचारताच ते भावनिक झाले. त्यांना अश्रू अनावर झाले होते.

**-अन् बिनविरोधची शक्यता झाली धुसर :** सोलापूर महापालिकेच्या निवडणुकीसाठी काही प्रभागांमधील जागांवर भाजपाबरोबर अपक्ष तीन चार उमेदवार यांचा भरणा तर काही ठिकाणी महाआघाडीच्या नियोजन चुकलेल्या प्रकारामुळे त्याठिकाणी इतर कोणतेही पक्ष नसल्याने अशा ठिकाणी भाजपा उमेदवार बिनविरोध निवडून आणण्याचा प्रयत्न झाला. मात्र तो अयशस्वी ठरला. आता सर्व जागांवर निवडणूक होणार आहे.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# सोलापूर महापालिका निवडणूक २०२६ : पक्षनिहाय उमेदवारांची नावे

| प्रभाग १ अ. (अनुसुचित जाती) | |
|---|---|
| भाजप | गौतम कसबे |
| राष्ट्रवादी | सुजीत अवघडे |
| ठाकरे गट | रमेश व्हटकर |
| वंचित | रवींद्र गायकवाड |
| बीएसपी | बबलू गायकवाड |

| १ ब ( ओबीसी महिला) | |
|---|---|
| भाजप | राजश्री कणके |
| राष्ट्रवादी | नंदा कांगरे |
| ठाकरे गट | आरती वीटकर |
| वंचित | किरण रुपनर |
| बीएसपी | शहनाज मोमीन |

| १ क (सर्वसाधारण महिला) : | |
|---|---|
| भाजप | पूजा काशीद |
| शिवसेना | सपना कोळी |
| कॉंग्रेस | शुभांगी जाबा |
| राष्ट्रवादी | शुभांगी कळंब |
| वंचित | शिलवंता गायकवाड |
| बीएसपी | भगीरथी शिंदे |

| १ ड (सर्वसाधारण ) | |
|---|---|
| भाजप | अविनाश पाटील |
| शिवसेना | संजय सरवदे |
| राष्ट्रवादी | सिध्दाराम आनंदकर |
| राष्ट्रवादी | राकेश सोनी |
| वंचित | सुहास सावंत |

| प्रभाग २ अ. (अनुसुचित जाती ) | |
|---|---|
| भाजप | नारायण बनसोडे |
| ठाकरे गट | प्रशांत कावळे |
| राष्ट्रवादी | नीलेश होटकर |

| २ ब (ओबीसी महिला) | |
|---|---|
| भाजप | कल्पना कारभारी |
| मनसे | संध्या भोसले |

| २ क (सर्वसाधारण महिला) | |
|---|---|
| भाजप | शालन शिंदे |
| शिवसेना | आफ्रिन पठाण |

| २ ड (सर्वसाधारण) | |
|---|---|
| भाजप | डॉ.किरण देशमुख |
| शिवसेना | गणेश कुलकर्णी |
| राष्ट्रवादी | मुस्ताक पटेल |
| ठाकरे | दिनेश चव्हाण |

| प्रभाग ३ अ (ओबीसी ) | |
|---|---|
| भाजप | राजू पाटील |
| शिवसेना | सुरेश बिद्री |
| कॉंग्रेस | रोहित कारमपुरी |

| ३ ब (सर्वसाधारण महिला) | |
|---|---|
| भाजप | स्वाती बडगु |
| शिवसेना | उर्वशी पाटील |
| कॉंग्रेस | महानंदा शिरसीकर |

| ३ क (सर्वसाधारण महिला) | |
|---|---|
| भाजप | रंजिता चाकोते |
| कॉंग्रेस | रमाबाई पांडगळे |

| ३ ड(सर्वसाधारण) | |
|---|---|
| भाजप | संजय कोळी |
| शिवसेना | सुरेश पाटील |
| कॉंग्रेस | सिध्दाराम चाकोते |
| आप | जुबेर पटेल |

| प्रभाग ४ अ (अनुसुचित जाती) | |
|---|---|
| भाजप | वंदना गायकवाड |
| कॉंग्रेस | संघमित्रा चौधरी |
| राष्ट्रवादी | कविता चंदनशिवे |
| वंचित | पल्लवी सुरवसे |
| बीएसपी | सुरेखा बाळशंकर |

| ४ ब (ओबीसी) | |
|---|---|
| भाजप | विनायक विटकर |
| राष्ट्रवादी | सुशील बंदपट्टे |
| वंचित | मल्लिकार्जुन हिरेमठ |

| ४ क (सर्वसाधारण महिला) | |
|---|---|
| भाजप | ऐश्वर्या साखरे |
| राष्ट्रवादी | सारिका फुटाणे |
| ठाकरे गट | प्रिया बसवंती |
| बीएसपी | रेश्मा मुल्ला |
| वंचित | पूजा धोत्रे |

| ४ ड (सर्वसाधारण) : | |
|---|---|
| भाजप | अनंत जाधव |
| राष्ट्रवादी | विश्वनाथ बिडवे |
| वंचित | धम्मपाल इंगळे |
| रासप | देवेंद्र लोंढे |

| प्रभाग ५ अ (अनुसुचित जाती) | |
|---|---|
| भाजप | समाधान आवळे |
| राष्ट्रवादी (अप) | आनंद चंदनशिवे |
| कॉंग्रेस | प्रणा बंगाळे |
| वंचित | नागेश पाटोळे |
| रिपाइं | शिवम सोनकांबळे |
| बीएसपी | चंद्रशेखर उघडे |

| प्रभाग ५ ब ( ओबीसी महिला) | |
|---|---|
| भाजप | अलका भंवर |
| राष्ट्रवादी | भाग्यश्री काळे |
| राष्ट्रवादी (शप) | संपदा खांडेकर |
| बीएसपी | दर्शना दुगाणे |
| रिपाइं | अर्चना राजपूत |

| प्रभाग ५ क ( सर्वसाधारण महिला) | |
|---|---|
| भाजप | मंदाकिनी तोडकरी |
| राष्ट्रवादी | महादेवी रणदिवे |
| ठाकरे गट | अनुजा तोडकरी |
| बीएसपी | प्रज्ञा लोंढे |
| रिपाइं | माधवी काळे |
| वंचित | पौर्णिमा हरिजन |

| प्रभाग ५ ड ( सर्वसाधारण) | |
|---|---|
| भाजप | बिज्जू प्रधाने |
| राष्ट्रवादी | गणेश पुजारी |
| बसपा | महेश मुंडदा |
| ठाकरे गट | परमेश्वर सावंत |
| रिपाइं | सुजित कोकरे |

| प्रभाग ६ अ (अनुसुचित जाती महिला) | |
|---|---|
| भाजप | सोनाली गायकवाड |
| शिवसेना | अनिता गवळी |
| वंचित | रेणुका शिराळकर |

| प्रभाग ६ ब (ओबीसी) | |
|---|---|
| भाजप | सुनील खटके |
| शिवसेना | हर्षल गायकवाड |
| बसपा | भाग्यश्री पांढरे |
| आप | अमोल पूदे |

| प्रभाग ६ क (सर्वसाधारण महिला) | |
|---|---|
| भाजप | मृण्मयी गवळी |
| शिवसेना | पूजा चव्हाण |
| वंचित | कविता उघडे |

| प्रभाग ६ ड (सर्वसाधारण) | |
|---|---|
| भाजप | गणेश वानकर |
| शिवसेना | मनोज शेजवाल |
| आप | आकाश गायकवाड |

| प्रभाग ७ अ (ओबीसी) | |
|---|---|
| भाजप | आनंद कोलारकर |
| शिवसेना | अनिकेत पिसे |
| राष्ट्रवादी (शप) | सुमित भोसले |

| प्रभाग ७ ब (सर्वसाधारण महिला ) | |
|---|---|
| भाजप | श्रध्दा पवार |
| राष्ट्रवादी | मनीषा कणसे |
| राष्ट्रवादी (शप) | मनीषा माने |
| रासप | मनीषा भोसले |

| प्रभाग ७ क (सर्वसाधारण महिला) | |
|---|---|
| भाजप | उत्तरा बचुटे (बरडे) |
| राष्ट्रवादी (शप) | शीतल गादेकर |
| शिवसेना | मनोरमा सपाटे |

| प्रभाग ७ ड (सर्वसाधारण) | |
|---|---|
| भाजप | पद्माकर काळे |
| शिवसेना | अमोल शिंदे |

| प्रभाग ८ अ (ओबीसी) | |
|---|---|
| भाजप | अमर पुदाले |
| राष्ट्रवादी | उमेर सय्यद |
| राष्ट्रवादी | नकिब कुरेशी |
| एमआयएम | इम्रान हवालदार |

| ८ ब (सर्वसाधारण महिला) | |
|---|---|
| भाजप | गीता गवई |
| ठाकरे गट | मेघा बेळमकर |
| राष्ट्रवादी | उल्फत सौदागर |

| ८ क ( सर्वसाधारण महिला) | |
|---|---|
| भाजप | बबिता धुम्मा |
| कॉंग्रेस | गोदावरी मोकाशी |
| मनसे | सुषमा हिबारे |

| ८ ड ( सर्वसाधारण) | |
|---|---|
| भाजप | गौरीशंकर दर्गो पाटील |
| ठाकरे गट | शशिकांत बिराजदार |
| राष्ट्रवादी | एमएमडी मुतवल्ली |
| एमआयएम | बशीर शेख |

| प्रभाग ९ अ (ओबीसी) | |
|---|---|
| भाजप | शेखर इगे |
| कॉंग्रेस | दत्तू बंदपट्टे |
| राष्ट्रवादी | अबोली मंजेली |

| ९ ब (सर्वसाधारण महिला) | |
|---|---|
| भाजप | कादंबरी मंजेली |
| राष्ट्रवादी | लक्ष्मी बडगु |
| माकप | गीता वासम |

| ९ क (सर्वसाधारण महिला) | |
|---|---|
| भाजप | पूजा वाडेकर |
| राष्ट्रवादी | भानुप्रिया बोगा |
| माकप | अरुणा आडम |

| ९ ड (सर्वसाधारण) | |
|---|---|
| भाजप | मेघनाथ येमूल |
| राष्ट्रवादी | तुषार जक्का |
| ठाकरे गट | सुरेश गायकवाड |

| प्रभाग १० अ (ओबीसी महिला) | |
|---|---|
| भाजप | उज्ज्वला दासरी |
| अपक्ष | कुमुद अंकाराम |
| अपक्ष | अरुणा कोंडले |
| अपक्ष | श्वेता दासरी |
| अपक्ष | रुचिरा मासम |

| प्रभाग १० ब (सर्वसाधारण महिला) | |
|---|---|
| भाजप | दीपीका यलदंडी |
| कॉंग्रेस | प्रिती देवकते |
| राष्ट्रवादी | दीपाली जाधव |
| शिवसेना | कृष्णवेणी कोंडा |

| प्रभाग १० क (सर्वसाधारण) | |
|---|---|
| भाजप | सतीश सिरसिल्ला |
| राष्ट्रवादी | रुपेशकुमार भोसले |
| शिवसेना | हेमलता गायकवाड |

| प्रभाग १० ड (सर्वसाधारण) | |
|---|---|
| भाजप | प्रथमेश कोठे |
| शिवसेना | शंकर बटगिरी |

| प्रभाग ११ अ (ओबीसी) | |
|---|---|
| भाजप | युवराज सरवदे |
| राष्ट्रवादी | अहमद मोमीन |
| शिवसेना | लोकेश नंदाल |
| ठाकरे गट | शुभम स्वामी |

| प्रभाग ११ (ब) (सर्वसाधारण महिला) | |
|---|---|
| भाजप | शारदा रामपुरे |
| कॉंग्रेस | कल्पना रव्वा |
| शिवसेना | दीपीका माळी |
| राष्ट्रवादी | लक्ष्मी बनसोडे |

| ११ क (सर्वसाधारण महिला) | |
|---|---|
| भाजप | मीनाक्षी कडगंची |
| ठाकरे गट | सोनाली नवले |
| राष्ट्रवादी | रईसा शेख |

| ११ ड (सर्वसाधारण) | |
|---|---|
| भाजप | अजय पोन्नम |
| कॉंग्रेस | धोंडप्पा तोरणगी |
| राष्ट्रवादी | राजेंद्र कलंत्री |
| प्रहार | अब्बासअली यादगीर |

| प्रभाग १२ अ (ओबीसी) | |
|---|---|
| भाजप | विनायक कोंड्याल |
| शिवसेना | श्रीनिवास पोतन |
| ठाकरे गट | प्रसाद माने |

| १२ ब (सर्वसाधारण महिला) | |
|---|---|
| भाजप | सारिका खजुरगी |
| ठाकरे गट | अमिता जगदाळे |

| १२ क (सर्वसाधारण महिला) | |
|---|---|
| भाजप | अर्चना वडनाल |
| शिवसेना | स्नेहा श्रीराम |

| १२ ड (सर्वसाधारण) | |
|---|---|
| भाजप | सिध्देश्वर कमटम |
| कॉंग्रेस | मौलाली पटेल |
| शिवसेना | डॉ.राजेश अनगिरे |

| प्र.१३ अ (अनुसुचित जाती महिला) | |
|---|---|
| भाजप | सुनीता कामाठी |
| शिवसेना | गीता म्हेत्रे |
| माकप | सुषमा सरवदे |

| प्रभाग १३ ब ( ओबीसी महिला) | |
|---|---|
| भाजप | अंबिका चौगुले |
| शिवसेना | शिवम्मा बंदपट्टे |
| माकप | अनिता आडम |

| प्रभाग १३ क (सर्वसाधारण) | |
|---|---|
| भाजप | सत्यनारायण गुर्रम |
| शिवसेना | जयंत होले-पाटील |
| माकप | श्रीनिवास म्हेत्रे |

| प्रभाग १३ ड (सर्वसाधारण) | |
|---|---|
| भाजप | विजय चिप्पा |
| शिवसेना | श्रीधर आरगोंडा |
| राष्ट्रवादी | इम्रान पठाण |
| ठाकरे गट | वल्लभ चौगुले |

| प्रभाग १४ अ (ओबीसी महिला) | |
|---|---|
| भाजप | विजयलक्ष्मी कंदलगी |
| कॉंग्रेस | कुदुसिया मणियार |
| राष्ट्रवादी | नसीमा एजाज |
| एमआयएम | अकीला भागनगरी |

| प्रभाग १४ ब (ओबीसी) | |
|---|---|
| भाजप | चेतन पडवळकर |
| कॉंग्रेस | नसीम खलिफा बागवान |
| राष्ट्रवादी | सैफोद्दीन मणियार |
| एमआयएम | असिफ शेख |
| समाजवादी | राजासाहेब बागवान |
| आप | अश्पाक बागवान |

| प्रभाग १४ क (सर्वसाधारण महिला) | |
|---|---|
| भाजप | श्रध्दा साका |
| कॉंग्रेस | शहजादी बेगम बडेपीर |
| राष्ट्रवादी | सादिका शेख |
| एमआयएम | वाहिदाबानो शेख |
| महाराष्ट्र विकास आघाडी | विजया बंगाळे |

| प्रभाग १४ ड (सर्वसाधारण) | |
|---|---|
| भाजप | तुषार पवार |
| कॉंग्रेस | शोएब महागामी |
| राष्ट्रवादी | मोहम्मद कलीम बागवान |
| एमआयएम | तौफिक हत्तुरे |
| समजवादी | रियाज खरादी |
| आप | जुबेर हिरापुरे |
| अपक्ष | रफिक मोहोळकर |

| प्र. १५ अ (अनुसुचित जाती महिला) | |
|---|---|
| भाजप | श्रीदेवी फुलारे |
| कॉंग्रेस | सपना मंगिरी |
| बहुजन मुक्ती पार्टी | योगिता वाघमारे |

| प्रभाग १५ ब (ओबीसी महिला) | |
|---|---|
| भाजप | विजया खरात |
| कॉंग्रेस | कल्पना नरोटे |
| आप | मोनिका सरकार |

| प्रभाग १५ क (सर्वसाधारण) | |
|---|---|
| भाजप | विनोद भोसले |
| कॉंग्रेस | आरिफ शेख |
| राष्ट्रवादी | महेश गाडेकर |
| समाजवादी | अमजद मुजावर |
| आप | नीलेश संगेपाग |

| प्रभाग १५ ड (सर्वसाधारण) | |
|---|---|
| भाजप | अंबादास करगुळे |
| कॉंग्रेस | चेतन नरोटे |
| शिवसेना | सागर शितोळे |

| प्रभाग १६ अ (अनुसुचित जाती) | |
|---|---|
| भाजप | रतिकांत कमलापुरे |
| कॉंग्रेस | नरसिंह आसादे |
| शिवसेना | कुमार जंगडेकर |
| वंचित | दीपक गवळी |
| जनविकास क्रांती सेना | विक्रम कसबे |

| प्रभाग १६ ब ( ओबीसी महिला) | |
|---|---|
| भाजप | श्वेता खरात |
| कॉंग्रेस | बिलकिसबानू खान |
| राष्ट्रवादी | प्रीती वाडे |
| एमआयएम | मुबरा पठाण |

| प्रभाग १६ क (सर्वसाधारण महिला) | |
|---|---|
| भाजप | कल्पना कदम |
| कॉंग्रेस | सीमा यलगुलवार |
| शिवसेना | मीनाक्षी शिंदे |
| एमआयएम | फिरदोस पटेल |

| प्रभाग १६ ड (सर्वसाधारण) | |
|---|---|
| भाजप | दिलीप कोल्हे |
| कॉंग्रेस | नरसिंग कोळी |
| शिवसेना | प्रियदर्शन साठे |
| एमआयएम | गाझी जहागीरदार |
| समाजवादी | अॅड.यु.एन.बेरिया |

| प्रभाग१७ अ (अनुसुचित जाती महिला) | |
|---|---|
| भाजप | निर्मला जंगम |
| कॉंग्रेस | शुभांगी लिंगराज |
| राष्ट्रवादी | नूतन गायकवाड |
| शिवसेना | लक्ष्मी माढेकर |
| एमआयएम | माधुरी म्हेत्रे |

| प्रभाग १७ ब (ओबीसी) | |
|---|---|
| भाजप | भारतसिंग बडुरवाले |
| कॉंग्रेस | परशुराम सतारेवाले |
| राष्ट्रवादी | इब्राहिम कुरेशी |
| शिवसेना | सुमित मनसावाले |
| एमआयएम | हारिस कुरेशी |

| प्रभाग १७ क (सर्वसाधारण महिला) | |
|---|---|
| भाजप | जुगनबाई अंबेवाले |
| राष्ट्रवादी | गीता गुडूर |
| एमआयएम | यास्मिन पठाण |

| प्रभाग १७ ड (सर्वसाधारण) | |
|---|---|
| भाजप | रवी कय्यावाले |
| शिवसेना | अंबादास गोरंटला |
| राष्ट्रवादी | मोहसीना नदाफ |
| कॉंग्रेस | वाहिद विजापूरे |
| एमआयएम | जुबेर जब्बार |
| आप | मल्लिकार्जुन पिलगिरी |

| प्रभाग १८ अ ( ओबीसी महिला) | |
|---|---|
| भाजप | श्रीकांचना यन्नम |
| शिवसेना | निर्मला पासकंटी |

| प्रभाग १८ ब (सर्वसाधारण महिला) | |
|---|---|
| भाजप | राजश्री दोडमनी |
| शिवसेना | महादेवी हिटनळ्ळी |
| माकप | नलिनी कलबुर्गी |

| प्रभाग १८ क (सर्वसाधारण) | |
|---|---|
| भाजप | प्रशांत पल्ली |
| शिवसेना | संतोष संगा |
| राष्ट्रवादी (शप) | अंबादास नडगिरे |
| एमआयएम | सादिक नदाफ |

| प्रभाग १८ ड (सर्वसाधारण) | |
|---|---|
| भाजप | शिवानंद पाटील |
| कॉंग्रेस | आयाज आळंद |
| शिवसेना | सुनील निंबाळकर |
| मनसे | विशाल गुजले |

| प्रभाग १९ अ (ओबीसी महिला) | |
|---|---|
| भाजप | कविता जंगम |
| कॉंग्रेस | विजयालक्ष्मी काळपगार |
| शिवसेना | प्रियांका विटकर |

| प्रभाग १९ ब (ओबीसी) | |
|---|---|
| भाजप | व्यंकटेश कोंडी |
| शिवसेना | श्रीनिवास करली |
| ठाकरे गट | कुंदन गायकवाड |

| प्रभाग १९ क (सर्वसाधारण महिला) | |
|---|---|
| भाजप | कलावती गदगे |
| शिवसेना | सुनंदा जमादार |
| ठाकरे गट | राणी गंधुरे |

| प्रभाग १९ ड (सर्वसाधारण) | |
|---|---|
| भाजप | बसवराज केंगनाळकर |
| कॉंग्रेस | शिवशंकर अंजनाळकर |
| शिवसेना | पवन देसाई |

| प्रभाग २० अ (ओबीसी महिला) | |
|---|---|
| भाजप | वहिदाबी शेख |
| कॉंग्रेस | अनुराधा काटकर |
| राष्ट्रवादी | कुरेशा मुल्ला |
| एमआयएम | सफिया चौधरी |

| प्रभाग २० ब (सर्वसाधारण महिला) | |
|---|---|
| भाजप | पूजा वाघमारे |
| राष्ट्रवादी | परवीन इनामदार |
| राष्ट्रवादी (शप) | नुसरत शेख |
| एमआयएम | अनिसा मोगल |

| प्रभाग २० क (सर्वसाधारण) | |
|---|---|
| भाजप | झीशान सय्यद |
| राष्ट्रवादी | अबूबकर सय्यद |
| राष्ट्रवादी | सिध्दार्थ रणधीरे |
| एमआयएम | अजहर हुंडेकरी |
| आप | मंजूर खानापुरे |

| प्रभाग २० ड (सर्वसाधारण) | |
|---|---|
| भाजप | अमीर शेख |
| कॉंग्रेस | अझरोद्दीन शेख |
| शिवसेना | मोहसीन शेख |
| राष्ट्रवादी | तौफिक शेख |
| एमआयएम | अझरोद्दीन जहागीरदार |
| आप | अजहर शेख |

| प्र.२१ अ (अनुसुचित जाती महिला) | |
|---|---|
| भाजप | संगीता जाधव |
| शिवसेना | पूजा खंदारे |
| कॉंग्रेस | प्रतीक्षा निकाळजे |

| प्रभाग २१ ब (ओबीसी) | |
|---|---|
| भाजप | शिवाजी वाघमोडे |
| कॉंग्रेस | रियाज हुंडेकरी |
| शिवसेना | अक्षय पकाले |

| प्रभाग २१ क (सर्वसाधारण महिला) | |
|---|---|
| भाजप | मंजिरी किल्लेदार |
| कॉंग्रेस | किरण टेकाळे |
| शिवसेना | मीना दास |

| प्रभाग २१ ड (सर्वसाधारण) | |
|---|---|
| भाजप | सात्विक बडवे |
| ठाकरे गट | भीमाशंकर म्हेत्रे |

| प्रभाग २२ अ (अनुसुचित जाती) | |
|---|---|
| भाजप | दत्तात्रय नडगिरी |
| कॉंग्रेस | संजय हेमगड्डी |
| राष्ट्रवादी | अजित बनसोडे |
| शिवसेना | सुधीर संगेपाग |
| एमआयएम | सचिन कोलते |
| वंचित | कीर्तिपाल गोंडगुबे |

| २२ ब (ओबीसी महिला) | |
|---|---|
| भाजप | अंबिका गायकवाड |
| कॉंग्रेस | अर्चना जाधव |
| शिवसेना | अंजू गायकवाड |
| राष्ट्रवादी | अंबिका जाधव |
| एमआयएम | शोभा जाधव |

| २२ क (सर्वसाधारण महिला) | |
|---|---|
| भाजप | चैताली जाधव |
| कॉंग्रेस | राजनंदा डोंगरे |
| शिवसेना | अनिता बुक्कानुरे |
| राष्ट्रवादी | तहेसीन शेख |
| एमआयएम | असीया शेख |
| वंचित | सुषमा फडतरे |

| २२ ड (सर्वसाधारण) | |
|---|---|
| भाजप | किसन जाधव |
| कॉंग्रेस | कुणाल गायकवाड |
| शिवसेना | नितीन गायकवाड |
| राष्ट्रवादी | जुबेर शेख |
| एमआयएम | सिराज शेख |
| वंचित | रमेश सुतकर |
| रिपाइं | संगणबसप्पा बिराजदार |

| प्रभाग २३ अ (अनुसुचित जाती) : | |
|---|---|
| भाजप | सत्यजित वाघमोडे |
| राष्ट्रवादी | अनिल बनसोडे |
| शिवसेना | मदन कोलके |
| राष्ट्रवादी (शप) | सुनीता रोटे |
| वंचित | धर्मराज डुरके |

| प्रभाग २३ ब (ओबीसी महिला) | |
|---|---|
| भाजप | आरती वाकसे |
| कॉंग्रेस | दीपाली शाह |
| शिवसेना | कृष्णाबाई बिरादार |
| अपक्ष | मेनका राठोड |

| प्रभाग २३ क (सर्वसाधारण महिला) | |
|---|---|
| भाजप | ज्ञानेश्वरी देवकर |
| शिवसेना | लता गायकवाड |
| ठाकरे गट | अलका राठोड |
| राष्ट्रवादी | चित्रा कांबळे |
| बसपा | माणिकम्मा कोळी |

| प्रभाग २३ ड (सर्वसाधारण) | |
|---|---|
| भाजप | राजशेखर पाटील |
| शिवसेना | प्रकाश राठोड |
| ठाकरे गट | लक्ष्मण जाधव |
| बसपा | राहुल जरग |
| वंचित | सुभाष गायकवाड |

| प्रभाग २४ अ (अनुसुचित जाती) | |
|---|---|
| भाजप | मधुसूदन जंगम |
| कॉंग्रेस | शिवलिंग कांबळे |
| शिवसेना | सतीश म्हस्के |

| २४ ब (अनुसुचित जमाती महिला) | |
|---|---|
| भाजप | वनिता पाटील |
| शिवसेना | उषा काळे |
| ठाकरे गट | संध्या काळे |

| २४ क (ओबीसी महिला) | |
|---|---|
| भाजप | अश्विनी चव्हाण |
| अपक्ष (शिवसेना पुरस्कृत) | शैलजा राठोड |

| प्रभाग २४ ड (सर्वसाधारण) | |
|---|---|
| भाजप | नरेंद्र काळे |
| कॉंग्रेस | राजू चव्हाण |
| शिवसेना | विकास कदम |
| आप | आनंदकुमार जाधव |
| रासप | संपन्न दिवाकर |

| प्रभाग२५ अ (अनुसुचित जाती महिला) | |
|---|---|
| भाजप | सुमन चाबुकस्वार |
| कॉंग्रेस | सरस्वती आठवले |
| राष्ट्रवादी | सुरेखा काळे |

| प्रभाग २५ ब (ओबीसी) | |
|---|---|
| भाजप | नागेश ताकमोगे |
| कॉंग्रेस | विजयकुमार हत्तुरे |
| शिवसेना | धनंजय कारंडे |
| राष्ट्रवादी | वैभव हत्तूरे |
| प्रहार | मकबुल मुल्ला |

| प्रभाग २५ क (सर्वसाधारण महिला) | |
|---|---|
| भाजप | वैशाली भोपळे |
| कॉंग्रेस | रिझवान सगरी |
| राष्ट्रवादी | सुकेशनी गंगोडा |
| शिवसेना | शोभा चौगुले |

| प्रभाग २६ अ (अनुसुचित जाती) | |
|---|---|
| भाजप | संगीता जाधव |
| राष्ट्रवादी | किरण सर्वगोड |
| राष्ट्रवादी (शप) | नागिणी इरकशेट्टी |
| वंचित | संगीता सुरवसे |
| बीएसपी | पल्लवी कांबळे |

| प्रभाग २६ ब (अनुसुचित जमाती) | |
|---|---|
| भाजप | दीपक जमादार |
| कॉंग्रेस | रविकुमार यलगुलवार |
| अपक्ष | राजेश काळे |

| प्रभाग २६ क (सर्वसाधारण) | |
|---|---|
| भाजप | जयकुमार माने |
| कॉंग्रेस | नितीन घुगे |
| राष्ट्रवादी | सागर हत्तुरे |
| बसपा | सुहास सुरवसे |

सोलापूर तरुण भारत



सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## अग्रलेख...

# बुलेट ट्रेनचे स्वप्न साकारतेय...

लहानपणी मामाच्या गावाला जाण्यासाठी रेल्वे गाडीत बसल्यानंतर 'झुकझुक झुकझुक अगीन गाडी, धुरांच्या रेषा हवेत काढी, पळती झाडे पाहू या, मामाच्या गावाला जाऊ या', हे गाणे म्हटल्याचे साऱ्यांनाच आठवत असेल. या गाण्यावर मराठी मुलखातील अनेक पिढ्यांचे बालपण सरले. अन्य प्रदेशांतही रेल्वेगाडीशी सांस्कृतिक बंध सांगणारी गाणी-कथा आहेत. काळ बराच पुढे सरकला. धुरांच्या रेषाही हवेत निघण्याचा काळ कधीच मागे सरला आहे. भारतात अद्ययावत रेल्वेगाड्यांचे युग अवतरते आहे. बुलेट ट्रेनने मामाच्या गावाला जाण्याचे दिवस आले आहेत. त्यासाठी सध्या तरी एकच अट आहे आणि ती म्हणजे तुमचा मामा मुंबई वा अहमदाबादला राहणारा असावा. बुलेट ट्रेनचे जे स्वप्न पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशवासीयांना दाखवले होते, ते आता प्रत्यक्षात येत आहे. देशातील पहिल्या मुंबई ते अहमदाबाद बुलेट ट्रेनचे उद्‌घाटन १५ ऑगस्ट २०२७ होणार असल्याची घोषणा रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी नववर्षाच्या पहिल्या दिवशी केली, ही सर्वांच्या दृष्टीने अतिशय आनंदाची आणि अभिमानाची बाब म्हटली पाहिजे. भारतीय रेल्वेच्या इतिहासातील हा सुवर्णक्षण होय. 'मोदी है तो मुमकीन है' असे म्हटले जाते. प्रत्यक्षात मोदी यांनी काय काय मुमकीन करून ठेवले, याची आपण कल्पनाही करू शकत नाही. बुलेट ट्रेन आपल्या देशात धावू शकेल, याची कल्पनाही कोणी केली नव्हती इतका हा अफाट विकास आहे.

चीन, फ्रान्स, जपान, जर्मनीनंतर भारताचा बुलेट ट्रेन असलेल्या जगातील निवडक देशांच्या यादीत समावेश होत आहे, ही समस्त भारतीयांसाठी अतिशय अभिमानाची बाब म्हटली पाहिजे. बंदुकीतून ज्या गतीने गोळी बाहेर पडते, त्या गतीने या गाड्या धावत असल्यामुळे त्यांना बुलेट ट्रेन म्हटले जात असावे. बुलेट ट्रेनने महाराष्ट्र आणि गुजरात यांना आणखी जवळ आणले आहे. या दोन राज्यांतील आर्थिक आणि औद्योगिक विकासाचा नव्याने पाया घातला आहे. भारतातील पहिल्या बुलेट ट्रेनसाठी आपल्याला जपानने तांत्रिक आणि आर्थिक मदत केली. जपानचे पंतप्रधान शिंजो ॲबे २०१५ मध्ये भारत दौऱ्यावर आले होते. तेव्हा देशात बुलेट ट्रेनचा पाया घातला गेला. २०२५ संपता-संपता त्यावर कळस चढला आहे. बुलेट ट्रेन बनवण्यासाठी अवाढव्य खर्च येतो, जो आपल्याला करणे अशक्य नसले तरी थोडे अडचणीचे झाले असते. मुंबई-अहमदाबाद बुलेट ट्रेनसाठी १ लाख ८ हजार कोटी रुपये खर्च अपेक्षित होता. जपान आपल्या मदतीला धावून आला. जपानने यातील ८८ हजार कोटी रुपये ०.१ टक्का एवढ्या नाममात्र व्याजदरात देण्याची तयारी दर्शवली. या कर्जाची परतफेड आपल्याला ९०५०० कोटी रुपये एवढी करावी लागणार आहे. म्हणजे अधिकचे फक्त २५०० कोटी द्यावे लागणार आहेत आणि ते देखील ५० वर्षांत. देशात बुलेट ट्रेन धावायला लागून १५ वर्षे उलटतील तेव्हा ही परतफेड सुरू होईल. जगात जपानचे बुलेट ट्रेनचे तंत्रज्ञान सर्वांत सुरक्षित मानले जाते. यावरून आपण मुंबई-अहमदाबाद बुलेट ट्रेनसाठी जपानच्या तंत्रज्ञानाला पसंती का दिली, याची कल्पना येऊ शकते.

जगातील ईटीआर २०० नावाची पहिली बुलेट ट्रेन इटलीत १९३७ मध्ये धावली होती. या सुपरफास्ट गाडीची गती त्यावेळी ताशी ८० किमी होती. त्यानंतर १९६४ मध्ये जपानमध्ये पहिली बुलेट ट्रेन शिंकान्सेन या तंत्रज्ञानावर सुरू करण्यात आली. ताशी १३० किमी ही या गाडीची तेव्हाची गती होती. भारतात सुरू होणाऱ्या बुलेट ट्रेनही गती ताशी ३२० किमी असेल. यावरून बुलेट ट्रेनच्या तंत्रज्ञानात काळानुरूप किती वेगाने बदल झाला आणि त्याला बुलेट ट्रेन का म्हणतात, याचा आपल्याला अंदाज येऊ शकतो. समाधानाची बाब म्हणजे भारतातील बुलेट ट्रेन शिंकान्सेन या तंत्रज्ञानावरच आधारित आहे. नरेंद्र मोदी यांनी २०१४ मध्ये पहिल्यांदा पंतप्रधानपदाची सूत्रे स्वीकारल्यापासून देशातील पायाभूत सुविधांच्या क्षेत्रात मोठे बदल झाले आहेत. पायाभूत सुविधा क्षेत्रात जेवढा बदल आणि विकास मोदी यांच्या कार्यकाळात झाला, तेवढा याआधी एकाही सरकारच्या कार्यकाळात झाला नाही. मोदींच्या काळातच देशात वंदे भारत गाड्याही सुरू झाल्या. या गाड्या अतिशय कमी वेळात लोकप्रिय झाल्या. कारण वंदे भारतमधील डब्यांची नव्या तंत्रज्ञानाने केलेली बांधणी. वंदे भारतमध्ये बसल्यावर प्रवाशांना विमानात बसल्याचे समाधान मिळते. देशाच्या अनेक भागांत वंदे भारत धावत आहे. देशातील पहिल्या वंदे भारत शयनयान गाडीला पंतप्रधान मोदी जानेवारीच्या तिसऱ्या आठवड्यात हिरवा झेंडा दाखवणार आहेत.

मोदी सरकारने रेल्वे क्षेत्राचा कायापालट करून टाकला. अनेक रेल्वेस्थानकांचे अत्याधुनिकीकरण सुरू आहे. अनेक रेल्वेस्थानके विमानतळासारखी झाली आहेत. रेल्वेतून प्रवास करण्याला मोदी यांनी प्रतिष्ठा मिळवून दिली. २०१४ च्या आधी व त्यानंतरची रेल्वे प्रवासाची स्थिती पाहिली तर तीत आमूलाग्र बदल झाल्याचे आपल्या लक्षात येईल. याला मोदींचे दूरदर्शी नेतृत्व जसे जबाबदार आहे, तसेच विद्यमान रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांची धडाडीही कारणीभूत आहे. रेल्वे अपघाताची नैतिक जबाबदारी स्वीकारत राजीनामा देणारे लालबहादूर शास्त्री यांच्यासारखे संवेदनशील रेल्वेमंत्री या देशाने पाहिले आहेत. नव्या काळात रेल्वे अपघाताच होऊ नयेत म्हणून पूर्ण क्षमतेने आणि खबरदारीने काम करणारे तसेच त्यासाठी कवचसारख्या नव्या तंत्रज्ञानाची अंमलबजावणी करणारे रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव लाभलेत, हे देशाचे भाग्यच म्हटले पाहिजे.

गेल्या दशकभरात रेल्वे गाड्यांतील स्वच्छता, गाड्या धावण्याचा वक्तशीरपणा, गाड्यांची वाढलेली गती, रेल्वेतील खानपानाच्या दर्जात झालेली सुधारणा आणि रेल्वे अपघातांची कमी झालेली संख्या यांचा आढावा घेतला तर मोदी सरकारने रेल्वेच्या क्षेत्रात काय काम केले, याचा अंदाज आपल्याला येऊ शकतो. देशात अनेक प्रकारच्या नव्या जलदगती गाड्या मागील अकरा वर्षांत सुरू झाल्या. या गाड्यांनी रेल्वे प्रवासाचा चेहरामोहरा बदलला. याआधी गाड्या अतिशय विलंबाने धावायच्या. याबाबतचा एक किस्सा अतिशय गाजला आहे. एक गाडी ठरल्यावेळेला रेल्वेस्थानकावर आली. राईट टाईम गाडी आल्याचा सर्वांनाच आनंद झाला, पण तो काही क्षणच टिकला. कारण ही गाडी राईट टाईम नव्हे तर २४ तासांच्या विलंबाने रेल्वेस्थानकावर आल्याचे नंतर स्पष्ट झाले. यातील गमतीचा भाग सोडला तरी असे दशकभरापूर्वी पर्यंत नेहमीच होत होते. जनतेनेही तशी स्वत:ची मानसिकता करून घेतली होती. या पृष्ठभूमीवर आपल्या देशात बुलेट ट्रेन सुरू होणे ही अतिशय मोठी उपलब्धी म्हटली पाहिजे. पहिल्या बुलेट ट्रेनच्या उद्‌घाटनानंतर मोदी सरकारने स्वस्थ बसू नये. महामार्गांच्या जाळ्याच्या धर्तीवर बुलेट ट्रेनचे जाळे उभारले जावे आणि त्यासाठी लगेच सुरुवात केली जावी. मोदी पंतप्रधान असल्यामुळे हे अशक्य नाही. अशक्य ते शक्य करून दाखवणे हीच मोदींची कार्यपद्धती आहे. मोदी फक्त स्वप्ने दाखवत नाहीत तर ती प्रत्यक्षात आणण्याचीही हमी देतात, हे पुन्हा एकदा सिद्ध झाले आहे. देशातील पहिल्या बुलेट ट्रेनच्या लोकार्पणाची रीतसर घोषणा झाली आहे. त्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी, रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव, भारत सरकारमधील सर्व मंत्री आणि या प्रकल्पासाठी ज्यांचे-ज्यांचे हात लागले, त्या सर्वांचे मनापासून अभिनंदन केले पाहिजे. देर आए, दुरुस्त आए, असे म्हणतात. आपल्याला बुलेट ट्रेन सुरू करण्यास उशीर झाला, हे खरेच आहे. काँग्रेसच्या सरकारांनी या विषयात लक्ष घालण्यापेक्षा रेल्वे खात्याकडे मलिद्याचे खाते म्हणूनच पाहिले. नरेंद्र मोदी यांचे सरकार आल्यावर रेल्वे क्षेत्राचाही विकास केला पाहिजे, असा विचार प्रथम आला आणि त्याची अंमलबजावणीही झाली. असंख्य आव्हाने असलेल्या भारतासारख्या महाकाय देशात बुलेट ट्रेन सुरू होतेय, हा फारच आनंदाचा विषय आहे. हा आनंद लवकरात लवकर समस्त देशवासीयांच्या वाट्याला येवो. ▮

## यंगिस्तान

# २०२६ वर्ष शहरी नक्षलमुक्त व्हावं!

जयेश शत्रुघ्न मेस्त्री

आपण २०२६ या नव्या वर्षात पदार्पण केले आहे. नव्या वर्षाचे नवे संकल्प असतात. मात्र बऱ्याचदा आरंभशूर म्हणून आपण संकल्प घेतो. ते पूर्ण करण्यासाठी आपण संघर्ष करतो, झटतो. मात्र दोन आठवड्यांतच आपला संकल्प मोडला जातो. हे वैयक्तिक संकल्पाबाबत घडते. त्यामुळे काही प्रमाणात आपले नुकसान होते. पण जेव्हा व्यापक संकल्प घेण्याची वेळ येते तेव्हा आरंभशूर होऊन चालत नाही. हजारो वर्षे ज्यू ''नेक्स्ट इयर इन जेरुसलेम'' म्हणत संकल्प घेत होते. त्यासाठी काही थेट वा गुप्त कृती होत असेल. पण हा संकल्प नित्यनेमाने पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचत होता आणि एक दिवस खरोखर इस्रायल नावाचं राष्ट्र उभं राहिलं. त्याचप्रमाणे हिंदू देखील १९४७ पासून १४ ऑगस्टला अखंड भारतासाठी संकल्प घेतात. हा संकल्प कधी पूर्ण होईल याची शाश्वती आता देता येत नाही. ज्यूंची अवस्था तर आपल्यापेक्षा हजार पटींनी वाईट होती. तरी देखील त्यांचा संकल्प पूर्ण झाला. राम मंदिराचे उदाहरण घ्या. प्रत्येक हिंदूने संकल्प घेऊन पिढ्यान्‌पिढ्या तो जपून आज राम मंदिर उभे राहिले आहे. हे झाले व्यापक संकल्प. ज्यासाठी अनेक पिढ्या खर्च कराव्या लागतात. मात्र भारतात अनेक संकटे आहेत. ज्यांचा बंदोबस्त करणे शक्य आहे. त्यापैकी एक संकट म्हणजे शहरी नक्षलवाद.

विवेक अग्निहोत्री यांनी 'अर्बन नक्सल्स' नावाचे पुस्तक लिहिले आणि पाहता पाहता हा शब्द प्रचलित झाला. हा शब्द शहरातील बुद्धिजीवी, विद्यार्थी आणि कार्यकर्त्यांसाठी वापरण्यात आला आहे, यामध्ये हे लोक माओवादी विचारधारेचा प्रचार करतात, आंदोलने हायजॅक करतात आणि देशाच्या एकतेला आव्हान देतात. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मार्च २०२५ मध्ये सांगितले होते की, नक्षलवाद जंगलातून तर संपत चालला आहे, पण शहरांमध्ये मुळे रोवत आहे. गृहमंत्री अमित शाह यांनी २०२५ च्या अखेरीस घोषणा केली की ३१ मार्च २०२६ पर्यंत भारत नक्षलमुक्त होईल. जंगलातील नक्षलवादावर सरकार उत्तम प्रकारे काम करत आहे. पण शहरी नक्षलवादावर स्वतंत्र लक्ष देण्याची गरज आहे. कारण हा व्हायरस युवकांचे ब्रेनवॉश करत आहे. आता कुलदीप सेंगरचं उदाहरण पाहू. कुलदीप सेंगर उत्तर प्रदेशातील उन्नाव जिल्ह्यातील एक प्रभावशाली राजकारणी. २००२ मध्ये बहुजन समाज पार्टी (बीएसपी) कडून, नंतर २००७ आणि २०१२ मध्ये समाजवादी पार्टी (एसपी) कडून आणि २०१७ मध्ये भारतीय जनता पार्टी (बीजेपी) कडून विजयी झाला. उन्नाव भागात त्याचा मोठा प्रभाव होता, पण २०१७ मध्ये एका अल्पवयीन मुलीने त्याच्यावर बलात्काराचा आरोप केला. मुलीचा दावा होता की सेंगरने नोकरीचे आमिष दाखवून



तिचे अपहरण करून बलात्कार केला. प्रकरण आणखी गंभीर झाले जेव्हा पीडितेच्या वडिलांचा पोलिस कोठडीत मृत्यू झाला आणि कुटुंबावर हल्ले झाले. सीबीआय तपासात सेंगर दोषी ठरला. डिसेंबर २०१९ मध्ये दिल्लीच्या विशेष न्यायालयाने त्यांना आयपीसी आणि पोस्को कायद्यांतर्गत जन्मठेपेची शिक्षा सुनावली. मार्च २०२० मध्ये वडिलांच्या हत्येच्या प्रकरणात अतिरिक्त १० वर्षांची शिक्षा झाली. भाजपाने त्याला पक्षातून बडतर्फ केले.

२०२५ च्या शेवटी हे प्रकरण पुन्हा चर्चेत आले. २३ डिसेंबर २०२५ रोजी दिल्ली उच्च न्यायालयाने सेंगरच्या अपीलवर विचार करताना सशर्त जामीन मंजूर केला. पण २९ डिसेंबर २०२५ रोजी सर्वोच्च न्यायालयाने या आदेशाला स्थगिती दिली आणि सेंगरला तुरुंगातच राहावे लागले. आधीच्या निर्णयाविरोधात २८ डिसेंबर २०२५ रोजी दिल्लीच्या जंतर-मंतरवर मोठे आंदोलन झाले. या आंदोलनाचा मुख्य उद्देश होता सेंगरचा जामीन रद्द करणे, पीडितेची सुरक्षा वाढवणे आणि न्याय निश्चित करणे. वनडब्ल्यूएसहिंदी.कॉमने या आंदोलनकर्त्यांना प्रश्न विचारले. हा व्हिडीओ त्यांच्या चॅनलवर अजूनही आहे. मुख्य प्रवाहातील माध्यमांनी आंदोलनाची दुसरी बाजू दाखवली नाही. पण काही सोशल मीडिया पोस्ट आणि वेबसाईट्स (जसे वनडब्ल्यूएसहिंदी.कॉम) यांनी दावा केला की येथे ब्राह्मणविरोधी आणि सनातन धर्मविरोधी घोषणा दिल्या गेल्या, जसे 'ब्राह्मणवाद से आजादी', 'हिंदुत्व से आजादी.' पत्रकाराने आंदोलनकर्त्यांना प्रश्न विचारला की, सेंगरविरोधातील आंदोलनात ब्राह्मण आणि हिंदुत्वाच्या विरोधात नारे का लावता? तर तिथे जमलेल्या मुलांनी उडवाउडवीची उत्तरे दिली. गोदी मीडिया म्हणून त्याला हिणवले. बांगलादेशात ब्राह्मण आणि हिंदुत्व नाही मग तिथे कसे अत्याचार होत आहेत. याबाबतही मुलांना मतप्रदर्शन करता आले नाही. उलट ते जोरजोरात नारे देऊ लागले. हा सगळा प्रकार तुम्ही यांच्या वेबसाईटवर पाहू शकता.

दुसरे उदाहरण दिल्लीच्या इंडिया गेटवर प्रदूषणविरोधी आंदोलनात काही तरुणांनी माओवादी कमांडर माडवी हिडमाच्या समर्थनार्थ घोषणा दिल्या. 'माडवी हिडमा अमर रहे', 'जल-जंगल-जमीन की लड़ाई जिंदाबाद.' फलकही दाखवले गेले. पोलिसांनी २३ लोकांना अटक केली आणि डिसेंबर २०२५ मध्ये काहींना जामीन मिळाला. हिडमा छत्तीसगडच्या बस्तरमध्ये सीपीआय (माओइस्ट) चा कमांडर होता. त्याच्यावर २६ हल्ल्यांचा आरोप होता. मग या आंदोलनाचा आणि खून माओवादी नक्षली माडवी हिडमाचा काय संबंध? शाहीनबागचं आंदोलनही असंच हायजॅक झालं होतं ना? सीएए आणि एनआरसीवरनं उसळलेली दंगल आठवतच असेल तुम्हाला? भारतात सतत अशांतता पसरेल याची काळजी हे शहरी नक्षली घेत असतात. दुसरी गोष्ट आपली जेन झी पिढी यात ओढली जात आहे. यावर उपाय म्हणून सरकारने यात विशेष लक्ष घातलं पाहिजे. उगाच गरज नसताना ब्राह्मण या जातीवर चिखलफेक केल्यास त्यावर कठोर कारवाई व्हायला हवी. ब्राह्मण समाजातील एखादा दोष दाखवून द्वेष न करता तो दोष दूर करण्यासाठी काम करणे वेगळे आणि कुठे काहीही घडले तरी प्रत्येक वेळी ब्राह्मणवाद म्हणत त्या समाजाला बदनाम करणे वेगळे. हिंदू धर्मावरही गरज नसताना टीका केल्यावर कायद्यात तरतुदी करायला हव्यात. हिंदू धर्म हा सुधारणावादी धर्म आहे. मात्र केवळ बदनामी करण्यासाठी हिंदू धर्माला दूषणे लावले जात असतील तर हिंदूंचा एकमेव अधिकृत देश असलेल्या भारतामध्ये बहुसंख्य हिंदूंना न्याय मिळालाच पाहिजे. जगाला शांततेचा मार्ग दाखवणारा हिंदू समाज, जगभरात पसरून स्वकर्तृत्वावर मोठमोठ्या पदांवर विराजमान होणारा हिंदू समाज, इतरांना काफीर न मानता जिहाद न करता सर्वांप्रति प्रेमभाव दाखवणारा हिंदू समाज हा विश्वाच्या गळ्यातला मोतीहार आहे. केवळ हिंदू समाजासाठी हिंदूंचे संरक्षण करायचे नाही तर जगाच्या हितासाठी हिंदू संरक्षण करायचे आहे. २०२६ ला शहरी नक्षलमुक्त करण्यासाठी सरकार आणि समाजाला सजग राहावे लागेल. तरुणांना जागृत करावं लागेल. नक्षलविरोधी प्रबोधनात्मक कार्यक्रम राबवावे लागणार आहेत. २०२६ या नववर्षाच्या सुरुवातीला चला शहरी नक्षलवादमुक्त भारत करण्याचा संकल्प घेऊया. कारण यामुळे भारत केवळ नक्षलमुक्त होणार नाही तर अधिक मजबूत होईल. ▮

writerjayeshmestry@gmail.com

## वेध

# २.३ टक्के क्षेत्रफळात १४७ कोटींचे वास्तव्य!

पुंडलिक आंबटकर

भारत हा जगातील सर्वाधिक लोकसंख्या असलेला देश आहे. परंतु, भारताच्या वाट्याला आता फक्त २.३ टक्केच इतकाच भूभाग उरलेला आहे. अवघे ३२ लाख ८७ हजार २६३ वर्गकिलोमीटर इतके क्षेत्रफळ भारताकडे आहे. सर्वाधिक क्षेत्रफळ रशियाच्या वाट्याला आले असून या देशाकडे ११.५ टक्के इतका भूभाग आहे. परंतु, त्यांची लोकसंख्या अवघी १४ कोटींच्या आसपास आहे. भारत क्षेत्रफळाच्या दृष्टीने सातव्या क्रमांकावर असला तरी आपली लोकसंख्या आज १४७ कोटींवर पोहोचली आहे. भारत तसा मूळ हिंदूंचा देश परंतु इतरांच्या तुलनेत जन्मदर दिवसेंदिवस कमी होत चालल्याने हिंदूंची लोकसंख्या ७८.९ टक्क्यांपर्यंत घसरली आहे. जगातील अनेक देशांमध्ये आजही हिंदू धर्म पाळणाऱ्या नागरिकांचे वास्तव्य आहे. अखंड भारतात १० राष्ट्रांचा समावेश होता, असे सांगितले जाते. परंतु, हिंदूंचे साम्राज्य इंडोनेशियापर्यंत विस्तारले होते, ही बाब ध्यानात ठेवली पाहिजे. आज इंडोनेशियात हिंदू अवघा १.६८ टक्के इतकाच शेष असला तरी कधीकाळी हा संपूर्ण देशच हिंदूंचा होता. तेथील नागरिक आता मुस्लिम असले तरी आजही ते हिंदूंच्याच देवी-देवतांची पूजा करतात! टक्केवारीचा विचार केला तर जगात सर्वाधिक हिंदू नेपाळमध्ये राहतात. या देशात हिंदू धर्मीयांची टक्केवारी ८०.६ इतकी आहे. त्यानंतर मॉरिशस ४८.४ टक्के, फिजी २७.९, गयाना २४.९, भूतान २२.५, त्रिनिदाद आणि टोबॅगो २२.३, कतार १५.९ आणि श्रीलंकेत १३.७ टक्के हिंदू धर्मीयांचे वास्तव्य आहे. तसेच अन्य अनेक देशांमध्ये हिंदू धर्मीयांचे वास्तव्य आहे. बांगलादेश आणि पाकिस्तानातही काही प्रमाणात हिंदू राहतात. परंतु, त्यांच्यावर वारंवार अत्याचार होत असल्याने तिथे राहणाऱ्या हिंदूंना नाईलाजाने धर्मांतरण करावे लागत आहे. अशाही परिस्थितीत हिंदू धर्म लोकसंख्येच्या बाबतीत जगात तिसऱ्या क्रमांकावर आहे. भारतात लोकसंख्येचा विस्फोट झाला असून हिंदू धर्मात शिक्षणाचे प्रमाण ज्या गतीने वाढले त्याच गतीने जन्मदर कमी झाला आहे. परंतु, मुस्लिम समाजात जन्मदर प्रचंड आहे. आगामी २५ वर्षांत मुस्लिम धर्मीयांची संख्या ३५ टक्क्यांवर जाण्याची शक्यता असून भविष्यात हिंदू आपल्याच भूमीत अल्पसंख्यक होण्याचा धोका आहे. अनेकदा भारताला हिंदू राष्ट्र घोषित करण्याची मागणी पुढे येते. परंतु, भारत मूळ हिंदूंचेच राष्ट्र असल्याने अशा घोषणेची गरज नसल्याचे विचारवंतांनी स्पष्ट केलेले आहे.

लोकसंख्यावाढीमुळे बेरोजगारांची संख्यासुद्धा झपाट्याने वाढत आहे. परंतु, सरकारने तरुणाईच्या कौशल्याचा वापर करून घेण्यासाठी विविध योजना अंमलात आणल्याने देशाच्या आर्थिक प्रगतीत मोठी भर पडत आहे. सध्या भारताची अर्थव्यवस्था ५ ट्रिलियन अमेरिकन डॉलर्सच्या आसपास आहे आणि आर्थिक प्रगतीचा वेग जगात सर्वाधिक असल्याने २०५० पर्यंत भारत ३० ट्रिलियन डॉलर्सचा आकडा ओलांडून जगात दुसऱ्या क्रमांकाची महासत्ता म्हणून उदयास येईल, असा अंदाज पीडब्ल्यूसी या ब्रिटिश कंपनीने नुकताच वर्तविला आहे. भविष्यात भारत अमेरिकेला मागे टाकून चीनवर वरचढ ठरेल, हे खरे असले तरी भारतात लोकसंख्यावाढ रोखण्यासाठी कोणताही ठोस कायदा नाही. भविष्यात ज्या गतीने भारतीय अर्थव्यवस्था वाढेल, त्याच गतीने लोकसंख्यासुद्धा वाढणार आहे. विशेष म्हणजे, आपल्याकडे लोकसंख्यावाढ रोखण्यासाठी जनजागृती आणि उपाययोजनांवर भर दिला जातो. याचा परिणाम म्हणून हिंदूंचा जन्मदर घटला आहे. परंतु, त्या तुलनेत मुस्लिमांमध्ये जागृती येऊ शकलेली नाही. शिवाय काही राजकीय पक्ष मुस्लिमांमध्ये वारंवार असुरक्षिततेची भावना निर्माण करतात. वास्तविक संपूर्ण जगात सर्वांत सुरक्षित भारतातील मुस्लिमच आहेत. कारण, बहुतांश मुस्लिम राष्ट्रांमध्ये अनेक मुस्लिम रोज पंथवाद अथवा अन्य कारणांमुळे मारले जातात. भारतात मात्र मुस्लिमांना उच्च पदे आणि बरोबरीचे अधिकार प्राप्त आहेत. तरीही केवळ खुर्चीच्या राजकारणासाठी मुस्लिमांमध्ये वारंवार असुरक्षिततेची भावना निर्माण करून या समाजाची मते लाटण्याचा गोरखधंदा वर्षानुवर्षे चालत आलेला आहे. संसाधने आणि क्षेत्रफळाची मर्यादा लक्षात घेता लोकसंख्यावाढ रोखण्यासाठी मुस्लिमांमध्ये जनजागृती व्हावी म्हणून आता विरोधकांनीच पुढाकार घेतला पाहिजे. अन्यथा तुमचे मुस्लिमप्रेम केवळ राजसत्तेपुरते मर्यादित आहे, हेच सिद्ध होईल. ▮

९८८१७१६०२७

### सूचना

दररोज संपादकीय पानावर प्रसिद्ध होणारे 'आजचे संघगीत' हे सदर तात्पुरते स्थगित करीत आहोत. लवकरच ते नव्या स्वरूपात सुरू होईल, याची कृपया नोंद घ्यावी.

-संपादक

## मुंबई वार्तापत्र

# पूजा मोरे प्रकरण : हिंदुत्ववाद्यांचा धडा

नागेश दाचेवार

पूजा मोरे-जाधव यांच्या उमेदवारीभोवती उभा राहिलेला वाद हा केवळ एका व्यक्तीपुरता मर्यादित नसून, तो महाराष्ट्रातील वैचारिक राजकारणाच्या खोल पातळीवरचा संघर्ष अधोरेखित करणारा आहे. या प्रकरणामुळे एक कठोर वास्तव पुन्हा एकदा स्पष्ट झाले आहे. हिंदुत्वाच्या राजकारणात वैचारिक सातत्याला अत्यंत महत्त्व आहे आणि संधिसाधू बदलांना माफी दिली जात नाही. विशेषतः राष्ट्रीय विचारांवर चालणाऱ्या कट्टर हिंदुत्ववाद्यांकडून अशा विसंगतीकडे दुर्लक्ष होण्याची शक्यता जवळपास धूसरच म्हणावी लागेल. हिंदुत्ववादी तसे आक्रमक नव्हते आणि नाहीत. मात्र, आता आता अलिकडे त्यांच्याही सहनशीलतेचा बांध फुटू लागला असल्याचे चित्र बघायला मिळत आहे.

पूजा मोरे यांना ज्या प्रकारचा विरोध सहन करावा लागला, तो केवळ सोशल मीडियापुरता मर्यादित राहिला नाही, तर तो राजकीय निर्णयांवर थेट परिणाम करणारा ठरला. काही दिवसांतच वाढलेले ट्रोलिंग, जुने व्हिडीओ, विधानांचे संदर्भ आणि छायाचित्रे पुन्हा पुन्हा समोर आणत त्यांची वैचारिक विश्वासार्हता प्रश्नांकित करण्यात आली. अखेरीस, या दबावापुढे त्यांना पुणे महानगरपालिका निवडणुकीतून माघार घ्यावी लागली. नव्हे तर तसे करण्यास हिंदुत्ववाद्यांनी भाग पाडले. या अर्थाने हिंदुत्ववादी संघटनांनी एक स्पष्ट संदेश दिला□भूतकाळ पुसून टाकता येत नाही आणि राजकीय स्मृती फार तीक्ष्ण असतात.

पूजा मोरे स्वत:चा राजकीय प्रवास तळागाळातील संघर्ष, शेतकरी आंदोलन, मराठा आरक्षण चळवळ आणि सामाजिक प्रश्नांशी जोडून सांगतात. त्यांचा संघर्ष नाकारता येण्यासारखा नाही. मात्र, आजच्या काळात केवळ संघर्षाची कथा पुरेशी ठरत नाही. आजचे राजकारण अति-डिजिटल झाले आहे. सोशल मीडियामुळे प्रत्येक वक्तव्य, प्रत्येक फोटो आणि प्रत्येक कृती कायमची नोंद बनते. एखाद्या उमेदवाराचा भूतकाळ आजच्या भूमिकेशी विसंगत वाटल्यास, त्यावर तीव्र प्रतिक्रिया उमटते□आणि पूजा मोरे प्रकरणात नेमके तेच घडले. मराठा आरक्षण आंदोलनातील सहभाग, आंदोलनादरम्यान केलेल्या कथित वक्तव्यांबाबतचे आरोप, तसेच पहलगाम दहशतवादी हल्ल्याशी संबंधित व्हायरल व्हिडीओ यामुळे हिंदुत्ववाद्यांमध्ये तीव्र असंतोष निर्माण झाला. जरी पूजा मोरे यांनी हे व्हिडीओ तोडमोड करून व्हायरल केल्याचा दावा केला असला, तरी राजकारणात 'स्पष्टीकरण' अनेकदा 'नुकसान' भरून काढू शकत नाही, हे वास्तव आहे.

याहून अधिक वादग्रस्त ठरले ते त्यांचे शहरात आल्यानंतर मला हिंदुत्व समजले हे विधान. हिंदुत्ववादी संघटनांच्या दृष्टीने हिंदुत्व हे परिस्थितीनुसार स्वीकारले जाणारे राजकीय लेबल नाही, तर संस्कार, विचार आणि जीवनपद्धतीशी जोडलेले मूल्य आहे. त्यामुळे विवाह, स्थलांतर किंवा राजकीय संधीमुळे हिंदुत्व स्वीकारल्याचा दावा अनेकांना अस्वस्थ करणारा ठरला. त्यांच्या कथनातील ही वैचारिक दरीच त्यांच्या नकाराचे मुख्य कारण बनली. शिवाय विरोधावर शिक्कामोर्तब झाले. मात्र, त्याचवेळी मराठा आंदोलनात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांना उद्देशून ''आरक्षण मागतोय् बायको नाही...'' अशी घोषणा याच पूजा मोरे-जाधव या महिलेने दिली. हे तर फारच निषेधार्ह आहे. हिंदुत्व शहरात आल्यानंतर कळलं किंवा नसेल कळलं. पण महिलांचा आदर करणं ही संस्कृती महाराष्ट्राच्या ग्रामीण भागात कळत नाही, असे सुचवायचे होते की काय मोरे बाईंना? या संपूर्ण प्रकरणाकडे भाजपाने केवळ वैयक्तिक प्रकरण म्हणून पाहणे देखील धोकादायक ठरले. मोरे प्रकरण हा भाजपासाठीसुद्धा गंभीर इशारा आहे. अलिकडे पक्षात प्रवेश केलेल्या उमेदवारांना केवळ निवडणुकीतील गणित पाहून उमेदवारी देणे, त्यांच्या वैचारिक पृष्ठभूमीचा सखोल अभ्यास न करता पुढे आणणे, ही रणनीती पक्षालादेखील अडचणीत आणू शकते. भाजपाची ओळख ही नेहमीच कॅडर-आधारित संघटनात्मक रचना, दीर्घकालीन निष्ठा आणि वैचारिकता यावर उभी राहिली आहे. जेव्हा ही रचना डावलून 'बाहेरून आलेल्या' उमेदवारांना संधी दिली जाते, तेव्हा पक्षातील निष्ठावान कार्यकर्त्यांमध्ये असंतोष निर्माण होतो. पूजा मोरे प्रकरणात हेच घडले. पक्षाने उमेदवारी दिली असली, तरी ती स्वीकारण्यास तयार असलेला वैचारिक आधार तितक्याच ताकदीने उभा राहिला नाही.□

या घटनेतून आजच्या राजकारणातील एक मूलभूत सत्य पुन्हा अधोरेखित होते□सोशल मीडिया कधीच विसरत नाही. कधी कधी निवडणूक पराभवापेक्षाही अधिक वेदनादायक. पूजा मोरे स्वत:ला संघर्ष करणारी कार्यकर्ती मानत पुढे लढा सुरू ठेवण्याची भूमिका घेत असल्या, तरी या प्रकरणातून दिला गेलेला राजकीय धडा स्पष्ट आहे. तो केवळ त्यांच्यासाठी नाही, तर त्यांना उमेदवारी देणाऱ्या पक्षासाठी आणि भविष्यातील इतर इच्छुक उमेदवारांसाठीही आहे. शेवटी, पूजा मोरे प्रकरण हे केवळ एका व्यक्तीच्या राजकीय अपयशाचे उदाहरण नाही, तर वैचारिक राजकारणात शॉर्टकट महागात पडतात, याची ठळक आठवण करून देणारे प्रकरण आहे. आता प्रश्न इतकाच आहे□भाजपाने या घटनेतून योग्य धडा घेतला आहे का? कारण वैचारिक प्रवास अपूर्ण असलेल्या व्यक्तींना दिलेली संधी पक्षालाही तितक्याच तीव्रतेने भोवू शकते. यात शंका नाही.

राजस्थान, कर्नाटक, महाराष्ट्र आणि पंजाब (शीख परंपरा) या चारही प्रदेशांनी मुस्लिम आक्रमणांच्या काळात केवळ राजकीय संघर्षच केला नाही, तर हिंदू धर्म, हिंदू संस्कृती आणि परंपरांचे संरक्षण करण्यासाठी मोठ्या धैर्याने उभे राहिले. सातत्याने झालेल्या आक्रमणांमुळे देशाची सांस्कृतिक ओळख पुसली जाण्याचा धोका निर्माण झाला होता. अशा काळात या प्रदेशांनी आपली श्रद्धा, जीवनमूल्ये आणि सामाजिक रचना टिकवून ठेवली. विशेषतः मराठ्यांनी अखिल भारतातून मुस्लिम सत्तेची पाळेमुळे खणून काढण्यात जे यश मिळवले, त्यामागे त्यांचा प्रारंभापासूनचा ठाम संकल्प कारणीभूत होता. छत्रपती शिवाजी महाराजांनी अतिशय लहान वयातच 'हिंदवी स्वराज्य' या महान ध्येयाची कल्पना मनात बाळगली होती. पंधराव्या वर्षीच त्यांनी परकीय सत्तेपासून मुक्त, स्वाभिमानी आणि धर्मनिष्ठ राज्याचे स्वप्न पाहिले. हे स्वप्न केवळ राजसत्तेपुरते मर्यादित नव्हते, तर ते सांस्कृतिक, सामाजिक आणि आध्यात्मिक स्वातंत्र्याशी जोडलेले होते. आणि पूजा मोरे ज्या समाजातून येतात, तेव्हा त्यांना, सांस्कृतिक व वैचारिक अर्थाने विचार केला, तर छत्रपतींचे वारस म्हणणे चुकीचे ठरणार नाही. अशा वारसांनीच जर महाराजांच्याच स्वप्नांना सुरुंग लावणारी कृती केली तर, महाराजांच्या विचारांना तिलांजली देण्यासारखं आहे. अशा पवित्र आणि बलिदानांनी नटलेल्या भूमीत हिंदुत्वाविरोधात बोलणे किंवा हिंदू संस्कृतीविरुद्ध वातावरण निर्माण करणे हे स्वाभाविकच असह्य आणि अस्वीकार्ह ठरते. कारण ही भूमी संघर्ष, त्याग आणि आत्मसन्मानाची साक्ष देणारी आहे. इतिहासाने शिकवलेला हा वारसा जपणे, त्यातून एकात्मता आणि स्वाभिमान टिकवणे हे आजच्या पिढीचे कर्तव्य आहे. पूजा मोरे प्रकरणातून हिंदुत्ववाद्यांनी दिलेला हा इशारा सातत्यानं हिंदू धर्माचा उपहास करणाऱ्या काँग्रेस आणि अलिकडेच धर्मनिरपेक्षतेचा उमाळा आलेल्या उबाठासाठीदेखील एक धडा आहे. ▮

९२७०३३३८८६

### 'तिकिटांच्या तमाशाचे तात्पर्य' उत्कृष्ट अग्रलेख

१ जानेवारीचा 'तिकिटांच्या तमाशाचे तात्पर्य' हा अग्रलेख वाचला. गेल्या कित्येक दिवसांत असा घणाघाती अग्रलेख वाचला नव्हता. त्यातील शब्दन्‌शब्द म्हणजे वाघनखे आहेत. संबंधितांचा कोथळा बाहेर काढणारी. हे संबंधित म्हणजे सर्व पक्षांचे कार्यकर्ते, नेते होत. आपण कुणाचाही मुलाहिजा ठेवला नाही. ना सत्ताधाऱ्यांचा ना विरोधकांचा. अग्रलेखातील वाक्यन्‌वाक्य सत्य आहे. इतके सत्य लिहायला रामशास्त्री बाण्याची निर्भयता लागते. भाऊराव माडखोलकर आणि आचार्य अत्र्यांना या अग्रलेखाने जणू पोचपावती दिली. ज्या कोणी हा अग्रलेख लिहिला असेल त्याचे त्रिवार अभिनंदन.

**डॉ. वि. स. जोग**/नागपूर

●● ●●

### कुऱ्हाडीला धार केली का?

गोविंद नावाचा एक लाकूडतोड्या होता. तो मागील पाच वर्षांपासून एकाच ठेकेदाराकडे काम करीत होता. परंतु त्याचा पगार वाढत नव्हता. परंतु त्याच वेळी अवघ्या वर्षभरापूर्वी कामावर नव्याने रुजू झालेल्या रवीचा पगार मात्र वाढला. गोविंदने याबाबत विचारणा केली असता त्याला सांगितले गेले की, तो ५ वर्षांपूर्वी जेवढी लाकडे तोडायचा तेवढीच तो आताही तोडून देत आहे. त्यामुळे पगार देखील तितकाच आहे. जर लाकडे तोडण्याच्या संख्येत वाढ झाली तर पगार देखील वाढेल.

गोविंद हे ऐकून अधिक मेहनत करायला लागला. जास्त वेळ काम करूनही लाकडांच्या संख्येत अपेक्षित ती वाढ होईना. तेव्हा ठेकेदाराने त्याला रवीकडे जायला सांगितले. कदाचित तो उपाय सांगू शकेल. गोविंदने रवीला जेव्हा कारण विचारले तेव्हा रवी म्हणाला, ''मी प्रत्येक लाकूड कापून झाल्यावर दोन मिनिटे आराम करतो व आपल्या कुऱ्हाडीला धार करतो. त्याने पुढील लाकूड देखील कमी कष्टात तोडले जाते. तू आपल्या कुऱ्हाडीला शेवटची धार केव्हा केली होती?'' गोविंदला कळून चुकले की त्याच्या प्रामाणिक कष्टात कुठे चूक होती. जी गोष्ट कुऱ्हाडीला धार लावण्याची तीच गोष्ट देवाने माणसाला दिलेल्या बुद्धीची, तिलाही लिहिण्या-वाचनाने, अभ्यासाने, चांगल्या परिवाराशी जोडण्याने आणि मुख्य म्हणजे भगवत् भक्तीने बुद्धीला धार लावण्याची गरज आहे. प. पू. पांडुरंग शास्त्री सांगतात, भक्ती ही सामाजिक शक्ती आहे. खरेच आहे, सर्वांनी विचार केला पाहिजे की आम्ही आपल्यातील अंगभूत वैशिष्ट्यांना कुऱ्हाडीसारखी शेवटची धार केव्हा केली होती. जुने कर्तृत्व, कार्य हे फार दीर्घकाळ आपला साथ देत नाही. आपल्याला वारंवार त्याला धार करावी लागते.

**मधुकर व्यवहारे**/पुणे

## वाचक पत्रे

●● ●●

### बिबट्यांचा वावर, एक गंभीर समस्या

अलिकडच्या काळात बिबट्यांचे मानवी वस्त्यांमध्ये दर्शन अगदी नित्याची बाब होऊन बसली आहे. पुणे येथील केशवनगर परिसर, नागपूरमधील पारडी, तसेच मुंबईमधील भाईंदर परिसरातील बिबट्याचा वावर खरोखरीच चकित करणारा तर आहेच, शिवाय या विषयावर मंथन करायला लावणाराही आहे. नैसर्गिकत: बिबट्या हा लाजाळू प्राणी आहे. परंतु मानवी भागात शिरल्यावर गोंधळल्यामुळे तो स्वसंरक्षणार्थ हल्ला करण्यास प्रवृत्त होतो. त्यामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे. बिबट्याच्या हल्ल्यात निष्पाप नागरिकांचे बळी जात आहेत. वन्यजीव-मानव संघर्ष वाढतो आहे. पण हे सगळे का होत आहे, याची कारणमीमांसा करणे गरजेचे आहे.

महाराष्ट्रात सहा व्याघ्र प्रकल्प आणि १४ वन्यजीव अभयारण्ये आहेत, ज्याचे क्षेत्रफळ जवळपास चौरस किलोमीटर, ज्यात ३९५१.०२ चौ. किमी कोअर एरिया आणि ५१६५.७८ चौ. किमी बफर एरिया म्हणून नोटिफाईड आहे. (आकडेवारी २०१९ ची आहे) या बाबतीत कार्यालय महालेखाकार, लेखा परीक्षा (द्वितीय), महाराष्ट्र, नागपूरने एक अहवाल, वर्ष २०१९ मध्ये 'टायगर रेस्क्यू इन महाराष्ट्र' या मथळ्याखाली प्रसिद्ध केला, ज्यात अगदी सखोल अभ्यास करून विश्लेषणात्मक माहिती आहे. या अहवालात प्रामुख्याने विशद केले आहे की, कोअर अधिवासात मानवी वस्ती आणि टुरिस्ट फॅसिलिटीज वन्यजीवांच्या अधिवासाला मर्यादित करतात, तसेच त्यांच्या इनव्हायोलेट स्पेसमध्ये अतिक्रमण केले जात आहे. त्यांच्या अधिवासात मानवाचे अतिक्रमण ही एक चिंतेची बाब आहे. जंगल तोडीवर शासनाने आज काही प्रमाणात का होईना नियंत्रण आणले असले तरी या जंगलतोड वन्यजीवांना नागरी वस्त्यांकडे वळवीत आहे. मर्यादित जंगल आणि त्या प्रमाणात बिबट्यांची असलेली संख्या, शिकारीची कमतरता वन्यजीवांना मानवी वस्त्यांकडे पलायन करायला भाग पाडत आहे.

शासनाने ही समस्या गंभीरतेने घेऊन योग्य त्या उपाययोजना करायला हव्यात. जसे- वन्यजीवांच्या हालचालींवर नियंत्रण आणि योग्य देखरेख आणि त्याकरिता लागणाऱ्या मनुष्यबळाची पर्याप्त उपलब्धता तसेच मूल्यमापन, बंदी, जंगलातील मानवी वसाहती आणि पर्यटनासाठी असलेल्या अवास्तव सुविधा टप्प्याटप्प्याने बंद करणे, मानवी वसाहतींचे योग्य जागेवर स्थलांतर करून त्यांचे पुनर्वसन करणे इत्यादी. अन्यथा निष्पाप नागरिक वन्यजीवांच्या भक्ष्यस्थानी पडतील आणि मग मात्र हा प्रश्न सोडविणे अशक्य होऊन बसेल आणि सामान्यांचे जीवन मात्र पणाला लागेल, एवढे निश्चित. ▮

**कीर्ती गाडगे**/९९२११९९९२२

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/



## महत्वाचे...



### बंडा प्रशालेचे स्नेहसंमेलन उत्साहात

**सोलापूर, दि. २ जानेवारी-**
श्रीमती नरसम्मा बसप्पा बंडा प्रशालेचे वार्षिक स्नेहसंमेलन संस्थेचे अध्यक्ष प्रा. नारायणराव संगा यांच्या अध्यक्षतेखाली हुतात्मा स्मृती मंदिरात पार पडला. शालेय समिती चेअरमन प्रभाकर गोरंटी व प्रमुख पाहुणे म्हणून वैजिनाथ हत्तुरे, प्रेसिडेंट बसवराज बंडा, सेक्रेटरी संजय बुगडे, मुख्याध्यापक एम.डी. बिराजदार व सह-सेक्रेटरी श्रीनिवास गडगी साहेब खजिनदार श्रीनिवास जोगी, संचालक राजू काकी, संचालक गिरीष कामुर्ती, नागेश कनकी, इरेश काकी, प्रकाश बुट्टा, व्यकंटेश बुगडे, विवेक मादगुंडी, अंबादास कनकी, सुहास मादगुंडी, शांता संगा, गीता साई, अंबिका मादगुंडी, वर्षाराणी कामुर्ती, मुख्याध्यापिका तट्टे, प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक विजयकुमार बड्डूरे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी प्रशालेतील इयत्ता आठवी ते दहावीच्या विद्यार्थ्यांनी भक्ती गीत धनगरी ओव्या, शेतकरी गीत रामायण, शंभूवंदना, पर्यावरण गीत यावर सुंदर नृत्य व सोशल ड्रामा इत्यादी कार्यक्रम सादर करुण उपस्थितांची मने जिंकली. सूत्रसंचालन प्रशालेतील सांस्कृतिक प्रमुख एम. एस. पवार यांनी केले व आभार ए.यू.वाले यांनी मानले. वंदे मातरम् या गीताने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.



### विजयकुमार बिराजदार यांना अभिवादन

**सोलापूर, दि. २ जानेवारी-**
ब. ना. बिराजदार वसतीगृहात संस्थेचे माजी अध्यक्ष कै. विजयकुमार बिराजदार यांच्या नवव्या स्मृतिदिनानिमित्त अभिवादन करण्यात आले. कै. विजयकुमार बिराजदार हे तत्वनिष्ठ, कुटुंबवत्सल, कृषीतज्ञ, कुस्तीपटू व दानशूर होते. त्यांचे पिताश्री कै. बसवंतराव नागप्पा बिराजदार यांनी सातरस्ता परिसरात विद्यार्थीनी वस्तीगृहासाठी अर्धा एकर जमीन दिली होती. तेथे लिंगायत मुलींसाठी वसतीगृह सुरू आहे. आजच्या काळात अशी माणसे दुर्मिळ आहेत, असे विचार डॉ. भिमाशंकर बिराजदार यांनी व्यक्त केले. अध्यक्षस्थानी मल्लिनाथ विभूते हे होते. उपाध्यक्ष आप्पासाहेब बिराजदार यांनी कै. विजयकुमार बिराजदार यांच्या प्रतिमेचे पूजन करून पुष्पहार अर्पण केले. सरचिटणीस बाबासाहेब कुलकर्णी यांनी उपस्थितांचे स्वागत केले. संस्थाध्यक्ष मल्लिनाथ विभूते यांनी कै. विजयकुमार बिराजदार यांच्या कार्याची माहिती दिली. प्रा. शरणबसप्पा मंगळूरे यांनी आभार मानले. वसतीगृहातील विद्यार्थ्यांना सोमशेखर लवंगे परिवाराच्या वतीने जेवण देण्यात आले.



### वालचंद कॉलेजमध्ये तंबाखूमुक्त युवा मोहीम ३.० अंतर्गत सशक्त प्रबोधन

**सोलापूर, दि. २ जानेवारी-**
तरुणाईला व्यसनांच्या विळख्यातून बाहेर काढण्याच्या उद्देशाने वालचंद कॉलेज ऑफ आर्ट्स अँड सायन्स, सोलापूर येथील ज्युनिअर कॉलेजमध्ये तंबाखू मुक्त युवा मोहीम विशेष अभियान ३.० अंतर्गत इयत्ता १२ वी कला शाखेतील विद्यार्थ्यांसाठी व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. महाविद्यालयाच्या अत्याधुनिक बायोटेक स्मार्ट रूममध्ये हा कार्यक्रम पार पडला.कार्यक्रमात एम.एस.डब्ल्यू. विभागाचे माजी विद्यार्थी व 'सारथी' युथ फाउंडेशनचे सचिव रामचंद्र कुंडलिक वाघमारे यांनी अनुभवाधारित व अंतर्मुख करणारे मार्गदर्शन केले. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. कोटी एस. व्ही. होते. तर उपप्राचार्य अनुप म्हेत्रे व पर्यवेक्षक डॉ. जीवराज कस्तुरे यांची प्रमुख उपस्थिती लाभली. व्यसनाचे दुष्परिणाम मांडताना वाघमारे यांनी पीपीटी प्रेझेंटेशनच्या माध्यमातून व्यसनाकडे वळण्याची कारणे, त्याचे परिणाम व प्रतिबंधक उपाय यांची माहिती विद्यार्थ्यांसमोर मांडण्यात आली. यावेळी उपप्राचार्य अनुप म्हेत्रे यांनी यावेळी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाच्या शेवटी विद्यार्थ्यांनी तंबाखू मुक्त युवा मोहीम अंतर्गत सामूहिक शपथ घेती. सूत्रसंचालन चेतन तुपकर यांनी केले तर आभार शैलेंद्र विठ्ठलदास यांनी मानले. कार्यक्रमाचे नियोजन संदीप कुलकर्णी यांनी केले. कार्यक्रमास धनंजय शहा, संदेश बोराळकर, निलेश भिडे, अमोल सरवळे, डॉ. माधुरी शास्त्री, संदीप चेंडकापूरे, श्रेराज पंडित, योगेश खैरे व शंकर जनगोंड उपस्थित होते.

### चौथे युगस्त्री फातिमाबी शेख साहित्य संमेलन श्रीरामपूर येथे ११ जानेवारीला होणार

**सोलापूर, दि. २ जानेवारी-**
ग्रामीण मुस्लिम मराठी साहित्य संस्था महाराष्ट्र शाखा श्रीरामपूर यांच्या वतीने ११ जानेवारी रविवार श्रीरामपूर येथे राज्यस्तरीय चौथे फातिमाबी शेख मुस्लिम मराठी साहित्य संमेलन आयोजित करण्यात आले आहे. या साहित्य संमेलनाच्या अध्यक्षस्थानी देहू येथील सुप्रसिध्द साहित्यिक लेखिका मेहमूदा शेख यांची तर स्वागताध्यक्ष डॉ सलीम शेख तर कार्याध्यक्ष पदी कवयित्री दिलशाद शेख व कवी रज्जाक शेख यांची निवड करण्यात आली आहे. अशी माहिती संस्थेचे सहसचिव अनिसासिकंदर व उपाध्यक्ष खाजाभाई बागवान यांनी एका पत्रदेद्वारे दिली आहे. भारतातील पहिल्या मुस्लिम मराठी शिक्षिका युगस्त्री फातिमाबी शेख यांच्या जयंतीनिमित्त आयोजित या एकदिवसीय साहित्य संमेलनाचे उद्घाटन जेष्ठ साहित्यिक व ८९ अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष श्रीपाल सबनीस करणार असून प्रमुख पाहुणे म्हणून मा. शफी बोल्डेकर, मा. हाशम पटेल, मा. इस्माईल शेख, प्राचार्य मा. डॉ. इ. जा. तांबोळी, ज्येष्ठ पत्रकार मा. अय्युब अहमद नल्लामंदू आदी उपस्थित राहुन मार्गदर्शन करणार आहेत. यावेळी पुस्तक प्रकाशन, स्मरणिका प्रकाशन,पुरस्कार वितरण, विविध विषयावर विचार मंथन आणि ५० कवीचा भव्य काव्य संमेलन कवयित्री व मुख्याध्यापक नूरजहाँ शेख यांच्या अध्यक्षतेखाली होणार आहे.

# शहरातील ३० उपकेंद्रावर उद्या एमपीएससी पूर्व परीक्षा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २ जानेवारी-**
शहरातील ३० उपकेंद्रावर रविवार, दि. ४ जानेवारी रोजी महाराष्ट्र लोकसेवा आयोग महाराष्ट्र गट - ब पूर्व परीक्षा असल्या कारणाने परिक्षा केंद्राच्या परिसरात दि. ४ जानेवारी २०२६ रोजी सकाळी ८.३० पासून ते दुपारी १ वाजेपर्यंत परीक्षार्थींना कसलाही अडथळा होऊ नये. या दृष्टीने परीक्षा केंद्राच्या परिसरात बाहय उपद्रव कमी करणे परीक्षार्थींना कसलाही अडथळा होऊ नये या दृष्टीने परीक्षेसाठी संबंधित नसलेल्या व्यक्तीस परीक्षा केंद्राच्या परिसरात प्रवेश करण्यास पायबंद घालण्यात आला आहे.

परीक्षा केंद्राच्या परिसरात झेरॉक्स, फॅक्स, इमेल, रेडिओ, इंटरनेट सुविधा भ्रमणध्वनी (मोबाईल), संगणक गणनायंत्र (कॅल्क्युलेटर) व अशा इतर प्रकारच्या स्वरुपातील बाबी विद्यार्थ्यांना पुरवठा करण्यात येवू नये आणि सर्व संबधित शासकीय अधिकारी आणि कर्मचारी यांना त्यांचे परीक्षेशी संबंधित कर्तव्ये चोखपणे आणि कोणताही अडथळा अथवा उपद्रव न होता बजावता यावे म्हणून परीक्षा केंद्राच्या सभोवताली १०० मीटर परीसरात भारतीय नागरीक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ लागू करण्यात आले असल्याचे



प्रसिध्दी पत्रकान्वये पोलीस उप-आयुक्त, (गुन्हे/विशा), सोलापूर शहर डॉ. अश्विनी पाटील यांनी कळविले आहे.

परीक्षा केंद्राच्या परिसरात खालीलप्रमाणे प्रतिबंधात्मक आदेश जारी करण्यात असून, यामध्ये परीक्षा केंद्राच्या परिसरात कोणत्याही प्रकारच्या घोषणा देण्यात येणार नाही, परीक्षा केंद्राच्या परिसरात परीक्षार्थी अथवा अन्य व्यक्तींकडून शांततेस बाधा निर्माण होईल असे कृत्य करण्यात येणार नाही, परीक्षा केंद्राचे १०० मीटर परिसरातील झेरॉक्स सेंटर, पानपट्टी, टायपिंग सेंटर, फॅक्स, एस.टी.डी. बूथ, ध्वनीक्षेपक, संगणक केंद्र, इंटरनेट कॅफे इत्यादी दळणवळणाची माध्यमे बंद राहतील. परीक्षा केंद्राचे परिसरात मोबाईल फोन, पेजर सारखा दुरसंचार साधने व इतर इलेक्ट्रॉनिक गॅझेट्स, स्मार्ट वॉच, फॅक्स, ईमेल व इतर प्रसारमाध्यमे घेवून परीक्षार्थींना प्रवेश करण्यास मनाई असेल. परीक्षा केंद्रावर कोणत्याही वाहनांस प्रवेशांस मनाई राहील. परीक्षेशी संबंधित नसलेल्या व्यक्तींना परीक्षा केंद्रात प्रवेश नसेल केवळ संबंधित परीक्षा केंद्रावर नेमणूक केलेले मुख्याध्यापक/कर्मचारी, शासकिय कामावरील अधिकारी व कर्मचारी संबंधित शाळेचे मुख्याध्यापक / शिक्षक/कर्मचारी आणि उमेदवार यांनाच परीक्षा केंद्रामध्ये प्रवेश राहील. इतरांना (उमेदवारांच्या नातेवाईकासह) प्रवेश असणार नाही. यासह इतरही काही सुचना देण्यात आल्या आहेत. ही परीक्षा सोलापूर शहरातील एकूण ३० उपकेंद्रांवर घेण्यात येणार आहे. हा आदेश परीक्षा केंद्रावर काम करणारे अधिकारी/अंमलदार, परीक्षा केंद्रावर निगराणी करणारे अधिकारी व पोलीस अधिकारी / अंमलदार यांचे बाबत त्यांचे परीक्षेसबंधी कर्तव्य पार पाडण्याचे अनुषंगाने लागू राहणार नाहीत. आयोगाने परवानगी दिलेल्या व्यक्तींनाच भ्रमणध्वनीचा वापर करता येईल. इतर सर्वांना भ्रमणध्वनी नेण्यास बंदी असेल. या आदेशाची अवमानना केल्यास गुन्हा नोंदवून फौजदारी कार्यवाही करण्यात येईल असे आदेश पोलीस उप-आयुक्त, (गुन्हे/विशा) पोलीस आयुक्त, सोलापूर शहर डॉ. अश्विनी पाटील यांनी काढले आहेत.



## मतदान व मतमोजणी प्रक्रिया यशस्वीपणे पार पाडण्यासाठी समन्वयाने काम करावे

**डॉ. ओम्बासे यांचे आदेश**

**महानगरपालिका निवडणूक संदर्भात आढावा बैठक**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २ जानेवारी -**
निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांचे काटेकोर पालन करून मतदान व मतमोजणी प्रक्रिया यशस्वीपणे पार पाडण्यासाठी सर्व संबंधित यंत्रणांनी समन्वयाने काम करावे, असे आदेश महापालिका आयुक्त तथा निवडणूक निर्णय अधिकारी डॉ. सचिन ओम्बासे यांनी दिले.

सोलापूर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६ च्या अनुषंगाने आज महापालिका आयुक्त तथा निवडणूक निर्णय अधिकारी डॉ. सचिन ओम्बासे यांच्या अध्यक्षतेखाली महापालिकेच्या मीटिंग हॉलमध्ये महत्त्वाची आढावा बैठक घेण्यात आली. या बैठकीत मतदान व मतमोजणी प्रक्रियेसाठी आवश्यक असलेल्या यंत्रणा, मनुष्यबळ, साहित्य, तांत्रिक सुविधा तसेच सुरक्षा व व्यवस्थापनाबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. यावेळी अतिरिक्त आयुक्त वीणा पवार, अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे, उपायुक्त आशिष लोकरे, मुख्य लेखा अधिकारी डॉ. रत्नराज जवळगेकर, प्र मुख्यलेखा परीक्षक सदानंद वाघमारे, सह. नगर रचना मनिष भीष्णूरकर, सह. आयुक्त गिरीष पंडित, सह आयुक्त शशिकांत भोसले, सह आयुक्त मनीषा मगर, नगर अभियंता सारिका आकुलवार, कार्यकारी अभियंता राजेश परदेशी अग्निशमन प्रमुख राकेश साळूंखे,संबंधित विभागीय अधिकारी तसेच विभागांचे वरिष्ठ अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

## 'डब्ल्यूआयटी'मध्ये उद्या विद्यार्थी विकास योजनेचे वार्षिक स्नेहमिलन

**सोलापूर, दि. २ जानेवारी-**
सेवा सहयोग फाऊंडेशनच्या विद्यार्थी विकास योजना अंतर्गत विद्यार्थी, त्यांचे पालक तसेच देणगीदार व हितचिंतक यांच्या उपस्थितीत वार्षिक स्नेहमिलन कार्यक्रम रविवार, ४ जानेवारी रोजी सकाळी ९.३० वाजता वालचंद इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी येथील रिमोट सेंटरमध्ये आयोजित करण्यात आला आहे. या स्नेहमीलनात विद्यार्थी विकास योजनेचे प्रवर्तक रविंद्र कर्वे तसेच वालचंद इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीचे निवृत्त प्राचार्य डॉ. शशिकांत हलकुडे यांच्याशी विद्यार्थ्यांना थेट संवाद साधण्याची संधी मिळणार आहे. आर्थिक वर्ष २०२४-२५ या कालावधीत महाराष्ट्रातील ३६ जिल्ह्यांतील तसेच देशातील अन्य ११ राज्यांमधील अत्यंत गरीब पण गुणवत्तावान अशा १,०३१ विद्यार्थी-विद्यार्थिनींना बारावीनंतरचे व्यावसायिक शिक्षण पूर्ण करण्यासाठी सुमारे ६ कोटी २५ लाख रुपयांचे अर्थसहाय्य या योजनेतून देण्यात आले आहे. सहृदय दाते, कर्तव्यदक्ष कार्यकर्ते, हितचिंतक, विद्यार्थी व त्यांच्या पालकांच्या सामूहिक सहकार्यामुळे हे कार्य शक्य झाले आहे. आगामी वर्षात या योजनेअंतर्गत १,००० हून अधिक विद्यार्थ्यांना सहाय्य करता येईल, असा विश्वास आयोजकांनी व्यक्त केला आहे. कार्यक्रमानंतर स्नेहभोजनाचे आयोजन करण्यात आले असून, या स्नेहमीलनाला मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन पालक कार्यकर्ते देशपांडे व जोगीपेठकर यांनी केले आहे.

## सोलापुरात ज्येष्ठांसाठी तीन दिवसीय कार्यशाळा उत्साहात

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २ जानेवारी-**
सामाजिक न्याय आणि सक्षमीकरण मंत्रालय (भारत सरकार यांच्या उपक्रमांतर्गत सामाजिक परिवर्तन अध्ययन केंद्र तथा प्रादेशिक संसाधन आणि प्रशिक्षण केंद्र मुंबई व सोलापुरातील ज्येष्ठ नागरिक संघांची शिखर समिती यांचे संयुक्त विद्यमाने २६, २७, २८ डिसेंबर २०२५ असे तीन दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

पहिल्या दिवशी, आदित्य नगर सांस्कृतिक सभागृह विजापूर रोड, येथे ज्येष्ठ नागरिकांचे आहार व पोषण या विषयावर पार पडलेल्या कार्यशाळेसाठी आहारतज्ञ तस्लिम चौधरी, देविका डोंगरेकर आदी तज्ञांनी मार्गदर्शन केले.



दुसऱ्या दिवशी, दमाणी ब्लड बँक डफरिन चौक, येथे डिजिटल साक्षरता विषयावर सायबर क्राईमचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्रीशैल गजा, प्रा. डॉ. प्रसन्न माधवराव गव्हाणे, औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे, शिल्प निदेशक संगणक ऑपरेटर आणि प्रोग्रामिंग सहाय्यक विजय भांगे, संगणक अभियंता- सायबर तज्ञ अविनाश पाटील, कॉन्स्टेबल अश्विनी लोणी. इ. मान्यवरांनी मार्गदर्शन केले. तर अखेरच्या कर्णिक नगर-एकता नगर येथील सत्रात ज्येष्ठ विधीज्ञ ॲड. सुरेश गायकवाड, मनसोपचार तज्ञ डॉ. निहार दिलीप बुर्ट, समाजसेविका डॉ. अपर्णा सुभाष कल्याणकर या मान्यवरांनी 'ज्येष्ठ नागरिकांचे मानसिक आरोग्य आणि मालमतेचे संरक्षण' या विषयावर माहिती दिली.

कार्यशाळा समारोपाच्या या शेवटच्या दिवशी सक्रिय योगदान देणाऱ्या ज्येष्ठांना पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. त्यात पाच जणांना ज्येष्ठ नागरिक जीवन गौरव व पाच जणांना ज्येष्ठ नागरिक विशेष सन्मान पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. यामध्ये सुलभा दातार, मरगू जाधव, निलकंठप्पा कोनापुरे, जयकुमार काटवे, मन्मथ कोनापुरे, शंकरराव करजगी, गुरुलिंग कन्नूरकर, सिध्दाराम गोविंदे, दत्ता निवृत्ती भोसले, कृष्णात देवकर यांचा समावेश आहे. प्रास्ताविक शिखर समितीचे अध्यक्ष प्रा. विलास मोरे, मुख्य समन्वयक गुरुलिंग कन्नुरकर व कोषाध्यक्ष प्रा. कृष्णात देवकर यांनी तसेच मान्यवरांचे स्वागत शिखर समितीचे सचिव मन्मथ कोनापुरे, बाळासाहेब पाटील व चन्नय्या स्वामी यांनी केले. कार्यक्रमाची पार्श्वभूमी आणि उद्दिष्ट्ये प्रकल्प समन्वयिका निलिमा येतकर यांनी विषद केली.

## आयुष्मान भारत अंतर्गत आयुष्मान वय वंदना योजना वयोवृध्दांना लाभदायी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २ जानेवारी-**
आयुष्यमान भारत-प्रधानमंत्री जन आरोग्य योजना अंतर्गत आयुष्मान वय वंदना ही एक उप-योजना आहे; जी ७० वर्षे किंवा त्यापेक्षा जास्त वयाच्या सर्व वरिष्ठ नागरिकांसाठी सुरू करण्यात आली आहे. ही योजना २९ ऑक्टोबर २०२४ रोजी सुरू झाली असून, लाभार्थ्यांना वार्षिक ५ लाख रुपयांपर्यंत मोफत उपचाराची सुविधा देते, अशी माहिती जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. वर्षा डोईफोडे यांनी दिली.

योजनेद्वारे पुढील आजारांवर ५ लाखापर्यंत मोफत उपचार करण्यात येतील. यामध्ये नाक,



कान, घसा, नेत्रविकार, अस्थिव्यंग आणि पॉलिट्रॉमा, भाजणे, कर्करोग उपचार युनिट्स, हिमोडायलिसिस - मूत्रपिंडशास्त्र युनिट्स आदींचा समावे, आहे. केंद्र सरकारची ही योजना देशभरातील आर्थिकदृष्ट्या कमकुवत कुटुंबांना दरवर्षी ५ लाख रुपयांपर्यंत मोफत वैद्यकीय उपचार प्रदान करते. यामध्ये १ हजार ३५६ प्रकारच्या गंभीर आजार, शस्त्रक्रिया आणि रुग्णालयात दाखल होण्याच्या खर्चाचा समावेश आहे. महाराष्ट्र सरकारची ही योजना राज्यातील पात्र लाभार्थ्यांना ५ लाख रुपयांपर्यंत मोफत वैद्यकीय उपचार देते. यामध्ये १ हजार ३५६ प्रकारच्या शस्त्रक्रिया आणि विशेष उपचारांचा समावेश आहे. याठी ७० वर्षे किंवा त्यापेक्षा जास्त वयाचे सर्व नागरिक, त्यांची सामाजिक-आर्थिक स्थिती असो वा नसो; पूर्वी B-PMJY अंतर्गत असलेल्यांना अतिरिक्त टॉप-अप कव्हर मिळते. गंभीर आजारांसाठी ५ लाखांपर्यंत मोफत उपचार, कुटुंबातील इतर ७० पेक्षा जास्त सदस्यांसाठी स्वतंत्र कार्ड. यामुळे जिल्ह्यातील वयोवृध्द नागरिकांनी वरील योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## स्काऊट गाईड जिल्हा मेळाव्यात श्री मल्लिकार्जुन हायस्कूलचे वर्चस्व



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २ जानेवारी-**
भारत स्काऊट आणि गाईड शहर जिल्हा संस्था यांच्या वतीने बार्शी तालुक्यात चारे येथे स्काऊट आणि गाईड मेळाव्यात श्री मल्लिकार्जुन हायस्कूलने सोलापूर जिल्ह्यात खरी कमाई या उपक्रमामध्ये द्वितीय क्रमांक प्राप्त करीत सात पदके प्राप्त केली.

कलर पार्टी स्पर्धेत प्रथम,शेकोटी स्पर्धेत तृतीय,घोषवादन स्पर्धेत द्वितीय क्रमांक स्काऊटच्या विद्यार्थ्यांनी प्राप्त केले.तसेच कलर पार्टी स्पर्धेत प्रथम, तंबू सजावट स्पर्धेत द्वितीय,घोषवादन स्पर्धेत द्वितीय,संचालन स्पर्धेत द्वितीय क्रमांक गाईडच्या मुलींनी प्राप्त केले. ७५ व्या वर्धापन दिनानिमित्त ग्रँड फिनाले डायमंड ज्युबली जांबोरी लखनऊ,उत्तर प्रदेश येथे १९ व्या राष्ट्रीय जांबोरी जिल्हा कॉन्टिजंट लिडर स्काऊट म्हणून राज्यस्तरावर उल्लेखनीय कार्याबद्दल स्काऊट मास्टर परमेश्वर चांदोडे यांचा प्राथमिक शिक्षणाधिकारी कादर शेख यांच्या हस्ते स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र देऊन सत्कार करण्यात आला. या यशस्वी विद्यार्थ्यांचे व मार्गदर्शक शिक्षकांचे संस्थेचे संस्थापक अप्पासाहेब हत्तुरे, अध्यक्ष सिद्धप्पा वरनाळ, माजी प्राचार्य वैजिनाथ हत्तुरे, मार्गदर्शक धरेप्पा हत्तुरे, प्र. मुख्याध्यापक रमेश दिंडोरे, भारत स्काऊट आणि गाईड जिल्हा संघटक स्काऊट श्रीधर मोरे,जिल्हा संघटक गाईड अनुसया शिरसाठ यांनी अभिनंदन केले.

# साखर कारखान्यांचे वजनकाटे तपासणीसाठी भरारी पथकाची स्थापना

**तपासणी पथकात १० सदस्यांचा समावेश**

**जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांची माहिती**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २ जानेवारी-**
जिल्ह्यातील साखर कारखान्याचे वजनकाटे तपासणीकरिता भरारी पथक स्थापन करण्यात आले आहे. या पथकामध्ये वैधमापन शास्त्र विभाग, महसूल विभाग, पोलीस विभाग व प्रादेशिक सहसंचालक (साखर) व साखर कारखाना कार्यक्षेत्रातील शेतकरी प्रतिनिधींचा समावेश असल्याची माहिती जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी दिली आहे.

भरारी पथकात भरारी पथक प्रमुख हे संबंधित सर्व तालुक्यातील तहसिलदार असतील, सदस्य सचिव हे सर्व तालुक्यातील उपनियंत्रक, वैध मापनशास्त्र विभागातील असतील, सदस्य हे ज्या पोलीस स्टेशनच्या हद्दीत साखर कारखाना



असेल त्या पोलीस स्टेशनचे ठाणे अंमलदार असतील, पंढरपूर, सांगोला तालुक्यातील सदस्य ए.एन.बचुटे, लेखापरीक्षक श्रेणी-१ अधिन विशेष लेखापरीक्षक वर्ग-१, सह. सहकारी संस्था (साखर). माळशिरस, माढा तालुक्यातील सदस्य ए.एस. म्याकलवार, उपलेखापरीक्षक अधिन विशेष लेखापरीक्षक वर्ग-१, सहकारी संस्था (साखर), बार्शी, करमाळा तालुक्यातील सदस्य एन.बी. ठोकळ, लेखापरीक्षक श्रेणी-१ अधिन द्वितीय विशेष लेखापरीक्षक वर्ग-१, सहकारी संस्था (साखर). मोहोळ, मंगळवेढा तालुक्यातील सदस्य मोरे, लेखापरीक्षक श्रेणी-२ अधिन द्वितीय विशेष लेखापरीक्षक वर्ग-१, सहकारी संस्था (साखर), उ. सोलापूर, द. सोलापूर तालुक्यातील सदस्य हेएस. आर.आडम, लेखापरीक्षक श्रेणी-१ अधिन तृतीय विशेष लेखापरीक्षक वर्ग-१, सहकारी संस्था (साखर), अक्कलकोट तालुक्यातील सदस्य हे श्री.डी. के. मुदाळे, लेखापरीक्षक श्रेणी-२ अधिन तृतीय लेखापरीक्षक वर्ग-१, सहकारी संस्था (साखर) सोलापूर. सदस्य शेतकरी प्रतिनिधी, यांची नियुक्ती तहसिलदार यांनी करावी.

भरारी पथकातील सदस्यांची नांवे व संपर्क क्रमांक कार्यक्षेत्रातील साखर कारखाने व शेतकरी यांना उपलब्ध होतील अशा प्रकारे प्रसिद्ध करण्यात यावीत. जिल्हयातील भरारी पथकांनी स्वयंस्फुर्तीने कारखानास्थळावर अचानक भेटी देऊन वजनकाट्यांची तपासणी करावी. जेणेकरुन ऊसाचे वजना संदर्भात प्राप्त होणाऱ्या तक्रारीवर आळा बसेल.शेतकऱ्यांना वजनाची पावती योग्य प्रकारे देण्यात येते किंवा कसे याची खात्री करणे. एखादया साखर कारखान्याच्या बाबतीत उसाच्या वजनाबाबत गैरप्रकार होत असल्याची तक्रार यंत्रणेस किंवा पोलीसांकडे प्राप्त झाल्यावर लगेच त्या साखर कारखान्याचे वजनकाट्याची तपासणी करावी आणि गैरप्रकार आढळल्यास यंत्रणेमार्फत योग्य ती कायदेशीर कारवाई करावी.

वजनकाट्याच्या तपासणीमध्ये काही गैर कायदेशीर बाबी आढळल्यास सर्व संबंधितावर कायदेशीर कारवाई करावी. ऊस वजन काटा कॅलिब्रेशन मध्ये फेरफार करुन ऊस वजन काटामारी केली जाते अशा तक्रारी प्राप्त होत आहे. यासाठी ऊस वजनकाटा कॅलिब्रेशन करुन सील करणे आवश्यक आहे. संबंधित वैधमापन अधिकाऱ्याने वजनकाट्याची तपासणी करतेवेळी शेतकरी संघटनांच्या प्रतिनिधींना सोबत घेऊन ऊस वजन काटे कॅलिब्रेशन झालेनंतर सील करावेत, अशा सूचनाही जिल्हाधिकारी यांनी दिल्या आहेत.

साखर कारखान्यांच्या वजनकाटे तपासणी संदर्भात भरारी पथकांमध्ये सुयोग्य अशा शेतकरी प्रतिनिधीचा समावेश तहसिलदार यांनी करावा.

**CHANGE IN NAME**
I AM CHANGING MY NAME FROM " VAIJANTI ASHOK JAIN KANKARIYA " TO " **VAIJAYANTI ASHOK JAIN** " RESIDING AT 2/224, MANTRI CHANDAK NAGAR, BHAVANI PETH, SOLAPUR, MAHARASHTRA-413002. FOR PASSPORT ISSUANCE.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्त्वाचे

### पाचव्या कसोटीसाठी इंग्लंड संघात बशीर, पॉट्सची निवड

**सिडनी** : इंग्लंडने ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या पाचव्या अॅशेस कसोटी सामन्यासाठी आपल्या १२ सदस्यीय संघात ऑफ-स्पिनर शोएब बशीर आणि वेगवान गोलंदाज मॅथ्यू पॉट्सचा समावेश केला आहे. हा कसोटी सामना रविवारपासून सिडनी क्रिकेट मैदानावर खेळली जाणार आहे. मेलबर्न येथे दोन दिवसांतच चौथ्या कसोटी सामन्यात चार गडी राखून विजय मिळवणाऱ्या संघातून वेगवान गोलंदाज गस अॅटकिन्सन हा एकमेव खेळाडू अनुपस्थित आहे. दुखापतीमुळे त्याला या सामन्यातून वगळण्यात आले आहे. बशीर आणि पॉट्सच्या समावेशामुळे इंग्लंडला अधिक लवचिकता मिळाली आहे, कारण ते ही मालिका विजयाने संपवू इच्छित आहेत, विशेषतः सिडनीच्या खेळपट्टीवर इतर ऑस्ट्रेलियन मैदानांच्या तुलनेत पारंपरिकरित्या फिरकी गोलंदाजीला अधिक मदत मिळते. दुखापतग्रस्त अॅटकिन्सनच्या जागी अॅशेसमध्ये पदार्पण करण्यासाठी बशीर व पॉट्स दोघेही आता विचाराधीन आहेत.

### साई सुदर्शनच्या आयपीएल खेळण्यावर प्रश्नचिन्ह

**नवी दिल्ली** : युवा भारतीय फलंदाज साई सुदर्शनला मध्य प्रदेशविरुद्धच्या नुकत्याच झालेल्या विजय हजारे चषक सामन्यादरम्यान बरगडीला दुखापत झाल्यामुळे एका महिन्यापेक्षा जास्त काळ संघाबाहेर राहावे लागू शकते. त्यामुळे त्याच्या आयपीएल खेळण्यावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. भारतीय वन-डे संघाचा भाग नसलेल्या सुदर्शनला अहमदाबादमध्ये मध्य प्रदेशविरुद्ध तामिळनाडूच्या विजय हजारे चषक क्रिकेट सामन्यात धाव घेताना झेप मारताना उजव्या बरगडीला दुखापत झाली.

### गौतम जोग याची विद्यापीठ फुटबॉल संघात निवड

**सोलापूर, दि. २ जानेवारी-**

भारतरत्न इंदिरा गांधी अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या गौतम श्रीनिवास जोग याची लोणेरे येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रज्ञान विद्यापीठ फुटबॉल संघात निवड झाली. विद्यापीठाच्या पन्हाळा येथे झालेल्या विद्यापीठाच्या आंतर विभागीय फुटबॉल स्पर्धेतून त्याची निवड झाली. गौतम याने चाचणीत उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत विद्यापीठ पातळीवर स्थान मिळवले. विद्यापीठाचा संघ ६ ते २६ जानेवारी दरम्यान पारुल विद्यापीठ, वडोदरा येथे होणाऱ्या पश्चिम विभाग आंतरविद्यापीठ फुटबॉल स्पर्धेत सहभाग घेणार आहे. गौतमचे संस्थेचे अध्यक्ष रविंद्रजी गायकवाड, प्राचार्य डॉ अनिल देशमाने, विद्यापीठ प्रशासन व क्रीडा विभागाचे प्रो. अमित वडवेराव आदींनी अभिनंदन केले.



गौतम जोग

### प्रतीक हलमल्ली यास आंतरराष्ट्रीय रॅपिड गुणांकन

**सोलापूर, दि. २ जानेवारी-**

येथील बुद्धिबळ १० वर्षाचा खेळाडू प्रतिक राजकुमार हलमल्ली याने सोलापूर येथे झालेल्या रायसोनी रॅपिड रेटिंग स्पर्धेत भाग घेऊन,नऊ फेऱ्या मध्ये सात आंतरराष्ट्रीय गुणांकन प्राप्त खेळाडूंशी लढत घेत यशवंत डबाळे, रमेश पाटील, या खेळाडू सोबत विजय मिळवला तर संस्कृती सुतार हिच्याशी बरोबरी करत एकूण नऊ पैकी साडेपाच गुण मिळविले.या काम गिरी मुळे त्यास १४५२ असे आंतराष्ट्रीय रॅपिड गुणांकन प्राप्त झाले आहे. तो सध्या प्रशांत पिसे व शरद नाईक सरांच्याकडे बुद्धिबळाचे मार्गदर्शन घेत असूनआजी शैलजा मुरूमकर व आई गौरी हलमल्ली यांच्या विशेष प्रेरणेमुळे त्याने बुद्धिबळात प्रगती करीत असल्याचे आवर्जून सांगितले आहे.



प्रतीक हलमल्ली

### ज्युनिअर डॉजबॉल निवड चाचणी स्पर्धा आज सोलापुरात

**सोलापूर, दि. २ जानेवारी-**

पालघर येथे ९ ते ११ जानेवारी दरम्यान होणाऱ्या १५व्या ज्युनिअर डॉजबॉल राज्य मुला मुलींच्या स्पर्धेकरिता सोलापूर जिल्हा डॉजबॉल असोसिएशनच्या वतीने ३ जानेवारी रोजी अश्विनी हॉस्पिटल शेजारी राजीव गांधी इनडोअर स्टेडियम येथे सायंकाळी ४.३० वाजता जिल्हा निवड चाचणी स्पर्धा होईल. यातून सोलापूर जिल्ह्याचा डॉजबॉल मुला मुलींच्या संघ निवडण्यात येतील. सोलापूर जिल्ह्यातील जास्तीत जास्त संघानी या निवड चाचणी स्पर्धेत सहभाग नोंदवावा, असे आवाहन सचिव सुदेश मालप यांनी केले आहे. नोंदणीसाठी शरण वांगी (मो. ९९४६०३२४६३) अथवा पवन भोसले (९६३७९६३७७७) यांच्याशी संपर्क साधावा.

# न्यूझीलंड मालिकेसाठी निवड समितीची बैठक आज

### ऋषभ पंतकडे सर्वांची नजर

◆ **नवी दिल्ली, २ जानेवारी**

अजित आगरकर यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रीय वरिष्ठ निवड समिती शनिवारी आभासी माध्यमाऑनलाइन पद्धतीने बैठक घेऊन न्यूझीलंडविरुद्धच्या आगामी तीन सामन्यांच्या एकदिवसीय मालिकेसाठी भारताचा संघ निश्चित करणार आहे, त्यामुळे ऋषभ पंत संघात आपले स्थान टिकवून ठेवू शकेल की नाही, यावरील चर्चेकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या २-१ अशा वन-डे मालिका विजयात खेळलेले बहुतांश खेळाडू, यात अनुभवी रोहित शर्मा व विराट कोहली यांचा समावेश आहे, ते न्यूझीलंडविरुद्धच्या तीन सामन्यांसाठी संघात निश्चितपणे असतील. न्यूझीलंडच्या संघात युवा आणि अनुभवी खेळाडूंचा चांगला मिलाफ आहे.

ही मालिका ११ जानेवारी रोजी बडोदा येथे सुरू होईल, त्यानंतर १४ आणि १८ जानेवारी रोजी अनुक्रमे राजकोट व इंदूर येथे सामने होतील. पण जेव्हा पंतला एकदिवसीय संघात स्थान देण्याचा प्रश्न येतो, तेव्हा निवड समितीच्या बैठकीत गंभीर चर्चा होण्याची शक्यता आहे.



सध्या सुरू असलेल्या विजय हजारे चषकांत पंतचा फॉर्म अस्थिर राहिला आहे. चार सामन्यांमध्ये त्याने केवळ एक अर्धशतक झळकावले असून, ३०.२५ च्या सरासरीने एकूण १२१ धावा केल्या आहेत. ऑगस्ट २०२४ मध्ये श्रीलंकेविरुद्ध खेळल्यापासून पंत एकही एकदिवसीय सामना खेळलेला नाही - डिसेंबर २०२२ मध्ये झालेल्या जीवघेण्या कार अपघातातील दुखापतीतून सावरल्यामुळे त्याला बराच काळ खेळापासून दूर राहावे लागले होते.

त्याच्या अलीकडील देशांतर्गत कामगिरीमुळे त्याचे संघातील स्थान मजबूत झालेले नाही, आणि त्यातच, एकदिवसीय संघात प्रथम पसंतीचा यष्टिरक्षक-फलंदाज म्हणून केएल राहुलच्या चमकदार फॉर्ममुळे पंतला बाकावरच बसावे लागले आहे. २०२५ मध्ये, पंत एकही एकदिवसीय सामना खेळला नाही आणि चॅम्पियन्स चषक जिंकणाऱ्या संघाचा तसेच दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या मालिका विजयाती तो न खेळलेला सदस्य होता. पंतशी गोष्टी अधिक गुंतागुंतीच्या झाल्या आहेत, कारण सय्यद मुश्ताक अली चषकातील चमकदार कामगिरीच्या जोरावर ईशान किशनने पुन्हा एकदा संघात स्थान मिळवले आहे आणि आता तो टी-२० विश्वचषक संघात आहे, तसेच ध्रुव जुरेलनेही विजय हजारे चषकांत मोठ्या धावा केल्या आहेत. भारताच्या टी-२० संघातून आधीच बाहेर असलेल्या आणि एकदिवसीय संघातील संधीही धूसर दिसत असलेल्या पंतकडे आता भारताच्या मर्यादित षटकांच्या योजनांमध्ये आपले महत्त्व सिद्ध करण्यासाठी या वर्षाच्या उत्तरार्धात केवळ आयपीएल आणि काही कसोटी सामनेच शिल्लक आहेत. निवड समितीच्या चर्चेत येण्याची शक्यता असलेले आणखी एक नाव म्हणजे सध्या फॉर्मात असलेला डावखुरा फलंदाज देवदत्त पडिक्कल आहे. देवदत्तने सध्या सुरू असलेल्या विजय हजारे चषकामध्ये चार सामन्यांमध्ये तीन शतके झळकावली आहेत.

पण कर्णधार शुभमन गिल परत येत असल्याने, तसेच रोहित, यशस्वी जयस्वाल व ऋतुराज गायकवाड संघात असताना, निवडकर्ते देवदत्तला संघात कसे स्थान देतात हे पाहणे उत्सुकतेचे ठरेल. टी-२० विश्वचषकामुळे जसप्रीत बुमराह आणि हार्दिक पांड्याला वन-डे सामन्यांमधून विश्रांती दिली जाणार असल्याने, हर्षित राणा आणि अर्शदीप सिंग यांना मालिकेत संधी मिळते का, हे पाहणे महत्त्वाचे ठरेल.◀(वृत्तसंस्था)

# जगद्गुरू रामभद्राचार्य यांची शाहरुख खानवर टीका

◆ **नागपूर, २ जानेवारी**

शेजारील देशात हिंदूंवर होत असलेल्या अत्याचारांदरम्यान, स्वतःच्या मालकीच्या कोलकाता नाइट रायडर्स (केकेआर) या आयपीएल फ्रँचायझीने एका बांगलादेशी क्रिकेटपटूला करारबद्ध केल्याबद्दल हिंदू धर्मगुरू जगद्गुरू रामभद्राचार्य यांनी बॉलिवूड सुपरस्टार शाहरुख खानवर जोरदार टीका केली आहे.



केकेआरने इंडियन प्रीमियर लीग (आयपीएल) २०२६ साठी बांगलादेशी वेगवान गोलंदाज मुस्तफिझूर रहमानला करारबद्ध करण्याबद्दल विचारले असता, धर्मगुरू रामभद्राचार्य यांनी गुरुवारी नागपूरमध्ये सांगितले की, हे अत्यंत दुर्दैवी बाब आहे, कारण शाहरुख खानचा दृष्टिकोन नेहमीच देशद्रोहीसारखा राहिला आहे.

त्यांनी बांगलादेशातील अल्पसंख्याक हिंदूंवरील हल्ल्यांचा निषेध केला व भारतीय सरकारने अशा घटना सहन न करता या मुद्द्यावर आक्रमक भूमिका घ्यावी, असे ते म्हणाले. बांगलादेशातील लोकांना आणि त्यांच्या सरकारला हे समजावून सांगितले पाहिजे की, त्यांचा देश हिंदूंच्या मदतीनेच निर्माण झाला आहे, असे रामभद्राचार्य म्हणाले. ◀(तभा वृत्तसेवा)

### बीसीसीआयने निर्णय घ्यावा : धीरेंद्र शास्त्री



बीसीसीआयने बांगलादेशमधील हिंदूंच्या रक्षणाविषयीचा मुद्दा गांभीर्याने घेतला पाहिजे. हे आपले कर्तव्य आहे. अभिनेता शाहरूख खानच्या मालकीच्या कोलकाता नाईट रायडर्सने बांगलादेशी क्रिकेटपटू मुस्तफिझूर रहमानला आयपीएलसाठी विकत घेतले, त्या मुस्तफिझूरला संघातून बाहेर काढावे, असे बागेश्वर धामचे धीरेंद्र कृष्ण शास्त्री म्हणाले. ■

### बांगलादेशी खेळाडूला केकेआर संघातून बाहेर काढा : शिवसेना



**मुंबई** : कोलकाता नाइट रायडर्स (केकेआर) संघाचे मालक शाहरुख खान यांना बांगलादेशी क्रिकेटपटू मुस्तफिझूर रहमानला संघातून काढून टाकण्याची विनंती शिवसेना नेते संजय निरुपम यांनी केली आहे. आयपीएलच्या लिलावात, कोलकातास्थित फ्रँचायझीने २०२६ च्या हंगामासाठी या बांगलादेशी वेगवान गोलंदाजाला ९.२० कोटी रुपयांच्या मोठ्या रकमेत करारबद्ध केले आहे.बांगलादेशात धार्मिक अल्पसंख्याकांविरुद्ध होत असलेल्या हिंसाचाराच्या वारंवारच्या घटनांच्या पृष्ठभूमीवर ही मागणी करण्यात आली आहे. या घडामोडींनंतर, केकेआरच्या या नवीन खेळाडूला आयपीएलमध्ये स्थान दिले जाऊ नये, असे मत अनेक जणांनी व्यक्त केले आहे. जेव्हा संपूर्ण देश बांगलादेशवर संतप्त आणि क्रोधीत आहे, तेव्हा भारतात बांगलादेशी लोकांशी किंचितही संबंध असलेल्या कोणत्याही व्यक्तीला त्या रागाचा लक्ष्य बनावे लागू शकते. ■

# स्योर्ड मरिन भारतीय महिला हॉकी संघाचे मुख्य प्रशिक्षक

**नवी दिल्ली, २ जानेवारी**

नेदरलँडचे स्योर्ड मरिन यांची शुक्रवारी भारतीय महिला हॉकी संघाच्या मुख्य प्रशिक्षकपदी पुन्हा नियुक्ती करण्यात आली. टोकियो ऑलिम्पिक क्रीडा स्पर्धेत संघाला ऐतिहासिक चौथ्या स्थानापर्यंत पोहोचवल्यानंतर ते पुन्हा या संघात परतले आहेत.



२०१७ ते २०२१ या काळात भारतीय महिला हॉकी संघाशी संबंधित असलेल्या ५१ वर्षीय मरिन यांना विश्लेषणात्मक प्रशिक्षक म्हणून मातियास विला यांचे सहकार्य मिळेल. अर्जेंटिनाचे माजी मिडफिल्डर असलेले विला यांनी १९९७ मध्ये आंतरराष्ट्रीय हॉकीमध्ये पदार्पण केले व २००० सिडनी ऑलिम्पिक व २००४ अथेन्स ऑलिम्पिकमध्ये आपल्या देशाचे प्रतिनिधित्व केले.


# व्हीनस विल्यम्सचे ऑस्ट्रेलियन ओपनमध्ये पुनरागमन

◆ **मेलबर्न, २ जानेवारी**

सात वेळा ग्रँड स्लॅम एकेरी विजेती ठरलेल्या व्हीनस विल्यम्सला मेलबर्नमध्ये १८ जानेवारीपासून सुरू होणाऱ्या ऑस्ट्रेलियन ओपनसाठी वाईल्ड-कार्ड प्रवेश मिळाला आहे.

व्हीनस वयाच्या ४५ व्या वर्षी ऑस्ट्रेलियन ओपनमध्ये पुनरागमन करीत आहे. ती आपल्या शेवटच्या सहभागानंतर ५ वर्षांनी तसेच पहिल्या सहभागानंतर २८ वर्षांनी ऑस्ट्रेलियन ओपनमध्ये परतली आहे.

१९९८ मध्ये, व्हीनसने दुसऱ्या फेरीत आपली धाकटी बहीण सेरेनाला हरवले होते, परंतु उपांत्यपूर्व फेरीत तिला अमेरिकन खेळाडू लिंडसे डेव्हनपोर्टकडून पराभव पत्करावा लागला होता. मी ऑस्ट्रेलियन ओपनच्या दोन आठवडे आधी न्यूझीलंडमधील ऑकलंडमध्ये खेळेल, अशी घोषणा व्हीनसने नोव्हेंबरमध्ये घोषणा केली होती. या स्पर्धेत तिला वाईल्ड कार्ड देखील मिळाले. व्हीनस विल्यम्सने एका आठवड्यानंतर व मेलबर्न पार्कमधील खेळ सुरू होण्यापूर्वी ऑस्ट्रेलियातील होबार्ट येथील स्पर्धेत खेळण्यासाठीही नाव नोंदवले आहे, असे ऑस्ट्रेलियन ओपनने सांगितले. ती शेवटची २०२१ मध्ये मेलबर्नमध्ये खेळली होती आणि महिला एकेरीत दोनदा उपविजेती ठरली आहे, २००३ आणि २०१७ मध्ये अंतिम फेरीत तिला सेरेनाकडून पराभव पत्करावा लागला होता. मी ऑस्ट्रेलियात परत आल्याबद्दल उत्साहित आहे आणि ऑस्ट्रेलियन उन्हाळ्यात स्पर्धा करण्यास उत्सुक आहे, असे विल्यम्स म्हणाली.माझ्या तिथे खूप अविस्मरणीय आठवणी आहेत आणि माझ्या कारकिर्दीसाठी इतके महत्त्वाचे असलेल्या ठिकाणी परत येण्याची संधी मिळाल्याबद्दल मी कृतज्ञ आहे, असे व्हीनस म्हणाली.



मेलबर्न पार्कमधील विल्यम्सची कामगिरी ५४ विजय आणि २१ पराभव अशी आहे. या वर्षी ती २२ व्यांदा मुख्य ड्रॉमध्ये सहभागी होईल.

व्हीनस विल्यम्स ऑस्ट्रेलियन ओपनच्या मुख्य ड्रॉमध्ये खेळणारी सर्वात वयस्कर महिला खेळाडू ठरणार आहे. ती जपानच्या किमिको डेटचा विक्रम मोडेल. किमिको २०१५ मध्ये मेलबर्न पार्कमध्ये पहिल्या फेरीत हरली, तेव्हा ४४ वर्षांची होती, असे ऑस्ट्रेलियन ओपनने सांगितले. डिसेंबरच्या अखेरीस, विल्यम्सने फ्लोरिडा येथील पाम बीच येथे डॅनिश-जन्मलेल्या मॉडेल आणि अभिनेता आंद्रे प्रीटीशी लग्न केले. ◀(वृत्तसंस्था)

# अण्णा वॉरियर्स क्रिकेट टीमच्या टी-शर्टचे अनावरण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २ जानेवारी-**

सोलापूर बार असोसिएशनमध्ये अण्णा वॉरियर्स क्रिकेट टीमचे टी शर्टचे अनावरण सोलापूर बार असोसिएशनचे अध्यक्ष बाबासाहेब जाधव यांनी केले. यावेळी उपाध्यक्ष रिया शेख, सचिव बसवराज हिंगमिरे, खजिनदार अरविंद देडे, सहसचिव मीरा प्रसाद, जिल्हा सरकारी वकील प्रदीपसिंह राजपूत, बार कौन्सिल ऑफ महाराष्ट्र गोवाचे विद्यमान सदस्य अॅड. मिलिंद थोबडे, अॅड. मल्लिनाथ पाटील साहेब, अॅड. अभय बिराजदार साहेब तसेच मुंबई हायकोर्टचे वकील विक्रांत फताटे, अॅड. असिम बांगी, अॅड. शिवशंकर घोडके, अॅड. चंद्रमोहन, अॅड. काका शिंदे, अॅड. अशोक जालादी, अॅड. संजय गायकवाड, अॅड. रविंद्र पाटील, अॅड. रेशमे आदी वकील उपस्थित होते. अॅड. परवेज ढालायत, रोहिदास पवार, अॅड. मोमीन मकसूद, अॅड. प्रकाश वाघमारे, अॅड. सुनिल कोळेकर, अॅड. दादासाहेब जाधव, अॅड. संतोष म्हमाणे,




अॅड. युवराज आवताडे, अॅड. राजेंद्र चव्हाण, अॅड. कबीर औटी, अॅड. सतोष हौसमनी, अॅड. बाबुशा साळुंखे, अॅड. सतीश गायकवाड, अण्णा वॉरियर्सचे सर्वेसर्वा अॅड. राजेंद्र फताटे व खेळाडू उपस्थित होते.

# ऑलिम्पिकवीर खाशाबा जाधव चरित्राच्या जनआवृत्तीचे प्रकाशन

### सातारा साहित्य संमेलनात खाशाबांच्या पुस्तक प्रकाशनाला प्रथम मान

**सातारा, दि. २ जानेवारी-**

भारताचे पहिले ऑलिम्पिक पदक विजेते खाशाबा जाधव यांच्या संजय दुधाणे लिखित चरित्राच्या जनआवृत्तीचे प्रकाशन अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनानिमित्त करण्यात आले. सातारा येथे सुरू असलेल्या संमेलनाच्या प्रकाशन मंचावर पहिले पुस्तक प्रकाशनाचा मान ऑलिम्पिकवीर खाशाबा या पुस्तकाला लाभला आहे. शाहू स्टेडियममधील साहित्य संमेलनाच्या प्रकाशन मंचावर संमेलन अध्यक्ष, ख्यातनाम साहित्यिक विश्वास पाटील यांच्या हस्ते ऑलिम्पिकवीर खाशाबा पुस्तकाचे शानदार प्रकाशन झाले. याप्रसंगी सार्वजनिक बांधकाम मंत्री श्री. छ. शिवेंद्रसिंहराजे भोसले, जिल्हा क्रीडाधिकारी मा. नितीन तारळकर, संमेलनाचे कार्याध्यक्ष विनोद कुलकर्णी, लेखक प्रा. संजय दुधाणे आदी मान्यवर उपस्थित होते.




खाशाबांच्या चरित्र पुस्तकाचे यंदा रौप्यमहोत्सवी वर्ष आहे. रौप्यमहोत्सव व साहित्य संमेलनाच्या निमित्ताने सवलतीच्या दरात पुस्तक प्रदर्शनात हे पुस्तक उपलब्ध होणार आहे. ८८ पानी चरित्र पुस्तक खाशाबांच्या दुर्मिळ छायाचित्रांनी सजले आहे. १९५२ च्या हेलसिंकी ऑलिम्पिक स्पर्धेत सातारचे सुपुत्र खाशाबा जाधव यांनी कुस्ती खेळात देशासाठी पहिले वैयक्तिक पदक जिंकले होते. त्याच्या ही ऐतिहासिक यशोगाथा २००० मध्ये क्रीडा लेखक संजय दुधाणे यांनी सर्वप्रथम लोकांसमोर आणली. ऑलिम्पिकवीर खाशाबा जाधव यांच्या पुस्तकाला मोठा प्रतिसाद मिळाल्याने हे पुस्तक केंद्र शासनाच्या नॅशनल बुक ट्रस्टनेही प्रकाशित केले होते. मराठीसह हिंदीमध्येही हे पुस्तक उपलब्ध आहे. ऑलिम्पिकवीर खाशाबा जाधव पुस्तक महाराष्ट्र शासनाच्या सर्वोत्कृष्ट पुस्तकाचा शाहू महाराज पुरस्काराने गौरवित झाले असून इयत्ता ९ वी नंतर आता ६ वीच्या पाठ्यपुस्तकातही याचा समावेश केला आहे.

# महाराष्ट्राची मुलींची घोडदौड, गुजरातवर मात






### ४४ वी राष्ट्रीय अजिंक्यपद कुमार गट खो-खो स्पर्धा

**बेंगलुरू, दि. २ जानेवारी-**

महाराष्ट्राच्या मुलींनी ४४व्या कुमार गट राष्ट्रीय अजिंक्यपद खो-खो स्पर्धेतील विजयी घोडदौड कायम ठेवली आहे. कर्नाटका खो-खो असोसिएशनच्या वतीने बेंगलुरू शहरातील गुंजर मैदानावर सुरू झालेल्या या स्पर्धेत महाराष्ट्राच्या मुलींनी गुजरातवर ३८-१२ अशी एक डाव राखून २६ गुणांनी मात केली. अष्टपैलू कामगिरी करणारे मैथिली पवार (३.४० मिनिट व २ गुण) व विद्या तामखेडे (५ मि. व २ गुण) आणि शानदार संरक्षण करणारी श्रावणी तामखेडे (२.४० व १.४० मि.) हे त्यांच्या विजयाचे शिल्पकार ठरले. गुजरातच्या यू. बराई (२.३० मि.) व कोचाडिया (१.०० व २ गुण) यांचे प्रयत्न अपुरे पडले.

**विदर्भच्या दोन्ही संघाची आगेकूच**

विदर्भच्या कुमार व मुली दोन्ही संघानी विजय मिळवित आगेकूच केली आहे. सूजल खांडेकर (१,१.४० मि. व २ गुण), मोहित नेवरे ( ३.३० मि. व २ गुण) व स्मीत कापसे (२.३० मि.) यांच्या बहारदार खेळीमुळे विदर्भच्या कुमारांनी मध्यप्रदेशला १३ गुण व १ डाव राखून सहज नमविले. मध्यप्रदेशच्या हर्षित विश्वकर्मा (१ मि.) व सागर कुटस्ते (४ गुण) यांचे प्रयत्न अपुरे पडले. विदर्भच्या मुलींनी चंदीगडवर २६ गुण व एका डावाने दणदणीत विजय मिळविला. यात श्रध्दा (४.२० मि. व ६ गुण), कोमल (४.४० मि. व २ गुण) यांनी अष्टपैलू खेळी केली. धनश्रीने ४ गुण मिळवित आक्रमणात साथ दिली. चंदीगडच्या महिमाने (१मि. व २ गुण) हिने एकाकी लढत दिली.

**कोल्हापूरचा जम्मू काश्मीरवर धुव्वा**

राष्ट्रीय स्पर्धेत कोल्हापूर व विदर्भचेही संघ स्वतंत्र सहभागी होत असतात. कोल्हापूरच्या मुलींनी जम्मू काश्मीरचा एक डाव राखून ४७ गुणांनी धुव्वा उडविला. यात भक्तीने २.२० मिनिटे पळती करीत आक्रमणात ६ गुण मिळविले. चैत्रालीने संरक्षणात १ व ५ मिनिटे व तर श्रावणी पाटीलने ४ मिनिटे पळतीचा खेळ केला.



# छत्रपती शिवाजी प्रशालेत क्रीडा महोत्सव उत्साहात सुरु

**सोलापूर, दि. २ जानेवारी-**

मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा या अभियानांतर्गत छत्रपती शिवाजी प्रशालेत वार्षिक क्रीडा महोत्सवाचा शानदार उद्घाटन सोहळा संपन्न झाला. स्कूल कमिटी चेअरमन विनाकराव पाटील व सोलापूर हँडबॉल असोसिएशनचे सचिव सुदेश मालप यांच्या हस्ते प्रतिमा पूजन केले. कार्यक्रमाची रुपरेषा कार्यक्रमाची सुरुवात रुपा खुर्द यांनी गायलेल्या स्वागत गीताने झाली. मुख्याध्यापिका जुगदार सुजाता महादेव यांनी प्रास्ताविक सादर करुन क्रीडा महोत्सवाचे महत्व अधोरेखित केले. पाहुण्यांचा परिचय घोडके एम. एस. यांनी करुन दिले. तसेच याप्रसंगी सर्व खेळाडूंना खेळ भावने विषयी शपथ देण्यात आली. गोरे एन. एस. यांनी वार्षिक क्रीडा अहवालाचे वाचन केले. श्री. मालप यांनी विद्यार्थ्यांना खेळातील संधी आणि आरोग्याचे महत्व यावर तसेच प्रा. संतोष गवळी व सोलापूर विद्यापीठाचे सिनेट सदस्य प्रा. सचिन गायकवाड यांनीही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. उपस्थित मान्यवरांच्या हस्ते मैदानाची पूजा करुन व मशाल प्रज्वलित करुन वार्षिक क्रीडा महोत्सवाचे उद्घाटन करण्यात आले. सूत्रसंचालन व्ही. एस. मोटे यांनी केले. देवकर एस. एल. यांनी आभार मानले.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्वाचे...




### करमाळ्याच्या संस्थेतर्फे कोरेगाव-भीमा येथे मोफत अन्नदान

**करमाळा, दि.२ जानेवारी-**

करमाळा येथील डॉ आंबेडकरवादी चळवळ व सामाजिक संघटना या संस्थेच्या वतीने शौर्यदिनानिमित्त कोरेगाव भीमा येथे येणाऱ्या भीम अनुयायांना मोफत अन्नदान करण्यात आले. विजयी स्तंभाला अभिवादन करण्यासाठी आलेल्या अनुयायांची गैरसोय होऊ नये म्हणून प्रत्येक वर्षी हा उपक्रम राबवला जातो. कोरेगाव भीमा येथे १ जानेवारीला भारताच्या काना कोपऱ्यातून लाखोंच्या संख्येने अभिवादन करण्यासाठी अनुयायी येतात. सुनिल खरात, राजू कांबळे, बाळू कसबे, दत्तात्रय कांबळे, सुशांत कांबळे, संजय कांबळे(आचारी), शहाजी लांडगे, रोहित कांबळे, मंगेश समिंदर, केतन कांबळे, महादेव थोरात, सुरज कांबळे, सुशील खरात, अजिंक्य कांबळे,शुभम पगारे, अजय कांबळे, प्रकाश कांबळे, पियुष कांबळे, सिद्धार्थ कांबळे, विशाल खरात, कविराज कांबळे, आनंद कटारे, विकी कांबळे, विशाल कांबळे, आशिष कांबळे, अनिकेत कांबळे, संघर्ष कांबळे, पिल्या कांबळे, आदित्य कुंभार, युवराज कांबळे, यश कांबळे, चिक्या कांबळे या सर्व सदस्यांनी परिश्रम घेतले.



### भीमा-कोरेगाव मशाल पदयात्रा यशस्वी

**वळसंग, दि.२ जानेवारी-**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पदस्पर्शाने पुनीत झालेल्या व ऐतिहासिक वारसा असलेल्या भूमीवरून अर्थातच वळसंग (ता. दक्षिण सोलापूर) गावातील दि.३० डिसेंबर रोजी युवा भीमसैनिकांनी एक जानेवारी निमित्त एक आगळावेगळा सर्वांनी मिळून निर्णय घेवून यशस्वी केले. भीमा कोरेगाव येथील विजय स्तंभाला मानवंदना देण्यासाठी ५०० वारसदार वळसंग गावामधून मशाल घेऊन मानवंदना देण्याचा संकल्प पूर्ण केला. सोलापुरातील डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करून ते भीमा कोरेगावकडे रवाना झाले होते. परत येताना सर्व भीमसैनिकांचा सोलापूर येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे पुतळ्यासमोर जय भीम जयघोषात सत्कार करण्यात आला.

### अंगणवाडी कर्मचारी संघातर्फे आज आनंद मेळावा

**सोलापूर, दि. २ जानेवारी-**

महाराष्ट्र राज्य अंगणवाडी कर्मचारी संघाच्यावतीने शनिवार दि.३ जानेवारी रोजी डॉ. निर्मलकुमार फडकुले सभागृहात दुपारी १२ वाजता क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंती दिनानिमित्त आनंद मेळावा आयोजित केला आहे. या मेळाव्यास सोलापूर जिल्हयातील सर्व अंगणवाडी सेविका मदतनिस उपस्थित राहणार असून या मेळाव्यास प्रमुख पाहुणे म्हणून आशा चित्रपटाचे निर्माती दैवता पाटील, दिग्दर्शक दिपक पाटील, आंबेडकरी विचारांचे ज्येष्ठ साहित्यीक दत्ता गायकवाड, भारतीय कम्युनिस्ट पार्टीचे ज्येष्ठ नेते कॉ. रा.गो. म्हेत्रस यांचे मार्गदर्शन होणार आहे. मेळाव्यास उपस्थित राहण्याचे आवाहन राज्य सरचिटणीस सूर्यमणी गायकवाड यांनी केले आहे.

# परप्रांतीय टोळीतील तीन आरोपींना अटक

### २० लाखांचा मुद्देमाल जप्त
### अकलूज पोलिसांची कारवाई

**दभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि.२ जानेवारी-**

यशवंतनगर येथील बी. एस. कंस्ट्रक्शनच्या ऑफीसमधून ५ लाख ४५ हजार रुपयांची रोख रक्कम घेऊन पोबारा केलेल्या परप्रांतीय टोळीतील तिघांना अकलूज पोलिसांनी थेट गुजरातच्या सापुतारा येथून अटक केली. तिघांनाही पाच दिवसांची पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे.



दि. २६ डिसेंबर रोजी अज्ञात चोरटयाने रक्कम चोरल्याची फिर्याद आनंद हणुमंतराव भोसले (रा. यशवंतनगर ता. माळशिरस) यांनी दिली होती. त्याप्रमाणे अकलूज पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला होता. सदर गुन्हयातील अज्ञात आरोपीचा तपास पोलीस उपनिरीक्षक विशाल कदम यांचे नेतृत्ताखाली सुरू होता. पोलीसांना घटनेच्या ठिकाणी काही संशयीताचे सीसीटिव्ही फुटेज प्राप्त झाले होते. सदरचे सीसीटिव्ही फुटेजमध्ये एक चार चाकी वाहनाचा नंबर प्राप्त झाला. तो नंबर व संशयीताचे फुटेज संपुर्ण देशातील पोलीसांचे वेगवेगळया व्हॉटसअॅप ग्रुपवर पाठविण्यात आले होते. सापुतारा पोलीस ठाणे (गुजरात) यांना देखील सदरचे फुटेज पाठविण्यात आले होते. सापुतारा पोलीस ठाणे हद्दीत नाकांबदी दरम्यान तीन संशयीत इसम मिळुन आल्याने व सीसीटिव्ही फुटेज मधील वाहन व इमस हे सदर इमसाशी मिळते जुळते असल्याने सापुतारा पोलीस ठाणे यांनी अकलुज पोलीस ठाणेशी संशयीताबाबत कळविले. त्याप्रमाणे पोलीस अधिक्षक यांचे आदेशान्वये पोसई कदम व तपास पथक सापुतारा येथे रवाना केले. सदर ताब्यात घेतलेल्या अनिलभाई रेवाभाई भांभोरे (वय २७ वर्षे), मिथुनभाई रेवाभाई भांभोरे (वय ३४ वर्षे) (दोघे रा. नाडेलगांव धुळ महोडी फलिया, ता. गरबाडा, जि. दाहोद राज्य गुजरात), वकील तेजसिंग भांभोरे (वय ३२ वर्षे रा. अंबाली खजुरीया शिमोडा, फलिया, ता. गरबाडा, जि. दाहोद) (राज्य गुजरात) यांचेकडे गुन्हयाचे अनुषंगाने तपास पथकाने तपास केला. आरोपीनी गुन्हा केल्याची कबुली दिली असून सदर गुन्हयात चोरी केलेला एकुण ५ लाख ४५ हजार रक्कमे पैकी ५ लाख,१३ हजार १८० हस्तगत केली असून गुन्हा करताना वापरलेले वाहन हुंडाई केटा कार क्रमांक GJ-२०CB-२६४६ जप्त केलेले आहे. सदर आरोपीना ताब्यात घेऊन ५ दिवस पोलीस कोठडी न्यायालयाकडुन मंजुर करुन घेत अधिकचा तपास केला असता त्यांनी अशाच प्रकारे सांगोला पोलीस ठाणे हददीत चोरी केल्याची कबुली दिली. त्या गुन्हयात चोरी केलेल्या चांदीचा मुददेमाल देखील आरोपीकडुन जप्त करण्यात आला आहे. सदर गुन्हयातील आरोपीनी गुन्हा करताना वापरलेली वाहन हुंडाई केटा कार क्रमांक GJ-२०CB-२६४६, तीन मोबाईल, एक लोखंडी कटावणी, एक काळया रंगाची बॅग, एक लोखंडी पक्कड असे एकुण २० वाख ३६ हजार ६८० रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.

सदरची कामगिरी पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, अपर पोलीस अधिक्षक प्रितम यावलकर, उपविभागीय पोलीस अधिकारी संतोष वाळके, पोलीस निरीक्षक निरज उबाळे यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे प्रकटीकरण शाखा अकलुजचे पोलीस उपनिरीक्षक विशाल कदम व पो. हवा. विक्रम घाटगे, पो. हवा. विनोद साठे, पो. हवा. सुहास क्षिरसागर, पो. हवा. शिवकुमार मदभावी, पो.हवा. आभिजीत कुंभार, पो. कॉ. रणजित जगताप, पो.कॉ. दत्तात्रय खरात, पो.कॉ. सोमनाथ माने, पो.कॉ. पंडीत गवळे तसेच सायबरचे पो. हवा. तांबोळी यांनी कामगिरी केली आहे.सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक विशाल कदम हे करीत आहेत.

अकलूज पोलिसांनी केलेल्या या कारवाईमुळे परप्रांतिय टोळीच्या मुसक्या आवळण्यात यश आल्याचे बोलले जात आहे. जिल्ह्यात अशा टोळ्यांचा सुळसुळाट सर्वत्र दिसून येत असल्याने भयाचे वातावरण आहे. याबाबत नागरिकांनी सतर्क राहून पोलिस प्रशासनास सहकार्य करणे गरजेचे आहे.

# अंतिम ऊसदर जाहीर करा अन्यथा शेतकरी उसाने मारतील

### शंकर गायकवाड यांनी दिला इशारा
### येडेश्वरी कारखान्यासमोर आंदोलन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर/बार्शी, दि. २ जानेवारी-**

बीडचे खासदार बजरंग सोनवणे यांच्या बार्शी तालुक्यातील येडेश्वरी साखर कारखान्याने पहिली उचल तीन हजार ऐवजी २८०० रुपये अशी कमी दिल्यामुळे सर्व शेतकरी संघटनांच्या वतीने आज या साखर कारखान्यावर आंदोलन करण्यात आले. त्यावेळी शेतकरी संघटनेचे प्रदेशाध्यक्ष शंकर गायकवाड म्हणाले की, अनेक आंदोलने केल्यानंतर या साखर कारखान्याने पहिली उचल आज तीन हजार रुपये जाहीर केली असली तरी कारखाना विकत घेतला त्यावेळी मात्र शेतकऱ्यांची बिले एफ.आर.पी. अधिक व्याज अशी न दिल्यामुळे आम्ही वारंवार शांततेच्या मार्गाने निवेदने दिली.



अनेक आंदोलने केली. परंतु तीन वर्षे होत आले तरी, अनेक तालुक्यातील कोट्यावधी रुपये या कारखान्याने अद्याप पर्यंत दिलेले नाही. ते तात्काळ द्यावे व अंतिम ऊस दरही जाहीर करावा, अन्यथा शेतकरी उसाने मारतील असा खणखणीत इशाराही यावेळी गायकवाड यांनी दिला. यावेळी संभाजी ब्रिगेडचे आनंद काशीद, शेतकरी संघटनेचे हनुमंत भोसले, स्वाभिमानीचे तालुकाध्यक्ष शरद भालेकर, शेकापचे रविकिरण कानगुडे, रयत क्रांतीचे कृष्णा काशीद, जनहित संघटनेचे राज्य प्रवक्ते रामराव काटे, रवींद्र मुठा, समाधान भालेकर, मुसा मुलानी, पप्पू आगलावे, पोपट आगलावे, विक्रम घायतीडक, विकास बारबोले, सदानंद आगलावे आदींसह बहुसंख्य शेतकरी उपस्थित होते. या आंदोलनावेळी चोख पोलीस बंदोबस्त पांगरी पोलीस स्टेशनचे पोलीस उपनिरीक्षक श्री.यावलकर व त्यांच्या सहकाऱ्यांनी ठेवला होता.



### बंकलगीच्या जि.प. शाळेत निघालेल्या सापाला केले मुक्त

**तभा वृत्तसेवा,**
**बंकलगी, दि.२ जानेवारी-**

बंकलगी (ता.दक्षिण सोलापूर) येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत खिडकीत बिळात साप असल्याचे मुलांच्या लक्षात आले. भयभीत विद्यार्थी तसेच शिक्षकांनी वेळ न दडवता प्राणीमित्र श्रीकांत बनसोडे यांना संपर्क साधला. श्रीकांत बनसोडे यांनी तात्काळ त्या ठिकाणी भेट देऊन साप पकडला. साप पकडल्या नंतर संबंधित सापाची संपूर्ण माहिती बनसोडे यांनी सांगितली. साप हा शत्रू नसून आपला मित्र कसा आहे याचे प्रबोधन केले होते.

सापाला व्यवस्थितरित्या पकडून निसर्गाच्या सानिध्यात मुक्त केल्याबद्दल शाळेच्या मुख्याध्यापिका, सरपंच, तसेच बंकलगी गावातील नागरिकांतर्फे बनसोडे यांचा सत्कार करण्यात आला.



### नुतन नगरसेवक इंगळे यांचा सत्कार

**अक्कलकोट, दि. २ जानेवारी-**

मेजर संदिप सलगरे मित्र परिवार यांच्यावतीने नुतन नगरसेवक माजी नगराध्यक्ष वटवृक्ष स्वामी समर्थ देवस्थान चे अध्यक्ष महेश इंगळे यांचा शाल फेटा बांधुन मनोज जाधव यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला . प्रभागातील नागरी समस्या मार्गी लावण्याचे आश्वासन नवनिर्वाचित नगरसेवक महेश इंगळे यांनी यावेळी दिले.

याप्रसंगी प्रथमेश इंगळे, मेजर संदिप सलगरे, मनोज जाधव, हिराचंद जामदार, नंदकुमार जगदाळे, ऋतुराज जामदार, सुतार, जाधव, संपादक प्रमोद मोरे, रमेश शिंदे, दर्शन घाटगे,,समर्थ स्वामी आदींसह प्रभागातील नागरिक उपस्थित होते.

# शहरात दररोज सुरळीत पाणीपुरवठा करा : मिलन कल्याणशेट्टी

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि.२ जानेवारी-**

मिलन कल्याणशेट्टी यांनी नगराध्यक्ष म्हणून निवडून आल्यानंतर शहरातील नागरी प्रश्न सोडवण्यासाठी एकच झपाटा सुरु केला आहे. अक्कलकोट येथील जलशुद्धीकरण केंद्र तसेच कुरनुर धरण येथील पंप हाऊस येथे भेट देऊन मार्चअखेर पर्यंत शहरातील सर्व घरांना नळ कनेक्शन जोडणी करून शहरात रोज सुरळीत पाणी पुरवठा करण्याचे संबंधित अधिकारी व ठेकेदार यांना आदेश त्यांनी दिले आहेत. त्यामुळे मे पासून शहराला रोज सुरळीत पाणी पुरवठा होईल अशी आशा आहे.



पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतून 'जल-सुरक्षित' आणि 'आत्मनिर्भर' भारत बनवण्यासाठी केंद्र सरकारच्या अमृत २ योजनांची कामे अक्कलकोट शहरात सुरु आहेत. सदर काम ठेकेदार ज्योती कंटरक्शन प्रोपा. विजय मुंडे यांना मिळाले असून या योजनेसाठी जीएसटी वगळून ६० कोटीं रुपये मंजूर आहेत. ४ ऑक्टोबर २०२४ ला कार्यारंभ आदेश दिले असून एप्रिल २०२६ पर्यंत मुदत आहे. मुदतवाढ देणार नसल्याची ठाम भूमिका नगराध्यक्ष कल्याणशेट्टी यांनी घेतली. त्यामुळे मार्च अखेरपर्यंत काम पूर्ण होईल व मे पासून शहराला रोज पाणी पुरवठा शक्य आहे. कुरनूर धरण ते अक्कलकोटपर्यंत १६ की.मी. अंतर आहे. यापैकी उर्वरित ८ की.मी. कामे दोन महिन्यात पूर्ण करणे, जलशुद्धीकरण केंद्राचे उर्वरित ३० टक्के काम, सर्व घरांना नळ कनेक्शन जोडणीचे काम, पाण्याच्या टाकीचे काम दीड महिन्यात पूर्ण करणेच्या सूचना नगराध्यक्ष कल्याणशेट्टी यांनी पाहणी वेळी दिल्या. यावेळी मंडलअध्यक्ष प्रदीप पाटील, नगरसेवक ऋतुराज राठोड, सुनिल सिध्दे, सुनील राठोडसह पाणी पुरवठा उपअभियंता मनोजकुमार ईश्वरकट्टी तसेच पाणीपुरवठा कर्मचारी उपस्थित होते.

## निधन वृत्त...

### डॉ. मोनिका गाजुल



**सोलापूर, दि. २ जानेवारी-**

अशोक चौक येथील दि आर्ट ऑफ लिव्हिंग शिक्षक डॉ. अंबादास गाजुल यांची मुलगी आणि डॉ. राजेंद्र गाजुल यांची पुतणी दंत रोगतज्ञ सर्जन डॉ. मोनिका अंबादास गाजुल (वय ३२) यांचे गुरूवारी दीर्घ आजाराने निधन झाले. त्यांच्यावर शुक्रवारी सकाळी पद्मशाली स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात आई, वडील, भाऊ असा परिवार आहे.

### बी.टी. पाटील



**सोलापूर, दि. २ जानेवारी-**

विजापूर रोड, नीरा पाम सोसायटी येथील रहिवासी बाळकृष्ण पाटील (बी. टी. पाटील) (वय-८२) यांचे आज दीर्घ आजाराने निधन झाले. एमएसइबीमध्ये सहाय्यक अभियंता म्हणून ते निवृत्त झाले होते. रोटरी क्लब ऑफ सोलापूरचे माजी सचिव होते. मोदी स्मशानभूमी येथे त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्य पश्चात पत्नी, तीन विवाहित मुली, नातू, नातवंडे असा परिवार आहे.

### रामबाई धारा



**सोलापूर, दि. २ जानेवारी-**

विजयनगर येथील रामबाई मल्लेशम धारा (वय-८०) दि.१ जानेवारी रोजी पहाटे प्रदीर्घ आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात बहीण, मुलगी, जावई, नातवंडे असा परिवार आहे. सिध्दारुढ महास्वामीजी (हुबळी) यांच्या परमभक्त होत्या.

### अनिलकुमार इंगळेकर



**शहाबाद, दि. २ जानेवारी -**

अनिलकुमार लक्ष्मण इंगळेकर (वय ४०) यांचे आकस्मित निधन झाले. त्यांच्या पश्चात चार बहिणी असा परिवार आहे.

# शाकंभरीदेवी नवरात्रोत्सवाची आज सांगता; भाज्यांचे भाव वधारले

### अनेकांकडे कुळधर्म, कुळाचारासाठी असते ६० प्रकारच्या भाज्यांचा नैवेद्य

**तभा वृत्तसेवा । महेश भंडारकवठेकर**
**पंढरपूर, दि.२ जानेवारी -**

शाकंभरी पौर्णिमेनिमित्त कुळधर्म, कुळाचारासाठी लागणाऱ्या विविध प्रकारच्या साठ भाज्यांची किंमत येथील बाजारात शुक्रवारी (ता.२) तब्बल १ हजार २५१ रुपये होती. येथील भाजी मार्केटमध्ये शहरातील देवमारे कुटुंबियांकडून गेल्या चार पिढ्यांपासून या भाज्यांची विक्री केली जाते. पंढरपूरात काही कुटुंबियांचे शाकंभरी देवी हे कुलदैवत असल्यामुळे या कुटुंबियांकडून दरवर्षी शाकंभरी पौर्णिमेला शाकंभरीच्या नवरात्रोत्सवाची सांगता होते. त्यामुळे यादिवशी घरात कुळधर्म, कुळाचार करण्याची पध्दत आहे. त्यासाठी या भाज्यांची आवर्जून त्यांच्याकडून खरेदी केली जाते.



भारताची दक्षिण काशी तथा तिर्थक्षेत्र पंढरपूर येथे बनशंकरी म्हणजेच शाकंभरी नवरात्र उत्सव पुर्व परंपरेप्रमाणे अत्यंत उत्साहात साजरा केला जातो. शाकंभरी देवीला तब्बल ६० प्रकारच्या विविध भाज्यांचा नैवेद्य दाखवला जातो. वैशिष्ठ म्हणजे रामप्रहरी सकाळी ६ वाजता म्हणजे घरमाशी उठायच्या आत देवीला नैवेद्य दाखवून भोजन द्यावे लागते. त्यामुळे शाकंभरी नवरात्र साजरा होणाऱ्या घरातील स्त्रियांना मध्यरात्रीच उठून स्वयंपाकाची तयारी करावी लागते. पंढरपूर येथील परिचारक, कटेकर, पूजारी, आवताडे, ऐतवाडकर, सप्ताश्व ही घराणी शेकडो वर्षांच्या पूर्वजांच्या परंपरेनुसार शाकंभरी नवरात्र साजरा करतात. येथील लिंगायत वाणी समाजातील काही कुटुंबियांचे देखील शाकंभरी देवी हे कुलदैवत आहे. त्यांच्या घरातून देखील कुळधर्म, कुलाचार केला जातो. या निमित्ताने कधीही न पाहिलेल्या दुर्मिळ अशा आयुर्वेदिक गुणांनी युक्त आरोग्यदायी फळभाज्या, पालेभाज्या खाण्यात येतात. पंढरपूर येथील देवमारे कुटुंबीय खास देवीची सेवा म्हणून या दुर्मिळ भाज्या विक्रीसाठी उपलब्ध करुन देतात. विशेष म्हणजे लातूर, पुणे आणि सोलापूर या तीन जिल्ह्यासह आजूबाजूच्या खेडेगावात रानोमाळ भटकत या भाज्या देवमारे कुटुंबियांकडून गोळा केल्या जातात. यासाठी त्यांना पाच ते सात दिवस लागतात.येथील देवमारे कुटुंबियातील गणपत देवमारे, राजाराम देवमारे, बसवेश्वर देवमारे, प्रवीण देवमारे हे चौघांनी फिरून दुर्मिळ भाज्या गोळा केल्या आहेत. देवमारे यांची ही चौथी पिढी आहे. दरम्यान कुळधर्म, कुळाचारासाठी येथील काही कुटुंबियांकडून नव्वद, शंभर तर काही कुटुंबियांकडून साठ भाज्यांची खरेदी करण्याची परंपरा आहे. पूर्वीप्रमाणे शंभर किंवा त्याहून अधिक भाज्या एकाचवेळी सध्या मिळत नाहीत. मात्र देवमारे कुटुंबिय अथक परिश्रम करुन विविध प्रकारच्या ६० ते ८० भाज्या उपलब्ध करुन देतात. यावर्षी देवमारे यांनी ८८ विविध प्रकारच्या भाज्या उपलब्ध करुन दिल्या आहेत. यामध्ये तब्बल ४५ फळभाज्या तर ४२ पालेभाज्यांचा समावेश आहे.

### आठ दिवस फिरुन गोळा कराव्या लागतात भाज्या

देवीस शंभर किंवा साठ प्रकारच्या विविध भाज्यांचा नैवेद्य दाखवावा लागतो पण पंढरीतील देवमारे कुटुंबीय खास सेवा म्हणून आठ आठ दिवस फिरून या दुर्मिळ रानभाज्या गोळा करतात येथील इंदिरा गांधी भाजी मार्केट मध्ये एक सेट १ हजार २५१, रुपयांना मिळतो,या भाज्या खरेदी करण्यासाठी पहाटे पासुन गर्दी असते, उशीर झाला तर भाज्या संपून जातात.

### या भाज्यांचा असतो समावेश

शांकभरी निमित्त लागणाऱ्या भाज्यात कोहाळे, आवळा, केव डागर, काशी भोपळा, काळी कोयरी, काळ माशी गड्डा, शिंगोळी, चिंच, उंबर दिंडी, काळा माका, मुकणी, राजगिरा, तांदुळसा, मुखणी, राजहंस, वासनी तेल, पाथर, कातमोडा, चिल, कडीपत्ता, मेहरी, माठ, काटेमार, कुजीर, कासुदा, अंबाडा, जवस, चुका, चाकवत, चुची, कपाळफुटी, जवस, सुपारी वेल, काड कुसुळा, तुरी, दुधनी, पडवळ, तोंडली, पटाडी शेंग, गोकर्ण शेंग, कवठ, बोर, केळी, कडे बळा, केळी फुल, रताळी वेल, कामुळ्या, आळू, आळु गड्डा, पपई, हरभरा, गाजर, गाजरपाला, मेथी, काशी भोपळा, पुदिना, देशी टोमॅटो, हादगा फुल, हादगा शेंग, हादगा पाला, रान पावटा, शेवगापाला, शेवगा शेंगा, मुळापाला, मुळा, मुळा शेंगा, वांगी, दोडका, गवारी, भेंडी, घेवडा, पावटा, दुधी भोपळा, वाळुक, कारले, कोबी, फ्लॉवर कोबी, गाजर, वाटाणा, शेपू, चिघळ, पालक, मिरची, करडा, घोळ, कोथींबीर, घोसावळे, चवळी, तुरी आदीं ८७ ते ८८ प्रकाराचा भाज्या गोळा केल्या जातात.

# टेंभुर्णीत वाळू माफियांचा पोलिसावर हल्ला

## वकिलावरही झाला होता हल्ला; कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न ऐरणीवर

**तभा वृत्तसेवा,**
**टेंभुर्णी, दि.२ जानेवारी-**

वाळू माफियांनी थेट कर्तव्यावरील पोलिस कर्मचाऱ्यावर जिवे ठार मारण्याचा प्रयत्न केल्याची घटना आलेगाव बुद्रुक (ता.माढा) येथे घडली. एक महिन्यापूर्वीच एका वकिलावर हल्ला झाला होता. त्यामुळे टेंभुर्णी पोलीस ठाणे हद्दीत कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

डायल ११२ वरून मदतीचा कॉल आल्यानंतर घटनास्थळी गेलेल्या टेंभुर्णी पोलीस ठाण्यातील पोलिस कॉन्स्टेबल महेंद्र अशोक शेटे यांच्यावर जिवे ठार मारण्याच्या उद्देशाने हल्ला केल्याची धक्कादायक घटना घडली. या प्रकरणी सरकारी कामात अडथळा, मारहाण व खुनाचा प्रयत्न या गंभीर कलमान्वये तीन आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून, आरोपींच्या शोधासाठी दोन स्वतंत्र पथके तैनात करण्यात आली आहेत. टेंभुर्णी पोलिस ठाण्याकडून मिळालेल्या माहितीनुसार, दि. १ जानेवारी रोजी दुपारी सुमारे ३ वाजता पोलिस कॉन्स्टेबल शेटे हे डायल ११२ ड्युटीवर कार्यरत असताना महादेव तुपसौंदर (रा. अकुंबे, ता. माढा) यांनी दोन इसमांनी मारहाण केल्याची माहिती देत स्वतःच्या जिवाला धोका असल्याचे सांगून पोलिस मदतीची मागणी केली होती. त्यानुसार शेटे तातडीने घटनास्थळी रवाना झाले.





आलेगाव बुद्रुक येथील भिमानगर रोडलगत महादेव तुपसौंदर यांना भेटून पोलीस शेटे हे सरकारी गणवेशात त्यांच्याशी बोलत होते. त्याचवेळी ग्रे रंगाची विटारा ब्रिझा भरधाव वेगाने तेथे आली. गाडीतून उतरलेल्या तीन इसमांनी पोलिस गणवेश पाहताच, तू इथे का आलास? असे म्हणत वाद घालण्यास सुरुवात केली. शेटे यांनी शासकीय कर्तव्य बजावण्यासाठी आलो असल्याचे सांगताच आरोपी अधिकच आक्रमक झाले. तिघांनी एकत्रितपणे शेटे यांची गच्ची पकडून धक्काबुक्की करत लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. मध्यस्थी करण्याचा प्रयत्न करणाऱ्या तुपसौंदर यांनाही ढकलून दिले. आरोपींनी शेटे यांना खाली पाडून काठीने त्यांच्या उजव्या हातावर मारहाण केली. यावेळी एकाने दगडाने डोक्यावर वार करण्याचा प्रयत्न केला. वार चुकवतानाच दगड त्यांच्या डोक्याच्या मागील बाजूस लागल्याने शेटे यांना चक्कर येऊन ते खाली बसले. इतक्यावरच न थांबता आरोपींपैकी एकाने, या पोलिसाला जिवंत सोडायचे नाही, असे म्हणत पुन्हा दगडाने हल्ला करण्याचा प्रयत्न केला. सरकारी गणवेशातील पोलिसावर होत असलेली मारहाण पाहून रस्त्यावरील नागरिकांनी गाड्या थांबवत तत्काळ हस्तक्षेप केला. नागरिकांच्या मदतीने पोलिस कॉन्स्टेबल शेटे यांची सुटका झाली. गर्दी वाढताच आरोपी आपली गाडी घेऊन घटनास्थळावरून फरार झाले. जखमी पोलिस कॉन्स्टेबल शेटे यांच्यावर मार्स हॉस्पिटल, टेंभुर्णी येथे उपचार करण्यात आले. उपचारानंतर त्यांनी दिलेल्या फिर्यादीवरून रविंद्र रामचंद्र चंदनकर, रामचंद्र तुकाराम चंदनकर (दोघे रा. आलेगाव बुद्रुक, ता. माढा, जि. सोलापूर) तसेच रामचंद्र तुकाराम चंदनकर यांचा जावई यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक प्रशांत मदने करीत असून आरोपींच्या अटकेसाठी दोन पथके सक्रिय आहेत.



कर्तव्य बजावत असताना पोलिसांवर झालेल्या हल्ल्याप्रकरणी आरोपींना कोणत्याही परिस्थितीत सोडले जाणार नाही. त्यांना लवकरात लवकर अटक करून कारवाई केली जाईल.
- **नारायण पवार,** पोलीस निरीक्षक टेंभूर्णी

**२०२२ मधील वाळू माफियांचा हल्ला :** २०२२ मध्ये गारआकोले गावात टेंभुर्णी पोलीस स्टेशनचे पोलीस देशमुख-माने व त्यांच्या सहकाऱ्यांवर वाळू माफियांनी वाहन घालण्याचा प्रयत्न केला होता. या घटनेत पोलिसांच्या मोटरसायकलचे नुकसान झाले होते.

**पोलिस पथकांवर दगडफेक :** मारहाण प्रकरणाच्या चौकशीसाठी गेलेल्या पोलिस पथकावर जमावाने हल्ला केला होता. पोलीस उपनिरीक्षक अजित मोरे, पोलीस नाईक विनोद साठे यांच्यासह कर्मचाऱ्यांवर दगडफेक व धक्काबुक्की करण्यात आली होती. या प्रकरणी ११ जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला होता.

**आलेगाव बुद्रुकची ताजी घटना :** कर्तव्य बजावत असताना पोलिस कॉन्स्टेबल महेंद्र शेटे यांच्यावर हल्ला होणे ही अत्यंत गंभीर व चिंताजनक बाब असून यामुळे पोलीस दलाच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

**राजकीय सवाल :** अवघ्या एका महिन्यात दोन गंभीर घटना घडत असताना आता तरी कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी ठोस पावले उचलली जाणार का? असा सवाल उपस्थित होत आहे.

## महत्वाचे...

### भाऊसाहेब गांधी प्रतिष्ठानची उद्या राज्य वक्तृत्व स्पर्धा

**सोलापूर, दि.२ जानेवारी-**



श्री भाऊसाहेब गांधी प्रतिष्ठान व श्री ऐलक पन्नालाल दिगंबर जैन पाठशाळा संचलित वालचंद शिक्षण समूह यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित श्री भाऊसाहेब गांधी राज्य वक्तृत्व स्पर्धा रविवार, ४ जानेवारी रोजी स. ९ वाजता वालचंद कॉलेज ऑफ आर्ट्स अ‍ॅन्ड सायन्सच्या वालचंद सभागृहात आयोजित केली आहे. इतिहास, साहित्य व रंगभूमीचे अभ्यासक अ‍ॅड.आनंद रामचंद्र देशपांडे हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत. अध्यक्षस्थानी संस्थेचे मानद सचिव डॉ.रणजित गांधी हे असणार आहेत, असे प्राचार्य डॉ.अश्विन बोन्दार्डे, प्राचार्य डॉ. सत्यजित शहा, डॉ.संतोष कोटी यांनी कळविले आहे.



### वानकरांच्या घरात घरफोडी करणाऱ्याला अटक; २० लाखांचा मुद्देमाल जप्त

**सोलापूर, दि.२ जानेवारी-**

सोलापुरातील बडे राजकीय प्रस्थ मानल्या जाणाऱ्या प्रकाश वानकर यांच्या घरात झालेल्या घरफोडीचा पोलिसांनी छडा लावला. यातील गुन्हेगाराला अटक आणि २० लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. शहर गुन्हे शाखेने एका मोठ्या आंतरराज्य घरफोडीचा छडा लावत तेलंगणातील एका सराईत गुन्हेगाराला बेड्या ठोकल्या आहेत. दि.२७ डिसेंबर २०२५ रोजी सलगरवस्ती पोलिस ठाण्याच्या हद्दीतील 'राजमुद्रा रेसिडेन्सी' दामोदर निवास येथे राहणारे प्रकाश दामोदर वानकर यांच्या घरात धाडसी घरफोडी झाली होती. चोरट्यांनी १३ लाख ५० हजार रुपयांची रोकड लंपास केली होती. याप्रकरणी सलगरवस्ती पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. तपासादरम्यान मिळालेल्या माहितीनुसार, १ जानेवारी २०२६ रोजी गुन्हे शाखेने मोईन मौलानासाब दुधेकुला (वय-२९, रा.नरसापूर, जि.विकाराबाद, तेलंगणा) याला ताब्यात घेतले. आरोपी मोईन याने सीसीटीव्ही कॅमेऱ्याचा डीव्हीआर समजून चुकून इंटरनेट राऊटर चोरुन नेला होता. हाताचे ठसे उमटू नयेत म्हणून त्याने हाताला रुमाल बांधून चोरी केली होती. चोरीच्या पैशातून तो गोव्याला जाऊन मौजमजा करण्याच्या तयारीत होता, मात्र त्याआधीच सोलापूर पोलिसांनी त्याच्या मुसक्या आवळल्या. आरोपीकडून १३ लाख ५० हजार रुपये, ७ लाख रुपये किंमतीची स्विफ्ट कार, २ हजार रुपये किमतीचा इंटरनेट राऊटर असा २० लाखांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.



# ग्रंथालये डिजिटल होणे काळाची गरज : कुलगुरू डॉ. महानवर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२ जानेवारी-**

बदलत्या तंत्रज्ञानाच्या युगात विद्यापीठे व महाविद्यालयांतील ग्रंथालयांनीही आमूलाग्र परिवर्तन स्वीकारणे आवश्यक आहे. पारंपरिक छापील ग्रंथांसोबतच डिजिटल स्वरूपातील ज्ञानसाधने उपलब्ध करून देणे काळाची गरज आहे, असे प्रतिपादन पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे कुलगुरू प्रा.डॉ. प्रकाश महानवर यांनी केले.

विद्यापीठातील कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे ज्ञानस्रोत केंद्राच्या वतीने पीएम उषा विभागाच्या सहकार्याने ग्रंथालय क्षमता विकास कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी कुलगुरू डॉ. महानवर हे बोलत होते. यावेळी डॉ. सुभाष चव्हाण तसेच उल्हासनगर येथील ग्रंथालय क्षेत्रातील तज्ज्ञ डॉ. दत्तात्रय काळबंडे यांची प्रमुख उपस्थिती होती.

प्रास्ताविक डॉ. अनिल घनवट यांनी केले. डॉ. सुभाष चव्हाण आणि तज्ज्ञ दत्तात्रय काळबंडे यांनी डिजिटल ग्रंथालय संकल्पना, ई-संसाधनांचे व्यवस्थापन, आधुनिक ग्रंथालय सेवा आणि भविष्यातील आव्हाने यावर मार्गदर्शन केले. या कार्यशाळेसाठी डॉ.एस.व्ही. लोणीकर, डॉ.एस.एस. सूर्यवंशी, पी.टी. रणदिवे, पंकज जावळे उपस्थित होते. सूत्रसंचालन डॉ. तेजस्विनी कांबळे यांनी केले. ग्रंथालय सहायक डॉ. पल्लवी सावंत यांनी आभार मानले.

# दूध उत्पादक शेतकरी आर्थिक चक्रव्यूहात

## पशुखाद्याचा खर्च जास्त, चाऱ्याची टंचाई

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२ जानेवारी**

राज्यातील दूध उत्पादक सध्या दुहेरी संकटात सापडला आहे. पशुखाद्याच्या किमतीत वाढ आणि चाराटंचाईने कंबरडे मोडले असताना, दुसरीकडे गेल्या सहा महिन्यांपासून दुधाच्या खरेदी दरात कोणतीही वाढ झालेली नाही. त्यामुळे उत्पादन खर्च वाढूनही उत्पन्न घटल्याने दूध उत्पादक शेतकरी आर्थिक चक्रव्यूहात अडकला आहे.

राज्याचे दूध संकलन प्रतिदिन सुमारे दोन ते सव्वादोन कोटी लिटरपर्यंत होते. त्यात सर्वाधिक जवळपास ७० टक्के गाईंच्या दुधाचा समावेश आहे. सध्या गाईच्या दुधाला प्रतिलिटर ३६ ते ३७ रुपये दर मिळत आहे. तर म्हशीच्या दुधाला प्रतिलिटर ५० ते ५२ रुपये मिळत आहेत. साधारण सहा महिन्यांपूर्वी १ जूनला गाईच्या दुधाचा दर १ रुपयांनी आणि म्हशीच्या दरात २ रुपयांनी कपात केली आहे.

तेव्हापासून आजपर्यंत दूध दरात एक पैशांचीही वाढ झालेली नाही. राज्यातील एकूण दूध उत्पादनांपैकी दूध पावडर, बटर



यासाठी ३५ ते ४० टक्के दूध वापरले जाते. तर उर्वरित ६०-६५ टक्क्यांपर्यंतचे दूध पिशव्यांमधून विकले जाते. सध्या प्रक्रियायुक्त पदार्थांचे दर मात्र चांगलेच तेजीत आहेत. उलट दुधाची कमतरता, या नावाखाली त्यांचे दर भरमसाट वाढलेले आहेत, ही वस्तुस्थिती आहे.

**पशुखाद्याचे भाव तेजीत**

प्रति ५० किलोच्या शेंगापेंडीचे पोते आधी १७०० ते १८०० रुपयांपर्यंत मिळत होते, ते आता २२०० ते २५०० रुपयांवर पोचले आहे. ५० किलोचे गहू भुशाचे पोते पूर्वी १००० रुपयापर्यंत होते, ते आता १४०० रुपयांवर आहे. सुग्रासचे ५० किलोचे पोते १२०० रुपयांपर्यंत मिळत होते, तेही आता १८०० रुपयांवर आला आहे. २०० ते ४०० रुपयांच्या फरकाने पशुखाद्यांच्या दरात वाढ झाली आहे.


**जनावरांच्या किंमतीत घसरण**

दूध व्यवसाय तोट्यात जात असल्याने बाजारात गाई-म्हशींच्या किमती निम्म्याने घटल्या आहेत. लाख रुपयांची जर्सी गाय आता ५० ते ६० हजारांत मिळत आहे, तर लाखाच्या घरातील म्हशी ६० ते ७० हजारांवर आल्या आहेत. नवीन जनावरे खरेदी करण्याकडे शेतकऱ्यांनी पाठ फिरवली आहे. उलट जनावरे विक्रीकडे त्यांचा सर्वाधिक कल वाढतो आहे.

**दूध उत्पादनात १० ते २० टक्क्यांची घट**

दूध हंगामाचा सध्या पुष्ट काळ असला, तरी वाढती थंडी, चाऱ्याची टंचाई या कारणामुळे राज्याच्या एकूण दूध उत्पादनात जवळपास १० ते २० टक्क्यांनी घट झाली आहे. १० लिटर दूध देणारी गाय आता ७-८ लिटरवर आली आहे. त्यामुळे एकीकडे दुधाचे अपेक्षित उत्पादन नाही, तर दुसरीकडे दुधाला दर नाही, या दोन्हीत मात्र शेतकऱ्यांची पुरती कोंडी झाली आहे.




**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी.** ● समूह मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे.**● मुख्य संपादक :**प्रशांत वसंतराव माने** दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi -** Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

सोलापूर दिनांक

**सोलापूर तरुण भारत**, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## तूर काढण्यावरून वाद; शेतकऱ्यास जीवे मारण्याची धमकी

**सोलापूर, दि. २ जानेवारी-**

केगाव येथे शेतजमिनीतील तूर काढण्यावरून झालेल्या वादातून शेतकऱ्यास शिवीगाळ व जीवे मारण्याची धमकी दिल्याची घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी फौजदार चावडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मल्लिनाथ काशिनाथ पाटील (वय-६१, रा.केगाव, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे की, दि.२४ डिसेंबर रोजी सायंकाळी ६ वाजण्याच्या सुमारास केगाव येथील गट क्रमांक ७३-१ मधील शेतजमिनीत फिर्यादी व त्यांचे पुत्र तेजस पाटील व ओंकार पाटील हे तूर काढण्यासाठी हार्वेस्टर मशिन घेऊन आले होते. तूर काढण्यापूर्वी पूजाविधी करुन काम सुरु करीत असताना गौतम सदाशिव बनसोडे, यल्लाबाई गौतम बनसोडे व त्यांच्या सोबतचे अनोळखी व्यक्तींनी हार्वेस्टर मशिन अडवून, या शेताचे कागद आमच्या नावावर आहेत, ही तूर आम्ही पेरलेली आहे, असे म्हणत त्यांच्यासह मशिनचे मालक संजय भोसले यांना मशिन बंद करण्यास सांगितले. पुन्हा तूर काढण्यासाठी मशिन आणल्यास गुडघ्यापासून पाय कापणार असल्याची धमकी गौतम बनसोडे यांनी दिली. तसेच तुमच्यावर आणि मध्ये पडणाऱ्या व्यक्तींवर ॲट्रॉसिटीचा गुन्हा दाखल करू, अशी धमकी देत फिर्यादीच्या शेतात अतिक्रमण केल्याचे फिर्यादीत नमूद आहे. पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक डी. पाटील हे करीत आहेत.



### महत्वाचे...

### भीशीच्या पैशाच्या कारणावरुन मारहाण

**सोलापूर, दि.२ जानेवारी-**

भीशीच्या पैशाच्या कारणावरुन एका जणावर विटेने हल्ला करून त्याच्या पत्नीस मारहाण करण्यात आल्याची घटना शेळगी परिसरातील विद्या नगर येथे घडली. याप्रकरणी जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात तिघांविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अरिफ सत्तार शेख (वय-४३, रा.भवानी पेठ, सोलापूर) यांनी ९ डिसेंबर रोजी भीशीचे पैसे मागण्यासाठी गेलो होतो. बंदेनवाज सय्यद याने यापूर्वी दिलेल्या तीन लाख रुपयांच्या चेकची माघारी मागणी केली. यात वाद निर्माण झाला. यातून बंदेनवाज सय्यद याने डोक्यात विटेने मारहाण केली. रियाज सय्यद व बंदेनवाज सय्यद यांची पत्नी यांनी फिर्यादीच्या पत्नीस हाताने व लाथाबुक्क्यांनी मारहाण केली, असे फिर्यादीत नमूद आहे. दि.३१ डिसेंबर २०२५ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला. तपास सहायक पो.उपनिरीक्षक जगताप करीत आहेत.

### बंद घर फोडून मुद्देमाल केला लंपास

**सोलापूर, दि.२ जानेवारी-**

सदर बझार पोलीस ठाण्याच्या हद्दीत बंद घर फोडून चोरी झाल्याची घटना उघडकीस आली. याप्रकरणी सदर बझार पोलीस ठाण्यात गुन्हा अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फिर्यादी परवेज निसार अहमद गोलेवाले वय ३५ राहणार ०१, शिरपा अपार्टमेंट, फॉरेस्ट, सोलापूर हे ३० डिसेंबर रोजी दुपारी २.३० ते ४.३० वाजण्याच्या सुमारास घराबाहेर गेले असता अज्ञात इसमाने त्यांच्या बंद घराचे कडी-कोयंडा उचकडून घरात प्रवेश केला. घरातील बेडरूममधील कपाटात ठेवलेली रोख रक्कम व सोन्याचे दागिने असा एकूण १ लाख ४० हजार ८०० रुपयांचा मुद्देमाल चोरून नेल्याचे निदर्शनास आले. या चोरीबाबत ३१ डिसेंबर २०२५ रोजी पहाटे १२.२८ वाजता तक्रार दाखल करण्यात आली. पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक काटे हे करीत आहेत.

### गुटखा, पानमसालासह १४ लाखांचा मुद्देमाल जप्त

**सोलापूर, दि.२ जानेवारी-**

प्रतिबंधित गुटखा, पानमसाला, सुगंधित तंबाखूचा साठा करून विक्री व वाहतूक केल्याप्रकरणी पोलिसांनी कारवाई केली. या कारवाईत एकूण १४ लाख ३ हजार १६० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. याप्रकरणी अनिल मस्के (वय-३३), अक्षय मस्के (वय-३०) या दोघांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दि.३१ डिसेंबर रोजी सकाळी ६.३० ते सायंकाळी ४.३० या कालावधीत सांगोला येथील एखतपूर रोड परिसरातील मस्के कॉलनी येथे ही कारवाई करण्यात आली. एम.एच.१२ डी.वाय.९३९१ या क्रमांकाचे चारचाकी वाहनासह गुटखा, पानमसाला असा अंदाजे १४ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. जप्त करण्यात आलेल्या प्रतिबंधित अन्नपदार्थांचे खरे मालक कोण? हा साठा कोणाला पुरवठा करण्यासाठी होता? संबंधित वाहन, गोडाऊन व कंपाऊंड जागेची मालकी कोणाची आहे? याबाबत पोलिस अधिक तपास करीत आहेत.

# अधिकृत उमेदवारांना पक्षांतर्गत आव्हानांचा करावा लागणार सामना




## ● पक्षनिष्ठ बंडखोर दाखविणार हिसका

**तभा वृत्तसेवा । अविनाश गायकवाड**
**सोलापूर, दि.२ जानेवारी-**

महानगरपालिका निवडणुकीच्या उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या अखेरच्या दिवशी राजकारणात प्रचंड नाट्यमय घडामोडी घडल्या. अर्ज मागे घेताना निवडणूक कार्यालयापुढेच २ ते ३ वेळा पोलिस, कार्यकर्त्यांमध्ये शाब्दिक चकमकी झाल्या. सकाळपासून ते दुपारी ३ वाजेपर्यंत राजकीय हालचालींनी वातावरण चांगलेच तापले होते. भाजपसह सर्वच प्रमुख पक्षांमध्ये उमेदवारीवरून मोठी उलथापालथ झाली असली, तरी सर्वाधिक गोंधळ आणि बंडखोरी भाजपमध्येच पाहायला मिळाली. अनेक ठिकाणी नाराज कार्यकर्त्यांनी थेट बंडखोरीचा झेंडा उंचावल्याने भाजपच्या अधिकृत उमेदवारांसमोर मोठे आव्हान उभे राहिले आहे. पक्षनिर्मितीपासून निष्ठावंत राहिलेल्या कार्यकर्ते-पदाधिकाऱ्यांनी पुकारलेल्या बंडाचा विविध पक्षांना मोठा फटका बसण्याची शक्यता वर्तवली जात आहे.



पालकमंत्री जयकुमार गोरे यांना जिल्ह्यातील नगरपालिका निवडणुकीत यश मिळाल्याने शहरातील काही लोकप्रतिनिधी, पदाधिकाऱ्यांना सोबत घेवून सर्व प्रभागांमध्ये जिंकण्याच्या उद्देशाने उमेदवारांची यादी जाहीर केली आहे. मात्र, अपेक्षेपेक्षा अधिक इच्छुक असल्याने अनेकांना उमेदवारी नाकारण्यात आली. पक्षाने दिलेल्या आदेशानुसार काही इच्छुकांनी आपले अर्ज मागे घेत पक्षनिष्ठा दाखवली. मात्र, अनेक जुने व निष्ठावंत कार्यकर्ते, माजी नगरसेवक यांनी अन्याय झाल्याची भावना व्यक्त करत बंडखोरीचा मार्ग स्वीकारला. अनेक प्रभागांत भाजपच्या अधिकृत उमेदवारांविरोधातच भाजपच्या लोकांनी अपक्ष म्हणून उमेदवारी कायम ठेवली आहे. काही ठिकाणी तर थेट भाजप बंडखोर पॅनल उभे राहत असल्याचे चित्र निर्माण झाले आहे.आम्ही वर्षानुवर्षे पक्षासाठी काम केले, मात्र आम्हाला डावलले गेल्याचे सांगत काही कार्यकर्त्यांनी माघार घेण्यास स्पष्ट नकार दिला. त्यामुळे भाजपला विरोधकांपेक्षा अधिक धोका स्व:पक्षातील बंडखोरांकडून निर्माण होण्याची शक्यता आहे. भविष्यात कोणत्या तरी पदावर पुनर्वसन करण्याचा शब्द दिल्याने काहींनी आपली उमेदवारी मागे घेतली आहे. सर्वच्या सर्व म्हणजे, १०२ जागांवर भाजपाने उमेदवार उभे केले आहेत. यात आ.देवेंद्र कोठे, आ.विजयकुमार देशमुख, आ.सुभाष देशमुख, माजी आमदार दिलीप माने यांच्या समर्थकांचा समावेश आहे.

बंडखोराना थंड करण्यासाठी भाजपा नेत्यांनी जोरदार प्रयत्न केले. तरीपण, काहींनी आपली उमेदवारी कायम राखल्याने अधिकृत उमेदवारांना डोकेदुखी बनली आहे. विशेष म्हणजे, काहींनी पक्षातून बाहेर पडत इतर पक्षाची उमेदवारी घेतली आहे. त्यामुळे यंदाची निवडणूक कुठे तिरंगी, कुठे चौरंगी तर कुठे पंचरंगी तर काही प्रभागात थेट लढत होणार असल्याचे दिसून येत आहे. या सर्व राजकीय घडामोडी पाहता मतांचे विभाजन होवून निकाल अनपेक्षित लागण्याची शक्यता नाकारता येत नाही.

### महाविकास आघाडी आणि इतर पक्षांना संधी

भाजपमधील गोंधळाचा फायदा उचलण्यासाठी महाविकास आघाडीने रणनीती आखली आहे. काही प्रभागांत थेट संपर्क मोहिम वाढवण्यात आली असून, 'भाजपमधील अंतर्गत संघर्ष' हा प्रचाराचा मुद्दा बनवण्यात येत आहे. शिवसेना उबाठा, काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गट यांनी समन्वयाने प्रचाराला वेग दिला असून, भाजपमधील नाराजीचा फायदा घेण्याचा प्रयत्न सुरू आहे. दुसरीकडे शिंदे गट व अजित पवार गट देखील स्वतंत्र ताकद दाखवण्याच्या तयारीत आहेत.

### कोण, कुणाचा मतदार फोडतो? कोणाचा गड कोसळतो?

उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या दिवसाने स्पष्ट केले आहे की, ही निवडणूक केवळ पक्षांमधील नाही, तर अनेक ठिकाणी पक्षांतर्गत संघर्षाची देखील आहे. बंडखोरी, नाराजी, अपक्ष उमेदवार आणि पॅनल पध्दती यामुळे यंदाची महापालिका निवडणूक अत्यंत चुरशीची ठरणार आहे. आगामी प्रचार काळात आरोप-प्रत्यारोपांची धार अधिक तीव्र होणार आहे. कोण कुणाचा मतदार फोडतो? कोणाचा गड कोसळतो? याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

### समजावून सांगण्याचा प्रयत्न करु

माझ्या सख्ख्या आत्यांनाही मी तिकीट देवू शकलो नाही. त्यांनी इतर पक्षातून अर्जही दाखल केला होता. मात्र मी त्यांना समजावून सांगितल्यावर त्यांनी अर्ज मागे घेतला. अन्य आमदारांनीही आपापल्या निष्ठावंतांना समजावून सांगण्याचा प्रयत्न केला आहे. जरीही काही भाजपच्या निष्ठावंतांनी यातूनही बंडखोरी करून स्वतंत्र लढाई ठेवली तरी त्यांनाही पुन्हा एकदा समजावून सांगून भाजपच्या उमेदवाराचा प्रचार करण्यासाठी भाग पाडू, असे आमदार देवेंद्र कोठे यांनी सांगितले.

### काही बंडखोरांच्या मनधरणीचे प्रयत्न अपयशी

उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या शेवटच्या दिवशी पक्षश्रेष्ठींकडून नाराज उमेदवारांची मनधरणी करण्याचे प्रयत्न सुरू होते. वरिष्ठ नेते, आमदार, खासदार, शहर पदाधिकारी यांनी प्रत्यक्ष भेटीगाठी, फोनाफोनी आणि बैठका घेऊन नाराजी दूर करण्याचा प्रयत्न केला. यातील काही जणांनी आपले अर्ज काढून घेतले मात्र, अनेक ठिकाणी हे प्रयत्न अपयशी ठरले. यामुळे काही प्रमाणात मतविभागणीचा धोका अधिकृत उमेदवारांना बसण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

### अंतर्गत बंडखोरीमुळे उद्दिष्ट कठीण

भाजपने शहरात एकहाती सत्ता मिळविण्याचे लक्ष्य ठेवले असले, तरी अंतर्गत बंडखोरीमुळे हे उद्दिष्ट कठीण होताना दिसत आहे. अनेक प्रभागांत भाजपचा पारंपरिक मतदार वर्गच दोन गटांत विभागला जाण्याची शक्यता आहे. याचा फायदा महाविकास आघाडीला किंवा इतर पक्षांना होऊ शकतो. आ.कोठेंनी दिलेल्या प्रतिक्रियेप्रमाणे बंडखोर उमेदवारांना पुन्हा समजावून सांगून आणि त्यांना सोबत घेवून प्रचारयंत्रणा राबविली तरच अधिकृत उमेदवारांच्या मताचा टक्का वाढणार आहे.

## शहराध्यक्षा माशाळकर यांचा राजीनामा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२ जानेवारी-**



राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अजित पवार गटात राजीनाम्याचे सत्र सुरुच असल्याचे दिसून येत आहे. महिला आघाडीच्या शहराध्यक्षा संगीता जोगधनकर, युवती आघाडीच्या शहराध्यक्षा किरण माशाळकर यांनीही यात उडी घेतली आहे. ज्येष्ठ नेते सुधीर खरटमल यांनीही राजीनामास्त्र उगारले आहे.

**राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटात राजीनाम्याचे सत्र सुरुच**

पक्षासाठी युवा कार्यकर्त्यांमध्ये उत्साह अन् ऊर्जा निर्माण केली. संघटना वाढीसाठी काम केले. मात्र निवडणुकीच्या कोणत्याही प्रक्रियेत सहभागी केले गेले नाही, विश्वासात घेतले गेले नाही. अशा शब्दात माशाळकर यांनी नाराजी व्यक्त केली आहे. माझ्या सोबतच्या महिला कार्यकर्त्यांसाठी उमेदवारीची मागणी केली होती परंतु पक्षाचा एबी फॉर्म दिला गेला नाही. असेही त्या यावेळी म्हणल्या.

## राष्ट्रवादी अजित पवार गटाकडून नऊ माजी नगरसेवकांना संधी

### पाच आयातांसह एका तृतीयपंथीचाही समावेश

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२ डिसेंबर-**

सोलापूर महापालिका निवडणुकीसाठी राष्ट्रवादी अजित पवार गटाकडून अधिकृत उमेदवारांची यादी विलंबाने प्रसिध्दीस देण्यात आली. यात नऊ माजी नगरसेवकांसह अन्य पक्षातून आलेल्या पाच आयात उमेदवार व एका तृतीयपंथीचा समावेश आहे.




माजी उपमहापौर राजेंद्र कलंत्री, आनंद चंदनशिवे, गणेश पुजारी, वैभव हत्तुरे, विवेक खरटमल, तौफिक शेख, नूतन गायकवाड, नंदा कांगरे, परवीन इनामदार या माजी नगरसेवकांचा समावेश आहे. यातील चंदनशिवे व पुजारी यांनी गेल्या वेळी बहुजन समाज पार्टीकडून, नूतन गायकवाड यांनी एमआयएमकडून, खरटमल तसेच नंदा कांगरे व परवीन इनामदार या काँग्रेसकडून तर वैभव हत्तुरे यांनी भाजपकडून निवडणूक लढविली होती. खरटमल यांना राष्ट्रवादीने उमेदवारी दिली मात्र त्यांचा उमेदवारी अर्ज छाननीत बाद झाला आहे.

काँग्रेसमधून भाजपात आणि तेथून राष्ट्रवादीत दाखल झालेले सुशील बंदपट्टे यांनाही राष्ट्रवादीने उमेदवारी दिली आहे. राष्ट्रवादी शरद पवार गटातून आलेले महेश गाडेकर व त्यांची कन्या पल्लवी गाडेकर या एकाच कुटुंबातील दोघांना उमेदवारी मिळाली आहे. रामचंद्र मंजेली ऊर्फ अबोली या तृतीयपंथीयालाही उमेदवारीची लॉटरी लागली आहे.

राष्ट्रवादी अजित पवार गट व शिवसेना शिंदे गट यांच्यात युती झाली. प्रत्येकी ५१ जागा लढविण्यावर शिक्कामोर्तब झाले आहे. परंतु दोन्ही पक्षांकडून प्रत्येकी ६२ उमेदवारांनी अर्ज दाखल केले आहेत. यातील काही उमेदवारांचे अर्ज मागे घेण्याचा प्रयत्न केल्यानंतर ते अर्ज राहिले. तेथे शिवसेना शिंदे गटाच्या उमेदवाराबरोबर मैत्रीपूर्ण लढती होतील, असे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अजित पवार गटाचे शहराध्यक्ष संतोष पवार यांनी सांगितले.

## लोकसभेच्या वेळी एकत्र विधानसभेच्या वेळी फाटाफूट महापालिकेसाठी बांधली गाठ




**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२ डिसेंबर-**

लोकसभा निवडणुकीत महाविकास आघाडी एकत्र होती. विधानसभा निवडणुकीत त्यांच्यात फाटाफूट झाली होती. मात्र, महापालिका निवडणुकीत भारतीय जनता पार्टीला कसल्याही परिस्थिती पराभूत करण्याच्या अनुषंगाने महाविकास आघाडीने राजकीय गाठ बांधली असल्याचे दिसून येत आहे.

तब्बल नऊ वर्षांनी सोलापूर महानगरपालिकेची निवडणूक लागली आहे. त्यामुळे नेते, पदाधिकारी, कार्यकर्तेअ यांच्यात जोश निर्माण झाला आहे. पुन्हा एकदा सत्तारुढ होण्यासाठी भाजपा जोरदार प्रयत्न करीत आहे. तर दुसरीकडे भाजपाच्या विरोधात वातावरण निर्माण करत सत्तास्थानी येण्याकामी विरोधी पक्षांकडून व्युहरचना आखण्यात येत आहे. महाविकास आघाडीत काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गट, शिवसेना उबाठा, मार्क्सवादी कम्युनिस्ट पार्टी, महाराष्ट्र नवनिर्माण सेना आदी पक्षसंघटनांचा समावेश आहे. या पक्षसंघटनांनी भाजपाविरोधी हवा निर्माण करण्याकरिता कधी एकत्र, कधी स्वतंत्ररित्या राजकीय डावपेच आखत होते-आहेत. विशेष म्हणजे, काँग्रेस व मार्क्सवादी कम्युनिस्ट पार्टी अनेकवेळा एकमेकांच्या विरोधात शड्डू ठोकत निवडणूक लढविले होते.

लोकसभा निवडणुकीतील पाठिंबा आणि विधानसभा निवडणुकीतील वादानंतर तुटलेले संबंध नव्याने जुळताना दिसत आहेत. भाजपला पराभूत करण्यासाठी लोकसभा निवडणुकीत मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाने काँग्रेसला पाठिंबा दिला होता. त्या बदल्यात पुढील सहा महिन्यांनी होणाऱ्या विधानसभा निवडणुकीत सोलापूर शहर मध्य विधानसभा मतदारसंघाची जागा मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षासाठी सोडण्यात यावी, अशी अट घालण्यात आली होती. मात्र लोकसभेत पाठिंबा घेतल्यानंतरही विधानसभा निवडणुकीत काँग्रेसने माजी आमदार व माकपचे नेते नरसय्या आडम मास्तर यांच्यासाठी जागा सोडली नव्हती. या घटनेनंतर माकपने काँग्रेसवर, विशेषतः माजी केंद्रीय गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे आणि खासदार प्रणिती शिंदे, शहराध्यक्ष चेतन नरोटे यांच्यावर गंभीर आरोप करत जोरदार टीका केली होती. त्यामुळे दोन्ही पक्षांतील संबंध तणावपूर्ण झाले होते. आता सोलापूर महापालिका निवडणुकीच्या निमित्ताने काँग्रेस आणि मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष यांच्यात पुन्हा एकदा जवळीक वाढताना दिसत आहे.

महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर माकपने सुरुवातीला तब्बल वीस जागांची मागणी केली होती. त्यानंतर चर्चेअंती नऊ जागांवर तडजोड करण्याची तयारी दर्शवण्यात आली. मात्र, अखेर सात जागांवरच समाधान मानावे लागले. काही काळापूर्वीचे कटू अनुभव बाजूला ठेवत दोन्ही पक्षांनी आगामी निवडणुकीत एकत्र लढण्याचा निर्णय घेतल्याचे स्पष्ट झाले आहे.

### नवी चर्चा

या नव्या समीकरणाचा नेमका परिणाम काय होणार? हे निवडणुकीच्या निकालानंतर स्पष्ट होईल. सध्या तरी काँग्रेस आणि माकप यांची ही जवळीक सोलापूरच्या राजकारणात नवी चर्चा निर्माण करणारी ठरत आहे.

# ‘मंद्रुप’ची केळी पोहोचली रशियात

✔ आठ टन केळीची निर्यात
✔ एका वर्षात पाच लाखांचे उत्पन्न

**तभा वृत्तसेवा,**
**दक्षिण सोलापूर,दि.२ जानेवारी-**

दक्षिण सोलापूर तालुक्यातील मंद्रुप येथील हुवण्णा सिध्दप्पा व्हनमाने यांच्या शेतातील जी-९ केळीला रशियाच्या बाजारपेठेत मागणी असून पहिल्या टप्प्यात आठ टन केळीची निर्यात करण्यात आली आहे. मंद्रुप येथील केळीचे व्यापारी जाफर बागवान यांनी रशिया येथील कंपनीशी समन्वय साधून व्हनमाने यांची केळी रशियाला पाठविली आहे. रशिया येथे जी-९ केळीला १५ रुपये दर मिळत असल्यामुळे रशियाला केळी पाठवण्याचा निर्णय घेतला, असे व्हनमाने यांनी सांगितले.



जानेवारी २०२५ मध्ये हुवण्णा व्हनमाने यांच्याबरोबर त्यांचे नातू सचिन अंकुश व्हनमाने यांनी जी ९ केळी लागवड केली. याकामी राजकुमार घाटे यांच्याकडून मार्गदर्शन घेतले. औषध फवारणी व आंतरमशागत याबाबत त्यांनी मार्गदर्शन केले. सचिन व्हनमाने यांनी सर्व रोगांपासून केळी बागेचे संरक्षण करीत केळी बागेची निगा राखली. पंधरा दिवसापूर्वी त्यांची केळी पाहणी केल्यानंतर रशियाच्या व्यापाऱ्यांकडून केळी पाठविण्यास सांगण्यात आले.

पहिल्या टप्प्यात साडे आठ टन केळी काढण्यात आली असून पंधरा रूपये किलोप्रमाणे विक्री करण्यात आली आहे. आणखी दोन टप्प्यात पंधरा ते वीस टन केळी उत्पादन निघणार आहे. एक वर्षात दीड लाख रुपये खर्च करुन केळी लागवड केल्यानंतर चार ते पाच लाख उत्पन्न मिळाल्याने व्हनमाने परिवारामधून समाधान व्यक्त करण्यात येत आहे.

**केळीचा दर्जा राखला**

गेल्या जानेवारी महिन्यात एक एकरावर जी ९ केळी लागवड केली. केळी बागेची योग्य निगा व केळीची दर्जा चांगली राखण्याकामी कसोशीने प्रयत्न केले. आठ दिवसांपूर्वी रशियाच्या व्यापाऱ्याकडून मागणी आली. १५ रुपये या दराप्रमाणे पहिल्या टप्प्यात साडेआठ टन केळी पाठविण्यात आली आहे. आणखी दोन टप्प्यात केळी पाठविण्यात येणार आहे, असे सचिन व्हनमाने यांनी सांगितले.

**नवीन तंत्रज्ञानाचा वापर केल्यास...**

शेतकऱ्यांनी नवीन तंत्रज्ञानाचा वापर करून शेती केल्यास फायदेशीर ठरणार आहे. मंद्रुप येथील व्हनमाने या शेतकऱ्यांची केळी रशियाला गेल्याने तालुक्यासाठी गौरवास्पद गोष्ट आहे. इतर शेतकऱ्यांनी केळी लागवड करताना त्यांचे मार्गदर्शन घ्यावे, असे आवाहन दक्षिण सोलापूर तालुका कृषी अधिकारी अवधूत मुळे यांनी केले.

### हिट ॲन्ड रन अपघातातील वाहन व आरोपीचा शोध सुरु

**सोलापूर,दि.२ जानेवारी-**

अक्कलकोट रोडवरील मल्लिकार्जुन नगर ब्रीज येथे घडलेल्या हिट ॲन्ड रन अपघातप्रकरणी चारचाकी वाहन व आरोपी चालकाचा शोध घेण्यासाठी एमआयडीसी पोलिसांकडून तपास अधिक वेगाने सुरु करण्यात आला.

यातील फिर्यादी विठ्ठल शंकर नेलुरे (वय-२६, रा.सिध्देश्वर मंदिराजवळ, वडगाव, ता.दक्षिण सोलापूर) सोलापूर हे दि.१७ डिसेंबर रोजी सायंकाळी ७ वाजण्याच्या सुमारास आपल्या एम.एच.१३ ई.एल.६९७५ या क्रमांकाच्या दुचाकीवरुन जात असताना, साक्षीदार सुदर्शन कोकाटे यांच्या एम.एच.१३ डी.जे.२२७७ या क्रमांकाच्या दुचाकीला अज्ञात चारचाकी वाहनाची जोरदार धडक बसली. पण, सदर चारचाकी वाहनचालक तेथून पळून गेला. परिसरातील सीसीटीव्ही फुटेजची पाहणी करण्यात आली. मात्र, ओळख पटू शकली नाही. त्यामुळे यातील आरोपीचा शोध घेण्याकामी शर्थीने प्रयत्न करण्यात येत आहे.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## ज्ञानामृत आनंदलहरी १३१५

**तुका म्हणे धिग ऐसे झाले लोक**
**निंदक वादक नरका जाती**

इतर प्राण्याच्या तुलनेत मानवी देह हा महत्वपूर्ण व चांगला असला तरीही प्रत्येक माणूस या देहाचे महत्व व चांगुलपणा टिकवून ठेवतोच असे नाही. अर्थात, मानवता टिकून न ठेवणाऱ्यांमुळेच कधी-कधी माणसाला माणूस हो म्हणण्याची वेळ येत असते. प्रत्येक माणसाने माणुसकी जपली असती तर समाजात वाईट कांहीच घडले नसते. त्याचबरोबर कांही ना मोठपण तर काहींना हिन वागणूक मिळाली नसती. कांही लोक का असेनात पण चुकीच्या पध्दतीने वागतात म्हणूनच अनेकांना नको त्या प्रसंगाना तोंड देण्याची वेळ येते. निंदा करणे, अकारण वाद घालणे असे दुर्गूण जोपासण्यामुळे माणूस स्वत:कडील मानवता तर हरवून बसतोच, पण अनेकांना मानवतेपासून दूर नेण्यासही कारणीभूत होतो. कधीच कोणाबद्दल चांगले बोलायचे नाही किंवा लहान-सहान गोष्टीतही वाद घालीत रहायचा हा दुर्गूण जोपासणाऱ्यांकडेही कोणी चांगल्या नजरेतून पहात नाही. पण अशा लोकांना स्वत:बद्दल कांहीच चुकीचे वाटत नाही. आपण काय करतो, कसे वागतो याचा विचार मानवाने स्वत: करायला हवा. पण असे निंदक, वादक लोक आपण जे करीत आहोत, तेच बरोबर आहे असे मानून वागत असतात. अशा निंदक, वादक लोकांचा शेवट वाईटच होतो. या अनुषंगाने बोलतांना तुकाराम महाराज म्हणतात, तुका म्हणे धिग ऐसे झाले लोक निंदक वादक नरका जाती



निंदा ही, निंदा करणाऱ्यांसाठी व ज्यांची निंदा केली जाते त्यांच्यासाठीही चांगली नसली तरीही समाजात निंदा चालूच असते. निंदकांनी केलेल्या निंदेमुळे आपल्यात परीवर्तन होते, असे जरी आपण सकारात्मक दृष्टीने मानत असलो तरीही, बऱ्याच वेळा निंदेचा अनिष्ट असा परिणाम आपल्यावर होत असतो. कधी-कधी केवळ निंदेमुळे मानवाचे मानसिक नुकसान होते. आर्थिक नुकसान भरुन काढता येणे शक्य असते, पण मानसिक नुकसान सहजासहजी भरुन काढाता येत नसते. मानसिक नुकसानीचा परिणाम दीर्घकाळापर्यंत सहन करावा लागतो. निंदेप्रमाणे वाद, भांडण- तंटा हासुध्दा सर्वांसाठी घातकच असतो. भांडण-तंटा हा नुकसानीचा पाया असतो. क्षुल्लक कारणावरुनसुध्दा अनेकवेळा वाद विकोपाला जातो. अर्थिक, मानसिक नुकसानीलाही वाद बऱ्याचवेळा कारणीभूत ठरतो. इतरांची निंदा करण्यात तसेच अकारण वाद घालण्यात अनेकांना आनंद मिळत असतो. आपण इतरांपेक्षा श्रेष्ठ आहोत हे दाखविण्यासाठी म्हणजेच समोरचा आपल्यापेक्षा निकृष्ट आहे, हे दाखवून देण्याकरिता सम ोरच्याची निंदा केली जाते. निंदेतून माणूस मोठा होत नसतो, हे सत्य असले तरीही निंदा केली जात असल्याचे आपण पहातो. त्याचबरोबर वाद घातल्याने आपली शक्ती, बुध्दी वाढते किंवा आपण शक्तीशाली असल्याचे दाखविता येते, असे अनेकांना वाटत असते. पण खरे म्हणजे निंदा केल्याने किंवा वाद घातल्याने माणसाला मोठेपण, श्रेष्ठपण मिळत नाही. मोठेपणा, श्रेष्ठपणा हा आपल्या वर्तनावर तसेच कर्तृत्वावर अवलंबून असतो. कोणाची कसलीही निंदा न करणारे तसेच कोणाशीही वाद न घालणारे संत, महात्मे म्हणूनच चांगले व मोठे मानले जातात. आपण संत-महात्म्यांना मानणारे असल्याने त्यांच्याप्रमाणे आपणही कोणाची निंदा न करता, तसेच वाद न घालता वागायला हवे. जय जय राम कृष्ण हरी.

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## सुप्रभात

### आजचा दिवस

**वार : शनिवार, दि. ३ जानेवारी २०२६**
**विक्रम संवत् २०८२ । शके - १९४७**
**संवत्सर - विश्वावसु**
**मास - पौष शु. पौर्णिमा**
**ऋतु - हेमंत ।**
**नक्षत्र- आद्रा (१७.२८)**
**योग - शुक्ल (१३.०७)**
**करण - बालव (२५.२८)**
**राहू काल :**
**शनिवार : स. ९ ते १०.३०**

**दिनविशेष :**
**महिला मुक्तीदिन.**
**शाकंभरी पौर्णिमा.**
**सावित्रीबाई फुले (१८३१): आधुनिक भारतातील पहिल्या महिला शिक्षिका आणि समाजसुधारक यांची जयंती. हा दिवस बालिका दिन म्हणून साजरा होतो.**
**मायकल शुमाकर (१९६९): प्रसिद्ध फॉर्म्युला वन रेसिंग ड्रायव्हर यांचा जन्म.**

# सिद्धेश्वर यात्रा; भाविकांसाठी खट्टी रोटीचे नियोजन

### श्री सिद्धेश्वर देवस्थान पंचकमिटीच्यावतीने तयारीला आला वेग

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २ जानेवारी-**

सोलापूरचे ग्रामदैवत श्री शिवयोगी सिद्धरामेश्वर महाराजांच्या यात्रेनिमित्त श्री सिद्धेश्वर देवस्थान पंचकमिटीच्या वतीने भाविकांसाठी प्रसादाचे नियोजन केले जात आहे. नवीन वर्षाच्या पहिल्या दिवशी कडक भाकरी मागवण्यात आल्या असून, यात्रेच्या पार्श्वभूमीवर त्या व्यवस्थित एका बॉक्समध्ये ठेवण्यात आल्याचे दिसून.

दरम्यान, श्री सिद्धेश्वर महाराजांच्या यात्रा काळात भाविकांची व वाढती गर्दी लक्षात घेता, भाविकांना चपाती, भात, आमटी, भाजीसह खट्टी रोटी (कडक) भाकरी प्रसाद म्हणून दिली जाते. त्यासाठी देवस्थानच्यावतीने यात्रेच्या अगोदर तयारी सुरू केली जाते. विविध संस्थांकडून ज्वारी



आणि बाजरीच्या कडक भाकरी मागवल्या जातात. त्यानंतर त्या कडक भाकऱ्या गोळा करून देवस्थान समितीच्या दासोहमध्ये ठेवले जातात. आज गुरुवारी मंदिराच्या दासोहमध्ये याचे नियोजन करण्यात आले. हजारोंच्या संख्येत भाकरी मागवण्यात येत असतात. ते वाळवून पुन्हा एका बॉक्स मध्ये ठेवण्यात आल्याचे दिसून आले. यात्रेच्या काळामध्ये भाकरी महाप्रसाद म्हणून देण्यात येतात. असंख्य भाविक यामाध्यम ातून श्रींचा प्रसाद ग्रहण करतात. यात्रेच्या पार्श्वभूमीवर तयारीला वेग आल्याचे चित्र दिसत आहे. यावेळी दासोह समितीमध्ये अनेक स्त्री पुरुष कर्मचारी देखील रात्रंदिवस कार्यरत असल्याचे दिसत आहे.

### दासोह समितीच्या वतीने तयारीला वेग

सालाबाद प्रमाणे यंदाच्या वर्षी देखील यात्रेनिमित्त कडक भाकरी मागवण्यात आलेल्या आहेत. त्या ज्वारीची आणि बाजरीच्या कडक भाकरी यात्रा काळात दासोहमध्ये भाविकांना श्रींचा महाप्रसादात दिल्या जातात. यात्रा काळात दररोज हजारो भाविकांच्या पंगती महाप्रसादाचा लाभ घेतात. त्यासाठी देखील मंदिर समितीच्या दासोह समितीच्या वतीने अन्नधान्यांचे नियोजन केले जात आहे. अनेक भाविक अन्नधान्याच्या तसेच विविध प्रकारच्या साह्याने दासोह समितीला सहकार्य करत असल्याचे दासोह समितीचे चेअरमन विश्वनाथ लब्बा यांनी सांगितले.

# पत्रकार दिनानिमित्त आदर्श पत्रकार पुरस्कार जाहीर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २ जानेवारी,**

हीरक महोत्सव साजरा करणाऱ्या सोलापूर जिल्हा मराठी पत्रकार संघाच्यावतीने दरवर्षाप्रमाणे यंदा ही ६ जानेवारी २०२६ रोजी पत्रकार दिनानिमित्त चार पुरस्कार पत्रकार संघाचे कार्याध्यक्ष अय्यूब अहमद नल्लामंदू व सचिव प्रा. पी. पी. कुलकर्णी यांनी जाहीर केले आहेत.

स्व. रंगा अण्णा वैद्य यांच्या स्मरणार्थ ज्येष्ठ पत्रकार पुरुषोत्तम कुलकर्णी, कासिदकार स्व. अ. लतीफ नल्लामंदू यांचे नावे असलेला पुरस्कार अप्पासाहेब दिलीप पाटील, बार्शीचे ज्येष्ठ पत्रकार स्व. बाबुराव मठपती यांच्या स्मरणार्थ इरफान महिबूब शेख यांना तर ग्रामीण भागातील पत्रकार प्रमोद हरिभाऊ गोसावी यांना ज्येष्ठ पत्रकार कै. मारुती सोनवणे यांच्या स्मरणार्थ दिला जाणारा ''आदर्श पत्रकार पुरस्कार २०२६'' साठी निवड करण्यात आली आहे.

पाच हजार रुपये रोख, सन्म ान पत्र , शाल बुके असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. याचे वितरण विजापूर रोड सोलापूर येथील पत्रकार भवन ''कै. रंगा अण्णा वैद्य सभागृह'' मध्ये ६ जानेवारी दुपारी १ वाजता हा कार्यक्रम संघाचे अध्यक्ष अशोक मठपती यांच्या अध्यक्षतेखाली व मध्य सोलापूरचे आमदार देवेंद्र कोठे यांच्या हस्ते व उपजिल्हाधिकारी संतोषकुमार देशमुख, जिल्हा माहिती अधिकारी सुनिल सोनटक्के, सोलापूर विद्यापीठाचे सहायक कुलसचिव डॉ. शिवाजी शिंदे हे प्रमुख पाहुणे आहेत. तरी या कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन कार्याध्यक्ष नल्लामंदू व सचिव प्रा. कुलकर्णी यांनी केले आहे.

# जिजामाता शाळेत शैक्षणिक साहित्य प्रदर्शन




**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २ जानेवारी-**

महाराष्ट्र शिक्षण प्रसारक मंडळ बाळे सोलापूर संचलित जिजामाता प्राथमिक शाळा व जिजामाता बालक मंदिर तुळशीदासनगर कोंडी यांच्या संयुक्त विद्यमाने नवं वर्षानिमित्त विज्ञान प्रयोग व शैक्षणिक साहित्य प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते.

प्रदर्शनाचे उद्घाटन कोंडी ग्रामपंचायत सदस्या सुप्रिया भोसले यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक चंद्रकांत कुंटेलूसर होते. प्रमुख पाहुणे म्हणून आगलावेसर, चौगुले यांची उपस्थिती होती.

या प्रदर्शनामध्ये इयत्ता पहिली ते सातवीतील साठहून अधिक विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. यावेळी मुख्याध्यापक चंद्रकांत कुंटेलूसर,आगलावेसर यांनी मनोगत व्यक्त केले. ऋतुचक्र, पाण्याची घनता, दिवस रात्र, सूक्ष्म दर्शक यंत्राचे महत्त्व, सौर ऊर्जा प्रकल्प, वीट बनविण्याचे यंत्र मेंदूचे कार्य, पचनसंस्था कार्य आदिंचे प्रतिकृती बनविले होते. या प्रदर्शनात सहभागी झालेल्या सर्व विद्यार्थ्यांचे अध्यक्ष सचिन ठोकळ, सचिवा शिल्पा ठोकळ यांनी अभिनंदन केले.

# हरिपाठातून नव वर्षाचे स्वागत

### श्रीसंत सावता महाराज वारकरी मृदंग वादन प्रशिक्षण संस्थेचा उपक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२ जानेवारी-**

नववर्षाच्या निमित्ताने ज्ञानदीप लावू जगी असा संकल्प श्रीसंत सावता महाराज वारकरी मृदंग वादन प्रशिक्षण संस्था व हरिपाठ परिवारातील सदस्यांनी आज कीर्तनाच्या माध्यमातून करण्यात आला.

संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराजांच्या या अभंगावरती बोलताना बळीराम जांभळे महाराज म्हणाले, नववर्षाच्या निमित्ताने सर्वांनी मिळून अज्ञानाचा अंधार घालवून ज्ञानाची दीप उजळवू. या ज्ञानरूपी दिव्यामध्ये भक्तीचे तेल, आणि शांतिची वात लावून प्रेमाच्या प्रकाशमान ज्योतीतून मनातील संताप व द्वेष नष्ट करून विठ्ठल



नामाची प्रतिमा अखंडितपणे सर्वांच्या हृदयामध्ये जागृत ठेवण्याचे कार्य सर्वांच्या हातून घडो ही सदिच्छा या अभंगाच्या माध्यमातून करण्यात आली. टाळकरी म्हणून हरिपाठ परिवाराच्या सर्व महिला सदस्यांनी उपस्थिती दाखविली. मृदंगाची साथ संगत अनिकेत जांभळे, समर्थ कांबळे, राजवीर जांभळे यांनी. गायनाची साथ चंद्रकांत जांभळे, राजनंदिनी जांभळे, श्रद्धा जाधव, झांबरे यांनी केली. हा कार्यक्रम संपन्न करण्यासाठी अंजली लोखंडे, गीता क्षीरसागर, कावेरी यमगवळी, मंगल जाधव, अश्विनी जांभळे यांनी प्रयत्न केले.




# ज्योती कुलकर्णी यांच्या काव्यसंग्रहाचे प्रकाशन


**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २ जानेवारी-**

कवयित्री ज्योती कुलकर्णी यांच्या काव्यपुष्पांजली या पहिल्या काव्यसंग्रहाचे प्रकाशन सोलापुरातील आदर्श मंगल कार्यालय येथे मान्यवरांच्या उपस्थितीत पार पडले.

कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून ज्येष्ठ साहित्यिक राजेंद्र भोसले, सोलापूर विद्यापीठाचे प्रथम कुलगुरू व ज्येष्ठ साहित्यिक डॉ. इरेश स्वामी तसेच विलास कुलकर्णी, शास्त्रज्ञ डॉ. प्रशांत कुलकर्णी, सुभाष काळबांडे, सेवानिवृत्त पोलिस अधिकारी सुनीता काळबांडे उपस्थित होते.

मनोगत व्यक्त करताना कवयित्री कुलकर्णी यांनी लहानपणापासून वर्तमानपत्रातील कोडी सोडवण्याच्या सवयीमुळे शब्दसंपदा वाढली आणि शिक्षकांच्या मार्गदर्शनामुळे भाषेचा व्यासंग घडल्याचे सांगितले. त्यांनी हा काव्यसंग्रह आपल्या आई-वडील व सासू-सासऱ्यांना अर्पण केला. अध्यक्षीय मनोगत डॉ. इरेश स्वामी यांनी व्यक्त केले. सूत्रसंचालन मंजुषा गाडगीळ यांनी तर मान्यवरांचा परिचय उखळे सरांनी करून दिला. लक्ष्मीने स्वागत गीताने सुरुवात केली तर करजगीकर यांनी आभार मानले.

# सोलापूरचा विनीत दिनकर ‘सुसाट’ @१०.६६ सेकंद



जिद्द, चिकाटी आणि प्रशिक्षकांचे अचूक मार्गदर्शन यांच्या जोरावर सोलापूरचा उदयोन्मुख वेगवान धावपटू विनीत फ्रँकलीन दिनकर सध्या राज्य व राष्ट्रीय मैदानी स्पर्धा गाजवत आहे. नेहरूनगर येथील शासकीय मैदानावर सराव करणाऱ्या विराट स्पोर्ट्स क्लबचा हा खेळाडू आज सोलापूरच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवत आहे.

विनीतच्या या प्रवासाची सुरुवात खेळाच्या मैदानापासूनच झाली. 'लहानपणापासून मला अभ्यासापेक्षा मैदानात धावायला आणि खेळायला जास्त आवडायचे,' असे विनीत सांगतो. सुरुवातीला तो उत्कर्ष क्रीडा मंडळाकडून खो-खो खेळायचा आणि खेळत आहे. जिल्हा संघातून त्याने राज्य आणि संगमेश्वर महाविद्यालयाकडून महाविद्यालयीन स्पर्धा खेळताना चमक दाखवित आहे. याच दरम्यान त्याचा धावण्याचा वेग पाहून 'उत्कर्ष'चे प्रशिक्षक सुनील चव्हाण यांनी त्याला मैदानी स्पर्धांमध्ये उतरण्याचा सल्ला दिला. तिथे १०० मीटर धावण्याच्या शर्यतीत त्याने सुवर्णपदक पटकावले आणि त्याच्या आयुष्याला एक नवे वळण मिळाले. सुनील चव्हाण यांनीच पुढील प्रगत प्रशिक्षणासाठी विनीतला मैदानी खेळांचे तज्ज्ञ प्रशिक्षक सूर्याजी लिंगडे यांच्याकडे सोपवले.



विराट स्पोर्ट्स क्लबचे प्रशिक्षक सूर्याजी आणि भारती लिंगडे यांच्या मार्गदर्शनाखाली विनीतचा खऱ्या अर्थाने तांत्रिक सराव सुरू झाला. सोलापूर जिल्ह्यात सिंथेटिक ट्रॅकची सुविधा उपलब्ध नसल्याने, सरावात खंड पडू नये म्हणून हे प्रशिक्षक विनीतला आठवड्यातून दोन दिवस स्वखर्चाने विजापूर येथील सिंथेटिक ट्रॅकवर सरावासाठी घेऊन जात असत. विनीत म्हणतो, ''माझ्या यशात सरांचा आणि मॅडमचा मोठा वाटा आहे. त्यांनी केवळ माझे तंत्र सुधारले नाही, तर मला मानसिकदृष्ट्या खंबीर बनवले. सरावातील शिस्त आणि अचूकता त्यांनीच माझ्या अंगी बाणवली. विनीतची कामगिरी २०२३ पासून सातत्याने उंचावत गेली आहे.




२०२३-२४ मध्ये महाराष्ट्र क्रीडा महोत्सवात पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे प्रतिनिधित्व करताना १०० मीटरमध्ये रौप्य तसेच २३ वर्षांखालील राज्य स्पर्धेत २०० मीटर धावण्याच्या शर्यतीतही रौप्य कायम राखले. २०२४ मध्ये ओपन सीनियर स्टेट चॅम्पियनशिपमध्ये ४बाय १०० मीटर रिले शर्यतीत कांस्यची कमाई केली.

### विराट स्पोर्ट्स क्लबचे तीन तारे

सूर्याजी आणि भारती लिंगडे यांनी ॲथलेटिक्स कोचिंग सेंटर व भरतीपूर्व प्रशिक्षण केंद्रास ३० नोव्हेंबर २०२२ या दिवशी सुरुवात झाली. चारच मुलांना घेऊन त्यांनी याचे रोपटं रोवल. नेहरूनगर येथील शासकीय मैदानावर हे रोपट हळूहळू वाढत आहे. विराट स्पोर्ट्स क्लबच्या माध्यमातून आतापर्यंत बारा खेळाडू राज्य, राष्ट्रीय पातळीवर आठ खेळाडूंनी आपली कामगिरी केली आहे. त्यात विनीतसह, पूजा राठोड व भक्ती थोरात हे खेळाडू भारताचे नाव उज्वल करतील अशी त्यांना

### तीन सुवर्णपदकांसह सर्वोत्कृष्ट खेळाडू

राष्ट्रीय स्तरावर २३ वर्षांखालील गटात १०० मीटर शर्यतीत विनीतने १०.६६ सेकंद ही वैयक्तिक सर्वोत्तम वेळ नोंदवली. विनीतच्या कारकिर्दीतील सुवर्णक्षण नुकत्याच झालेल्या महाराष्ट्र क्रीडा महोत्सवात आला. तिथे त्याने १०० मीटर, २०० मीटर आणि ४बाय १०० मीटर रिले अशा तिन्ही प्रकारांत सुवर्णपदके जिंकून तिहेरी मुकुट परिधान केला. या कामगिरीमुळे त्याला स्पर्धेतील सर्वोत्कृष्ट खेळाडू म्हणून गौरविले.

त्याला महाविद्यालयाचे शारीरिक शिक्षण संचालक डॉ. आनंद चव्हाण आणि विद्यापीठाचे प्रशिक्षक डॉ. किरण चोकाककर व डॉ. अशोक पाटील यांचे मार्गदर्शन लाभले. सध्या विनीतची निवड बेंगळुरू येथे होणाऱ्या ऑल इंडिया आंतरविद्यापीठ ॲथलेटिक्स चॅम्पियनशिपसाठी झाली आहे. भारतीय विद्यापीठ संघातून वर्ल्ड युनिव्हर्सिटी स्पर्धेत देशाचे प्रतिनिधित्व करणे आणि भारतासाठी पदक जिंकणे, हे त्याचे मुख्य ध्येय आहे. सोलापूरच्या या वेगवान सुपुत्राला पुढील वाटचालीस आणि जागतिक भरारीस शुभेच्छा!

## नर्मदा कनकी यांची राज्यस्तरीय पुस्तक परीक्षण स्पर्धेसाठी निवड

**सोलापूर, दि. २ जानेवारी-**

सर्व शिक्षक व अधिकारी यांच्यासाठी महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद पुणे यांच्यावतीने विविध स्पर्धा घेण्यात येत आहेत, त्यात न्यू.म.वि मराठी शाळेतील सहशिक्षिका सौ नर्मदा नरेश कनकी यांनी पुस्तक परीक्षण स्पर्धेत तालुकास्तरीय यश मिळवून विभागीय ( पुणे, सोलापूर, अहिल्यानगर) स्पर्धेतही द्वितीय क्रमांक प्राप्त केल्याबद्दल त्यांची राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे. स्पर्धेसाठी साने गुरुजी लिखित स्त्री जीवन आणि श्यामची आई या पुस्तकांचे त्यांनी परीक्षण केलेले आहे. त्यांच्या या यशाबद्दल शाळा समिती अध्यक्ष राजेश पटवर्धन व शाळेच्या मुख्याध्यापिका स्मिता माळवदकर यांनी त्यांचे अभिनंदन केले.



# एकश: सम्पत पुस्तकाच्या द्वितीय आवृत्तीचे आज लोकार्पण


### प्रिसिजन वाचन अभियान; लेखक दत्ता जोशी यांच्या अनुभवातून जिल्हावार पोलादी माणसं पुस्तक मालिका

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २ जानेवारी-**

नव्या वर्षातील पहिल्याच प्रिसिजन वाचन अभियानात लेखक, पत्रकार व विचारवंत दत्ता जोशी यांच्या 'एकश: सम्पत' या पुस्तकाच्या द्वितीय आवृत्तीचे लोकार्पण शनिवार, ३ जानेवारी रोजी संध्याकाळी ६:२५ वाजता डॉ. निर्मलकुमार फडकुले सभागृहात होणार आहे.

यावेळी दैनिक तरुण भारतचे मुख्य संपादक प्रशांत माने, मिलिंद कुलकर्णी, सिद्धाराम पाटील, महेश रामदासी, प्रशांत जोशी या मान्यवर संपादकांच्या हस्ते हे लोकार्पण होणार आहे. यावेळी लेखक दत्ता जोशी यांची प्रमुख उपस्थिती आहे.

श्री. जोशी यांनी ३५ वर्षांच्या लेखन कारकीर्दीत ४४ पुस्तके लिहिली असून महाराष्ट्रातील ३६ जिल्ह्यांपैकी २४ जिल्ह्यांत स्वतः वाहन चालवत सुमारे २.५ लाख किलोमीटरचा प्रवास केला आहे. या प्रवासात त्यांनी पहिल्या पिढीतील एक हजारहून अधिक उद्योजकांच्या त्यांच्या उद्योगस्थळी जाऊन मुलाखती घेतल्या. या अनुभवातून जिल्हावार पोलादी माणसं ही वैशिष्ट्यपूर्ण पुस्तक मालिका साकार झाली. मुळात पत्रकार असलेल्या दत्ता जोशी यांनी दैनिक तरुण भारत व दैनिक सकाळ या वृत्तपत्रांम ध्ये सुमारे १५ वर्षे विधायक पत्रकारिता केली. त्यानंतर स्वतंत्र व्यवसायिक म्हणून लेखन व जनसंपर्क क्षेत्रात ते गेली २० वर्षे कार्यरत असून त्यांना समृद्ध असा ३५ वर्षांचा लेखनानुभव लाभला आहे. पहिल्या पिढीतील उद्योजकांबरोबरच दुसऱ्या व तिसऱ्या पिढीतील उद्योजकांचा वेध घेणारी मुव्हिंग इन्स्पायरेशन ही मराठी व इंग्रजीतील दोन पुस्तकांची मालिका देखील गाजली आहे.




एकशः सम्पत हे पुस्तक आकाराने लहान असले तरी संपूर्ण भारताचा व्यापक पट मांडणारे आहे. काश्मीर ते पूर्वांचल आणि देशाच्या विविध भागांतील सामाजिक, सांस्कृतिक व राष्ट्रीय वास्तवाचे सखोल दर्शन या पुस्तकातून घडते. राष्ट्रप्रेम, संघटन, सामाजिक बांधिलकी आणि राष्ट्रउत्थान यांचा विचार प्रखरपणे मांडणारे हे लेखन वाचकांच्या मनात राष्ट्रचेतना जागवते. वाचन संस्कृती वृद्धिंगत करणे आणि सम ाजमन जागृत करणे हा उद्देश डोळ्यांसमोर ठेवून आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमात प्रेरणादायी लेखक दत्ता जोशी यांच्याशी थेट संवाद साधण्याची संधी वाचकांना मिळणार आहे. कार्यक्रमात रश्मी मोहोळकर आणि प्रथमेश कासार हे दोघे जण दत्ता जोशी लिखित पुस्तकांमधील काही भागांचे अभिवाचन करतील. सोलापुरातील उद्योजक, साहित्यप्रेमी, वाचनप्रेमींनी या कार्यक्रमास उपस्थित राहावे, असे आवाहन प्रिसिजन फाउंडेशनच्या अध्यक्षा डॉ. सुहासिनी शहा यांनी केले आहे.

# दारूबंदीसाठी मळोलीत जाधव यांचे बेमुदत उपोषण

## नवीन वर्षाच्या पहिल्या दिवशीच आंदोलन; व्यसनमुक्त युवक संघाचा पाठिंबा

**तभा वृत्तसेवा,**
**पिलीव, दि.२ जानेवारी-**

वेळापूर पोलीस स्टेशनच्या हद्दीत मळोली (ता.माळशिरस) येथील अवैध दारू व अंमली पदार्थविषयक तीन गुन्ह्यापेक्षा अधिक गुन्हे असणाऱ्यांना तालुक्यातून तडीपार करावे तसेच संपूर्ण दारूबंदी करावी या मागणीसाठी येथील सामाजिक कार्यकर्ते बलभीम जाधव यांनी बेमुदत उपोषण चालू केले आहे.

नविन वर्षाच्या पहिल्याच दिवशी हे आंदोलन सुरू करण्यात आले आहे. प्रशासनाने तत्काळ या मागणीचा विचार न केल्यास आंदोलन अधिक तीव्र करून रास्ता रोको व विविध प्रकारची आंदोलने केली जातील असे युवक वर्गातून बोलले जात आहे. येथील अवैध दारू व अंमली पदार्थाच्या वापराने सर्वसामान्य नागरिकांना व शालेय विद्यार्थ्यांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे. त्यामुळे अनेक सामाजिक संघटनांनी व महिलांनी या आंदोलनास पाठिंबा दिला आहे. वेळापूर पोलीस स्टेशन व उत्पादन शुल्क विभाग यांना वारंवार निवेदन व पत्रव्यवहार करून पाठपुरावा केला असून केवळ तात्पुरत्या स्वरूपात कारवाई केली जात आहे. ही कारवाई अधिक कडक करून मळोली येथील चालू असलेली अवैध दारू, जुगार, मटका, गांजा, गुटखा हे सर्व अंमली पदार्थ बंद व्हावेत अशी मागणी जाधव यांनी केली आहे.




उपोषणाच्या पहिल्या दिवशी व्यसनमुक्त युवक संघटनेचे राज्याचे मार्गदर्शक विलासबाबा जवळ (सातारा) यांनी भेट घेत पाठिंबा दिला. यावेळी विलासबाबा यांनी दारूबंदीसाठी शासन अति उदासीन असून केवळ गावातून उठाव झाला तरच हे शक्य असल्याचे मत व्यक्त केले. यावेळी महावितरणचे निवृत्त अभियंता प्रमोद भापकर, सोलापूर जिल्हाध्यक्ष विजय पराडे, माजी राज्यध्यक्ष शहाजी काळे, (दौंड), एकनाथ पराडे, आध्यत्मिक सेनेचे संजय पराडे यांनी भेट घेऊन आंदोलनाबद्दल चर्चा केली. गावातील महिला बचत गट, विविध सामाजिक संघटना आणि राजकीय क्षेत्रात काम करणाऱ्या व्यक्तींनी भेट घेऊन आपला पाठींबा व्यक्त केला आहे. वेळापूर पोलीस स्टेशनच्या माध्यमातून कठोर कारवाई जोपर्यंत होत नाही तोपर्यंत अन्न पाणी त्याग करणार असल्याचे बलभीम जाधव यांनी ठरविले आहे. ऐन हाडे गोठणाऱ्या थंडीत चालू असलेले हे आंदोलन एक सामाजिक कार्याची धग पेटवत आहे.

# जिल्हा कृषी अधिक्षक थेट बांधावर; मंद्रुपमध्ये पिकांची पाहणी

## शेतकऱ्यांना केले मार्गदर्शन

**तभा वृत्तसेवा,**
**दक्षिण सोलापूर, दि. २ जानेवारी-**

मंद्रूप (ता.दक्षिण सोलापूर) येथील प्रसाद शेंडगे यांच्या शेतातील इस्राईल तंत्रज्ञानाधारित ऊसशेतीच्या पाहणीसाठी जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी शुक्राचार्य भोसले यांनी थेट बांधावर जात पाहणी केली. यावेळी त्यांनी विशेष प्रात्यक्षिक घेत पाचट व्यवस्थापनाचे फायदे सांगितले.

यावेळी शेंडगे यांच्या शेतातील इस्राईल तंत्रज्ञानाचा वापर करून केलेल्या ऊस लागवडीची प्रशंसा केली. आधुनिक पद्धतीने लागवड, अचूक खत व्यवस्थापन आणि सूक्ष्म सिंचनाद्वारे पाणी नियोजन केल्यास ऊस उत्पादनात विक्रमी वाढ कशी करता येईल असे भोसले यांनी सांगितले. यावेळी गेल्या ८-१० वर्षांपासून 'ऊस पाचट कुट्टी' करून देण्याचे काम सातत्याने करणारे येथील विकास वाघमोडे यांचा श्री. भोसले यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी तालुका कृषी अधिकारी अवधूत मुळे, मंद्रूपचे सहाय्यक कृषी अधिकारी रमेश फरताडे, चंद्रकांत कुंभार, प्रसाद शेंडगे, विद्यानंद हिरेमठ, नितीन खराडे, प्रकाश वाघमोडे, अनिल खट्टे, महेश कचरे, संगण्णा गुंडके उपस्थित होते. यावेळी मार्गदर्शन करताना श्री. भोसले म्हणाले, ऊस कापणीनंतर शेतात शिल्लक राहिलेले पाचट जाळणे म्हणजे जमिनीची सुपीकता जाळण्यासारखे आहे. पाचट न जाळता ते शेतातच कुजवा, ज्यामुळे जमिनीचे आरोग्य सुधारेल आणि शाश्वत शेतीचा पाया रचला जाईल. पाचट व्यवस्थापनामुळे रासायनिक खतांवरील खर्चात मोठी बचत होत असल्याचे त्यांनी प्रत्यक्ष प्रात्यक्षिकाद्वारे शेतकऱ्यांना सांगितले. बदलत्या हवामानात आणि अनिश्चिततेच्या काळात शेतकऱ्यांनी आता केवळ पारंपारिक पिकांवर अवलंबून न राहता आधुनिक शेतीकडे वळावे. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर आणि बाजारपेठेचा अभ्यास करून केलेली फुलशेती आर्थिक समृद्धी नक्कीच आणू शकते, असा विश्वास तालुका कृषी अधिकारी मुळे यांनी व्यक्त केला.



# नववर्षानिमित्त पंढरपूरकरांसाठी 'स्वरतरंग'; बहारदार गीतांची मेजवानी

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर,दि.२ जानेवारी-**

नववर्षाचे औचित्य साधून स्वरसुधा, पंढरपूर यांच्यावतीने 'छोटे उस्ताद मी होणार सुपरस्टार फेम' गायक राजयोग धुरी यांच्या बहारदार गीतांची मेजवानी शनिवार दि.३ जोनवारी रोजी सायंकाळी ६ वाजता आरती प्रांगण, भक्ती मार्ग, पंढरपूर येथे विनामूल्य आयोजीत केला आहे. त्याचा लाभ सर्व पंढरपूरकरातील रसिकांनी घ्यावा असे आवाहन युटोपियन शुगर्सचे सर्वेसर्वा उमेश परिचारक यांनी केले आहे.



गायक राजयोग धुरी सुपरस्टार छोटे उस्ताद या रिॲलिटी शो मधील विजेता असून मोस्ट वोटेड पॉप्युलर सिंगर ऑफ महाराष्ट्र असा किताब यापुर्वी प्राप्त झाला आहे. सध्या त्याचे शास्त्रीय नाट्य संगीताचे अनेक रिल प्रसिध्द असून लोक त्याचे गाण्याला पसंती देत आहेत. सदर कार्यक्रमास माजी आमदार प्रशांत परिचारक यांचे उपस्थितीत होणार असून कार्यक्रम यशस्वीतेसाठी स्वरसुधा संस्थेचे ज्ञानेश्वर दुधाणे, डॉ. प्रसाद कुलकर्णी हे परिश्रम घेत आहेत.

# नवर्षाच्या स्वागताला 'दारू नाही दूध प्या' उपक्रम

## अक्कलकोट पोलिसांचा पुढाकार; ५०० लिटर दुधाचे केले वाटप

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. २ जानेवारी-**

सरत्या वर्षाला निरोप व नविन वर्षाचे स्वागत करताना दारू नाही, दूध प्या असा दिव्य संदेश देणारा उपक्रम उत्तर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक दीपक भिताडे यांनी अक्कलकोट शहरात घेतला. त्यामध्ये हजारो लोकांना दूध पाजवून नूतन वर्षाचे स्वागत केले.

नवीन वर्षाच्या पार्श्वभूमीवर ३१ डिसेंबरच्या रात्री मोठ्या प्रमाणावर तरुण पिढी दारू व अन्य व्यसनांकडे वळत असल्याचे वास्तव आहे. या गंभीर सामाजिक प्रश्नाला सकारात्मक दिशेने सामोरे जाण्यासाठी उत्तर पोलीस स्टेशनच्या वतीने दारू सोडा, दूध प्या हा विशेष कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. ५०० लिटर दूध खरेदी करून पोलीस निरीक्षक दीपक भिताडे यांनी एक स्तुत्य उपक्रम अक्कलकोट शहरात राबविल्याने सर्वत्र कौतुक होत आहे.



# पालापूर अन् रुद्देवाडीत ओम हवा मल्लिनाथ यात्रा उत्साहात

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि.२ जानेवारी-**

बोलो भारत माता की जय! हर हर महादेव! सदगुरू श्री ॐ हवा मल्लिनाथ महाराज की जय! अशा विविध घोषणांच्या निनादात पालापूर आणि रुद्देवाडी (ता. अक्कलकोट) येथील राष्ट्रीय संत ॐ हवा मल्लिनाथ महाराज देवस्थान यात्रा महोत्सव उत्साहात साजरा झाला.



जय भारत माता सेवा समिती नवी दिल्लीचे राष्ट्रीय संस्थापक अध्यक्ष तथा राष्ट्रीय संत श्री ॐ हवा मल्लिनाथ महाराज यांच्या पावन सानिध्यात रुद्देवाडी येथील जय भारतलिंग व पालापूर येथील महायुक्तीलिंग हवा मल्लिनाथ देवस्थानच्या वार्षिक यात्रा महोत्सवानिमित्त विविध धार्मिक व देशभक्तीपर कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. मावळत्या वर्षाला निरोप देत नववर्षाचे स्वागत विदेशी पार्टी संस्कृतीपासून दूर राहत भारतीय परंपरा, भक्ती आणि देशभक्तीच्या वातावरणात जल्लोषात करण्यात आले. दि.३१ डिसेंबर रोजी रात्रभर देशभक्तीपर भजन, भारूड व भक्तीमय कार्यक्रम झाले. १जानेवारी रोजी पहाटे श्रींची महापूजा व नवग्रह पूजा संपन्न झाली. त्यानंतर सकाळी १० वाजता रुद्देवाडी येथील पाटील वाडा तसेच पालापूर येथील मुलगे वाडा येथून देवस्थानापर्यंत विविध पारंपरिक वाद्यांच्या गजरात श्रींची भव्य पालखी मिरवणूक काढण्यात आली. रुद्देवाडी येथे जय भारतलिंगाची तसेच पालापूर येथे महायुक्तीलिंगाची स्थापना झाल्याने या परिसरात अध्यात्म, सामाजिक समरसता व राष्ट्रप्रेमाची भावना अधिक दृढ झाली आहे. यावेळी मोठ्या संख्येने भक्त उपस्थित होते. रुद्देवाडी येथे दुधनीचे नूतन नगराध्यक्ष प्रथमेश म्हेत्रे, आमदार कल्याणशेट्टी यांचे स्वीव सहायक प्रकाश पाटीलसह पंचक्रोशीतील सरपंच, ग्रामपंचायत सदस्य, सोसायटी चेअरमन यासह अनिल पाटील उपस्थित होते. चेअरमन आण्णाराव करवीर, हणमंत बिराजदार, शिवशरण करवीर, गुरुशांत आनुर, श्रीशैल पाटील, रमेश बिराजदार, रविकांत पाटील, बसवराज पाटील, नागनाथ कलमनी, रेवप्पा पुजारी, अमसिध्द शेरी, महादेव पुजारी, खाजप्पा कोतली, अमसिध्द शाखापुरे, सिध्दाराम शिंगे, भिमा फुलारी आदिंनी परिश्रम घेतले. तर पालापूर येथे सुरेश पाटील, राजेंद्र मुलगे, सुनील कळकुटगे, मल्लिनाथ स्वामीं, सुनील मुलगे, मधुकर पाटील, परमेश्वर बेलेंबे, मल्लिनाथ मुलगे, गुरुशान्त मुनाळे, शंभू स्वामीं आदिनी परिश्रम घेतले.




# एमआयटी बार्शीत क्रीडा समारंभ

**बार्शी, दि. २ जानेवारी-**

येथील श्रीमती प्रयाग कराड विश्वशांती इंग्लिश मिडियम हायस्कूलमध्ये वार्षिक क्रीडा समारंभ पार पडला. याचे उद्‌घाटन तालुका पोलीस ठाणे बार्शीचे सहाय्यक पोलीस निरीक्षक दिलीप ढेरे, तालुका क्रीडा अधिकारी सचिन रणदिवे, गटशिक्षण अधिकारी अनिल बनसोडे, एमआयटी ज्युनिअर कॉलेजचे प्राचार्य डॉ. सचिन चव्हाण, पालक-शिक्षक संघाचे अध्यक्ष व प्राचार्य अनीश नाथ यांच्या उपस्थितीत दिप प्रज्वलनाने झाले. शाळेचे मैदान रंगीबेरंगी ध्वज, बॅनर्स व फुग्यांनी आकर्षकपणे सजविण्यात आले होते. त्यानंतर विश्वशांती प्रार्थना व गणेश वंदना सादर करण्यात आले. विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या वाद्यवृंद, संगीत व विविध सांस्कृतिक कार्यक्रमांनी उपस्थितांची मने जिंकली. इयत्ता पहिली ते दहावीच्या विद्यार्थ्यांनी केलेले प्रभावी सूत्रसंचालन हे कार्यक्रमाचे विशेष आकर्षण ठरले. प्राचार्य अनीश नाथ यांनी वार्षिक शालेय अहवाल सादर केला. विविध क्रीडा स्पर्धांतील विजेत्या संघांना पदके, चषक व प्रमाणपत्रे प्रदान करण्यात आली. यावेळी 'हाऊस ट्रॉफी' यलो हाऊसने पटकावली. अश्विनी बिडवे यांनी आभार मानले. पसायदानाने कार्यक्रमाची सांगता झाली.

# स्व. सुशील व शितल राऊत स्मरणार्थ ३४६ जणांचे रक्तदान

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. २ जानेवारी-**

स्व.सुशिल व शितल राऊत यांच्या स्मरणार्थ स्व.सुशिल-शितल राऊत मित्र परिवार व जय शिवराय प्रतिष्ठानच्यावतीने घेण्यात येणाऱ्या शिबिरांत ३४६ जणांनी रक्तदान करुन श्रद्धांजली वाहिली.

गेल्या तेरा वर्षांपासून हा उपक्रम घेण्यात येतो. शिबिरासाठी माजी आमदार राजेंद्र राऊत, डॉ. संजय अंधारे, डॉ. राहुल मांजरे, डॉ. कांबळे, नगरसेवक दीपक राऊत, नगरसेवक अनिरुद्ध वाणी, नगरसेवक रोहित पाटील, डॉ.बी.वाय. यादव, गटनेते नगरसेवक विजय राऊत, नगराध्यक्ष तेजस्विनी कथले, शिवसेना नेते भाऊसाहेब आंधळकर, माजी नगराध्यक्ष असिफ तांबोळी, नगरसेवक प्रशांत कथले, पोलीस निरीक्षक बालाजी कुकडे, शिवसेना नेते विजय माने, डॉ. सुनिल फटाले, डॉ. सचिन करळे, नगरसेवक संतोष बारंगुळे, नगरसेवक भारत पवार, नगरसेवक संदेश काकडे, नगरसेवक मदन गव्हाणे, भैरव शिंदे, स्मार्ट ॲकेडमीचे सचिन वायकुळे, तुळशीदास मस्के या मान्यवरांनी भेट दिली. सर्व नवनिर्वाचित नगरसेवकांच्या निवडीबद्दल संघटनेच्यावतीने सत्कार करण्यात आला. नगराध्यक्षांनी सत्काराच्याप्रसंगी



हार, बुके, फुले, शाल न देता शालेय साहित्य देण्याची भावना व्यक्त केली होती. ही गोष्ट लक्षात घेऊन १२० विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी शालेय साहित्य देऊन नवनिर्वाचित नगराध्यक्षांचा देखील अनोख्या पद्धतीने सत्कार करण्यात आला. शिबिरासाठी किरण राऊत, राजेश राऊत, राजन ठक्कर, अनिल जैंद, सचिन ललवाणी, सुनिल ललवाणी, सुधीर राऊत, रावसाहेब यादव, राहुल वडेकर, सुहास गुंड, सचिव विनीत नागोडे, अजय पाटील, ॲड. गणेश हांडे, किरण कोकाटे, विजय राऊत, अमोल वाणी, विनायक हांडे, सचिन राऊत, ॲड आकाश तावडे, संकेत वाणी, बाबासाहेब बारकुल, सुस्मित बागल, श्रीकांत राऊत, अनिल शेलार, कृष्णा परबत, विनायक घोडके, सागर क्षीरसागर, राहुल घोडके, अमित नागोडे, विकास पौळ, अविनाश वैदय, माधव जाधव, गणेश वाणी, डॉ. राहुल शेळके, सुरज वाणी, यश कदम, गणेश पन्हाळकर, वैभव विधाते, कृष्णा शिंदे, सागर माने, अक्षय अंबुरे, सतीश राऊत, सागर माने, मनोज मोरे, नागराज सातव, दीप उपळकर, राहुल जाधव,ओम सुरसवे त्याच बरोबर भगवंत ब्लड बँकेचे चेअरमन शशिकांत जगदाळे, गणेश जगदाळे, अशपाक काझी उपस्थित होते.



# पिलीवच्या कर्मवीर भाऊराव पाटील विद्यालयास विजेतेपद

**पिलीव, दि. २ जानेवारी-**

माळशिरस तालुक्यातील पिलीव येथील कर्मवीर भाऊराव पाटील विद्यालयाच्या जिल्हा टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धेत १९ वर्षांखालील मुलीच्या गटात विजेतेपद पटकाविले. या कामगिरीवर संघाची अहमदनगर होणाऱ्या स्पर्धेसाठी निवड झाली. संघास क्रिडा विभागप्रमुख सत्यवान भंडारे व वाजीद शेख यांचे मार्गदर्शन लाभले. यशस्वी विद्यार्थ्यांचे व मार्गदर्शक शिक्षकांचे मुख्याध्यापक अशोक बागल, पर्यवेक्षक रमेश किरगत, शाळा व्यवस्थापन समीतीचे सदस्य संजय पाटील यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी कल्पना कोळेकर, इंगळे, पाटील, मेटकरी, वरिष्ठ लेखनिक भोरकडे आदी उपस्थित होते. विजेता संघ : कर्णधार तमशीन शेख,अमीन शेख,मोहीनुर पठाण,पायल माने,राधिका चव्हाण, आरती सुळे, समृद्धी सुळे,अक्षरा सुळे,प्राजक्ता आटपाडकर, रुतीका जाधव, संस्कृती माने,आरुषी बंडगर.

## महत्वाचे...



# शेतकऱ्यांना बँक कर्जाचे मार्गदर्शन

**टेंभुर्णी, दि. २ जानेवारी-**

लवंग (ता.माळशिरस) येथे महात्मा फुले कृषी विद्यापीठ राहुरी संलग्न अकलूज येथील रत्नाई कृषी महाविद्यालयाच्या ग्रामीण जागरूकता कार्यानुभव कार्यक्रमांर्गत कृषी कन्यांकडून गावातील शेतकऱ्यांसाठी बँक कर्ज प्रस्ताव तयार करण्याचे प्रात्यक्षिक सादर करण्यात आले. या उपक्रमाचा उद्देश शेतकऱ्यांना आर्थिक मदत मिळवण्यासाठी आवश्यक असलेल्या बँक दस्तऐवजांची माहिती देणे आणि व्यवहारिक मार्गदर्शन देणे हा आहे. कृषीकन्या शेतकऱ्यांसमोर उदाहरणाद्वारे दाखवले की, बँक कर्जासाठी अर्ज तयार कसा करायचा? आवश्यक कागदपत्रे कोणती आहेत? व बँक कर्ज मिळण्यासाठी कोणत्या गोष्टींचा विचार केला जातो? शेतकऱ्यांना योग्य मार्गदर्शन दिल्यास, माहिती दिल्यास कर्ज मिळवणे अधिक सुलभ होते आणि शेतकऱ्यांना सहकार्य होते. कृषीकन्या वैष्णवी शेळके, सीमा सातपुते, गौरी होले, वैष्णवी खाडे, ऋतुजा पवार, प्राजक्ता जाधव, प्रेरणा पवार, साक्षी डोंबाळे यांनी उपक्रमातून व्यवहारिक अनुभव मिळवला. यावेळी शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष संग्राम सिंह मोहिते-पाटील, प्राचार्य आर. जी. नलावडे, कार्यक्रम समन्वयक प्रा. एस.एम.एकतपुरे, कार्यक्रम अधिकारी प्रा. एम.एम. चंदनकर, प्रा. एच. व्ही. खराडे यांचे मार्गदर्शन लाभले.




# बार्शी आगारात सुरक्षितता अभियान

**बार्शी, दि. २ जानेवारी-**

महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्यावतीने दरवर्षीप्रमाणे १ ते १० जानेवारी दरम्यान बार्शी आगारात सुरक्षितता अभियान राबविण्यात येत असून या अभियानाअंतर्गत बार्शी आगारात आयोजित कार्यक्रमाचे उद्घाटन प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालयाच्या बार्शी सेवाकेंद्राच्या संचालिका संगीता यांच्या हस्ते संपन्न झाले. कार्यक्रमास परिवहन विभागातील वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. मार्गदर्शन करताना संगीतादिदी म्हणाल्या की, चालक व प्रवासी यांचे ऋणानुबंध अतूट असतात. प्रवासी चालकाच्या विश्वासावर प्रवास करतात, तर चालकावर त्यांच्या सुरक्षिततेची मोठी जबाबदारी असते. त्यामुळे अपघातमुक्त प्रवासासाठी चालकाचे मनःस्थैर्य अत्यंत आवश्यक असून, ते राजयोग अभ्यास व व्यसनमुक्त जीवनशैलीद्वारे सहज साध्य होऊ शकते. कार्यक्रमास निशा, मुन्नी, मोहन यांच्यासह बंडगर, विजय हांडे, आकाश नाईक यांची प्रमुख उपस्थिती होती. आभार महेंद्र क्षीरसागर यांनी मानले. सूत्रसंचालन पुरुषोत्तम वाघुलकर यांनी केले.



# धायखिंडी येथे राष्ट्रीय सेवा योजनेचे श्रम संस्कार शिबीर

**जेऊर, दि.२ जानेवारी-**

धायखिंडी (ता.करमाळा) येथे यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, करमाळाच्या राष्ट्रीय सेवा योजना +२ स्तर व ग्रामपंचायत धायखिंडी यांच्या संयुक्त विद्यमाने श्रम संस्कर शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. दि. ३ ते ९ जानेवारी या दरम्यान श्रमसंस्कार शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे. या दरम्यान या गांवात १००० पेक्षा जास्त वृक्षलागवड करण्यात येणार आहे तसेच जनावराचे लसीकरण, आरोग्य शिबीर, जलतारा प्रकल्प , धनकचरा व्यवस्थापन, गांडूळखत, परसबाग, सेंद्रिय शेती, जलव्यवस्थाप, भूमीपुत्राचा सन्मान सोहळा व हळदी कुंकुवाचा कार्यक्रम घेण्यात येणार आहेत. स्वच्छता अभियान ग्राम सर्वेक्षण अशा विविध व्याख्यानाच्या माध्यमातून ग्रामस्थाचे प्रबोधन केले जाणार आहे. शिबीर यशस्वी करण्यासाठी कनिष्ठ विभागाचे प्रशासकीय अधिकारी संभाजी किर्दाक व राष्ट्रीय सेवा + २ स्तरचे जिल्हा समन्वयक प्रा. लक्ष्मण राख, प्रा. संजय पाटील, प्रा.मनोहर धिंदळे, प्रा.दिलीप थोरवे, प्रा. भाऊसाहेब फुके, प्रा. सुजाता भोरे यांनी परिश्रम घेतले.



# व्हॉइस ऑफ मीडिया बार्शी शहराध्यक्षपदी झिंगाडे

**बार्शी, दि. २ जानेवारी-**

व्हॉइस ऑफ मीडिया बार्शी शहराची बैठक उत्साहात पार पडली. या बैठकीत शहर कार्यकारिणीची नव्याने निवड करण्यात आली. यामध्ये अध्यक्षपदी निलेश झिंगाडे, उपाध्यक्षपदी मयूर थोरात तर सचिवपदी समाधान चव्हाण यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी पत्रकार अजित कुंकूलोळ होते. जिल्हा सचिवपदी निवड झाल्याबद्दल अजित कुंकूलोळ यांनी ओंकार हिंगमिरे यांचा विशेष सत्कार करण्यात आला. ६ जानेवारी रोजी पत्रकार दिनानिमित्त ज्येष्ठ पत्रकारांचा सन्मान सोहळा आयोजित करण्याबाबत चर्चा करुन कार्यक्रमाची रुपरेषा निश्चित करण्यात आली. बैठकीस व्हॉइस ऑफ मीडिया डिजिटल विंगचे राज्य कोषाध्यक्ष प्रविण पावले, जिल्हा सचिव ओंकार हिंगमिरे यांच्यासह शाम थोरात, प्रदीप माळी, विजय शिंगाडे, जमीर कुरेशी, अपर्णा दळवी उपस्थित होते.

CMYK

# आपला जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## नेट-सेट परीक्षेतील यशासाठी नियोजन आवश्यक : प्रा.डॉ. पालके

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी, दि.२ जानेवारी**

नेट व सेट परीक्षा प्राध्यापक पदाच्या पात्रता व नियुक्तीसाठी उत्तीर्ण होणे आवश्यक असते. त्यासाठी नियोजन, कष्ट, चिकाटी, तज्ज्ञांचे मार्गदर्शन व सराव आवश्यक असल्याचे मत डॉ. राहुल पालके यांनी व्यक्त केले.



येथील श्री शिवाजी महाविद्यालयातील प्रा.डॉ. पालके यांचे सांगलीच्या बळवंत कॉलेज येथे एकदिवशीय व्याख्यान झाले. इंग्रजी, इतिहास व वाणिज्य व व्यवस्थापन या विभागांनी या कार्यशाळेचे आयोजन केले होते. ते स्वतः ७ विषयात १९ वेळा उत्तीर्ण आहेत. तसेच त्यांनी या अगोदर विविध ठिकाणी वेगवेगळ्या शैक्षणिक विषयावर व्याख्याने दिली आहेत. याप्रसंगी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य प्रा.डॉ. चंद्रकात बोबडे, उपप्राचार्य डॉ. आर. एस.मरे, इंग्रजी विभाग प्रमुख प्रा. डॉ. संतोष राजगुरु, डॉ. आर. जी. किर्दत हे उपस्थित होते.

## महत्त्वाचे



### अंजनगाव (खे) येथील बाधित द्राक्ष बागेला आमदारांची भेट

**माढा, दि.२ जानेवारी-**

अंजनगाव (खे) (ता. माढा) येथील शेतकरी विश्वनाथ हरिभाऊ पांढरे यांच्या शेतातील द्राक्षबाग भेसळयुक्त खतामुळे जळाल्याची घटना घडली. याची गंभीर दखल घेत माढा विधानसभेचे आमदार अभिजीत पाटील यांनी आज प्रत्यक्ष शेतात भेट देऊन पाहणी केली. यावेळी संबंधित खत कंपनीचे प्रतिनिधी तसेच कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांना आमदार पाटील यांनी जळीत झालेल्या द्राक्षबागेबाबत सविस्तर माहिती घेऊन तात्काळ कार्यवाहीच्या सूचना दिल्या. सदर खताचे नमुने हैदराबाद येथील अधिकृत प्रयोगशाळेत पाठवून सखोल चौकशी करण्यात यावी तसेच दोषी आढळणाऱ्या कंपनीवर कठोर कारवाई करण्यात यावी, असे स्पष्ट निर्देश त्यांनी दिले. तसेच कृषी विभागातील अधिकाऱ्यांना या प्रकरणी तात्काळ कार्यवाही करून संबंधितांना लेखी नोटीस देण्याबाबत सूचना देण्यात आल्या असून, बाधित शेतकऱ्यांना योग्य ती नुकसान भरपाई देण्याबाबतही स्पष्ट आदेश देण्यात आले आहेत. यावेळी नितीन कापसे, तालुका कृषी अधिकारी चंदन, कृषी गुणवत्ता नियंत्रण अधिकारी गावडे , विनंती कुलकर्णी, योगेश पाटील, नागेश इंगळे, दत्तात्रय पाटेकर, समाधान इंगळे यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. सदर प्रकरणात शेतकऱ्यांची कुठेही चूक आढळल्यास त्याची जबाबदारी आपण स्वतः स्वीकारू, असे ठाम आश्वासन आमदार अभिजीत पाटील यांनी दिले.

### आश्रमशाळांमधील शिक्षकांना द्यावी लागणार टिईटी; आश्रम शाळामध्ये पात्रताधारक शिक्षक

**दक्षिण सोलापूर, दि. २ जानेवारी-**

महाराष्ट्र शासनाच्या आदिवासी विकास विभागाने नुकत्याच जानेवारी २०२६ मध्ये जारी केलेल्या नवीन आदेशानुसार, राज्यातील आश्रमशाळांमधील शिक्षकांनाही शिक्षक पात्रता परीक्षा (टीईटी) उत्तीर्ण होणे अनिवार्य करण्यात आले आहे. जे शिक्षक २००९ नंतर सेवेत रुजू झाले आहेत किंवा ज्यांना सेवानिवृत्तीसाठी ५ वर्षांपेक्षा जास्त कालावधी शिल्लक आहे, त्यांना दोन वर्षांत टीईटी उत्तीर्ण करावे लागेल, अन्यथा सेवेची समाप्ती होऊ शकते, हा आदेश सुप्रीम कोर्टाच्या निर्णयावर



आधारित असल्यामुळे शिक्षकांमध्ये नाराजी पसरली आहे. राज्यातील आदिवासी विकास विभागाच्या नियंत्रणाखाली कार्यरत असलेल्या अनुदानित आश्रमशाळांमधील प्राथमिक शिक्षकांसाठी महाराष्ट्र शासनाने महत्त्वपूर्ण आणि दूरगामी परिणाम करणारा निर्णय घेतला आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या नुकत्याच दिलेल्या निकालाच्या पार्श्वभूमीवर, शिक्षक पात्रता परीक्षा (टीईटी) उत्तीर्ण नसलेल्या प्राथमिक शिक्षकांसाठी ही परीक्षा अनिवार्य करण्यात आली आहे. याबाबतचा शासन आदेश १ जानेवारी २०२६ रोजी निर्गमित करण्यात आला असून, त्याची तातडीने अंमलबजावणी करण्याचे आदेश संबंधित अधिकाऱ्यांना देण्यात आली आहे.शिक्षण हक्क कायदा (आरटीई) २००९ राज्यात १ एप्रिल २०१० पासून लागू करण्यात आला. या कायद्यानुसार प्राथमिक स्तरावर अध्यापन करणाऱ्या शिक्षकांसाठी राष्ट्रीय शिक्षक शिक्षण परिषद (NCTE) यांनी टीईटी ही आवश्यक पात्रता निश्चित केली आहे. या पार्श्वभूमीवर सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या स्पष्ट निर्देशांनुसार आता अशा शिक्षकांना टीईटी उत्तीर्ण होणे बंधनकारक करण्यात आले आहे.

### सोजर फार्मसीच्या दोन प्राध्यापकांना पीएचडी; औषध संशोधनात महत्वपूर्ण योगदान

**बार्शी, दि.२ जानेवारी-**

यशोदा शिक्षण प्रसारक मंडळ संचलित सोजर कॉलेज ऑफ फार्मसी, खांडवीचे प्रा. शिवाजी पाटील व प्रा. रणजीत शेळके यांना नॅक ऍक्रेडिटेड माधव युनिव्हर्सिटी पिंडवारा सिरोही, राज्यस्थान विद्यापीठ




यांच्याकडून फामर्स्युटिकल सायन्स या विषयात पीएचडी पदवी प्रदान करण्यात आली आहे. प्रा. शिवाजी पाटील यांनी फॉर्मलेशन अँड एवोल्युशन ऑफ इन्व्हेजोम्स लोडेड जेल फॉर इम्प्रूव्ह् अँटी फंगल ऍक्टिव्हिटी या विषयावर संशोधन केले. तसेच प्रा. रणजीत शेळके यांनी अनालिटिकल मेथड डेव्हलपमेंट अँड वलिडेशन फॉर दि इस्टिमेशन ऑफ अँटीहायप्रेटेनसिव्ह ड्रग्स युजिंग स्पेक्ट्रोस्कॉपिक अँड क्रोमॅटोग्राफिक टेक्निक्स या विषयावर संशोधन केले. सदर शोधनिबंधावरती दोघांचे राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर दोन संशोधन पेपर सादर केले आहेत. या संशोधनातून भारतीय औषधनिर्मिती क्षेत्राला नव्या दिशा मिळण्यास मदत होईल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे. या प्रकल्पासाठी त्यांना माधव युनिव्हर्सिटी राजस्थानचे कुलगुरु, फार्मसी अधिष्ठता व प्राचार्य डॉ. सुशील भार्गव व डॉ. सुनील कुमार यांचे मार्गदर्शन लाभले. पीएचडीसाठी प्राचार्य डॉ. सुजित करपे यांचे मार्गदर्शन व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे सहकार्य लाभले. दोघांच्या यशाबद्दल संस्थाध्यक्ष अरुण बारबोले, सचिवा कल्पना बारबोले, प्राचार्य डॉ. सुजित करपे यांनी त्यांचे अभिनंदन केले.

## माघवारीसाठी पंढरीत येणार ३ ते ४ लाख भाविक

### प्रांताधिकारी सचिन इथापे यांच्या सूचना

### वाळवंट, प्रदक्षिणामार्ग व मंदिर परिसरात अतिक्रमण होणार नाही याची दक्षता घ्या

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.२ जानेवारी -**

माघ शुद्ध एकादशी २९ जानेवारी २०२६ रोजी असून, यात्रा कालावधी २३ जानेवारी ते २ फेब्रुवारी आहे. या कालावधीत पंढरपुरात तीन ते चार लाख भाविक येतात. यात्रा कालावधित भाविकांच्या सोयी सुविधांना प्राधान्य देऊन, वाळवंट, प्रदक्षिणा मार्ग व मंदिर परिसर तसेच शहरातील मुख्य रस्त्यांवर अतिक्रमण होणार नाही याची दक्षता घ्यावी अशा सूचना प्रांताधिकारी सचिन इथापे यांनी दिल्या आहेत.

माघवारी पूर्व नियोजनाबाबत प्रांत कार्यालयात बैठक झाली. या बैठकीस कार्यकारी अभियंता अमित निमकर, तहसीलदार सचिन लंगुटे, मुख्याधिकारी महेश रोकडे, तालुका वैद्यकीय अधिकारी डॉ.एकनाथ बोधले, उपजिल्हा रुग्णालयाचे वैद्यकीय अधिक्षक विजयकुमार सरडे, पोलीस निरीक्षक विश्वजीत घोडके, मंदिर समितीचे लेखाधिकारी मुकेश आनेचा, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी श्री.ढोले यांच्यासह संबंधित विभागाचे अधिकारी उपस्थित होते. यावेळी प्रांताधिकारी श्री.इथापे म्हणाले, यात्रा कालावधीत नगरपालिकेने शुध्द व पुरेशा पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करावी. नदीपात्रातील वाळवंटाची व घाटाची स्वच्छता करावी. ६५ एकर व नदीपात्रात तात्पुरते शौचालयाचे उभारणीचे नियोजन करावे. ६५ एकरमध्ये भाविकांना स्वच्छ पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, पुरेसा वीजपुरवठा आवश्यक सुविधा उपलब्ध करुन द्याव्यात. मंदिर समितीने यात्रा कालावधीत दर्शन रांग दर्शन मंडप या ठिकाणी आवश्यक सुविधा उपलब्ध कराव्यात. दर्शन रांगेत घुसखोरी होणार नाही याची दक्षता घेऊन जादाचे सुरक्षा रक्षक नेमावेत.



#### पोलिसांतर्फे पो.नि. घोडकेंनी दिली माहिती

यात्रा कालावधीत वाहतुक व्यवस्था सुरळीत रहावी व भाविकांना सुरक्षेबाबत कोणतेही अडचण येऊ नये यासाठी पोलीस प्रशासनाने आवश्यक नियोजन केले असल्याचे पोलीस निरीक्षक विश्वजीत घोडके यांनी सांगितले.

#### पाणीपुरवठा, स्वच्छतेबाबत मुख्याधिकाऱ्यांची माहिती

नगरपालिका प्रशासनाकडून वारी कालावधीत करण्यात येणाऱ्या पाणी पुरवठा, स्वच्छता, तात्पुरते शौचालय, कचरा व्यवस्थापन आदी बाबतची माहिती मुख्याधिकारी महेश रोकडे यांनी दिली.

#### औषधसाठा, यांत्रिकी बोटी, जादा सुरक्षांबाबत सतर्क रहावे

आरोग्य विभागाने यात्रा कालावधीत पुरेसा औषधसाठा उपलब्ध ठेवावा. नदी पात्रात पुरेसा पाणीसाठा उपलब्ध राहील याबाबत पाटबंधारे विभागाने नियोजन करावे. नदीपात्रात प्रशिक्षित कर्मचाऱ्यासह यांत्रिक बोटी सज्ज ठेवाव्यात. आवश्यक ठिकाणी सूचना फलक लावावाते. मंदिर प्रशासनाने पोलीस प्रशासनाला जादाचे सुरक्षा रक्षक उपलब्ध करून द्यावेत. अन्न औषध प्रशासनाने खाद्यपदार्थाच्या व प्रसादाच्या दुकानांची वेळोवेळी तपासणी करावी अशा सूचनाही यावेळी प्रांताधिकारी इथापे यांनी दिल्या.

#### मंदिर प्रशासनाकडून सुलभ दर्शनाला प्राधान्य

माघ यात्रा कालावधीत मंदिर समितीने भाविकांच्या सुलभ व जलद दर्शनाला प्राधान्य दिले असून भाविकांसाठी दर्शन मंडप, दर्शन रांग या ठिकाणी आवश्यक सोयी सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार असल्याचे मंदिर समितीचे लेखाधिकारी मुकेश आनेचा यांनी सांगितले.

## बंजारा समाजभूषण वसंतराव नाईक यांचे विचार प्रत्येक तांड्यात रुजविणार : राठोड

### बंजारा समाजाच्या विकासासाठी आंदोलनाची तयारी

**तभा वृत्तसेवा,**
**दक्षिण सोलापूर, दि. २ जानेवारी-**

तांडे, वाड्या व वस्त्यांमध्ये वास्तव्य करत भारतभर भटकंती करीत जीवन जगणाऱ्या बंजारा समाजाला संघटित करण्यासाठी स्व. वसंतराव नाईक यांनी ऑल इंडिया बंजारा सेवा संघाची स्थापना केली. त्यांच्या विचारांचा वारसा प्रत्येक तांड्यापर्यंत पोहोचवण्याचा निर्धार असल्याचे ऑल इंडीया बंजारा सेवा संघाचे नूतन जिल्हाध्यक्ष मोतीलाल राठोड यांनी दैनिक 'तरूण भारत'शी बोलताना सांगितले. यावेळी आरके फाउंडेशनचे सावन चव्हाण, श्रीमंत पवार, प्रेम राठोड, विठ्ठल राठोड यांच्यासह बंजारा समाज बांधव उपस्थित होते.



यावेळी राठोड पुढे म्हणाले कि, बंजारा समाज हा भटका आहे. शासनाच्या विविध योजनांमुळे तांड्यांचा विकास होत आहे. मात्र आजही समाजातील तरूण उच्च शिक्षण घेऊन नोकरीपासून वंचित आहेत. अशा तरूणांना उद्योग व व्यवसाय उभारणीसाठी विविध योजनांद्वारे कर्ज मिळवून देण्यासाठी प्रयत्न करणार आहे. मंद्रूप सेवालाल नगर तांड्याची आदर्श तांडा म्हणून परिचय असून जिल्ह्यातील इतर तांड्यांमध्येही शासनाच्या योजना पोहोचवून बंजारा समाज बांधवांना विकासाच्या प्रवाहात आणणार आहे. तसेच जिल्ह्यातील अनेक गावात विखुरलेल्या समाजाला एकत्रित करून समाजाच्या विविध मागण्यांसाठी आंदोलन करणार आहे. आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूकीत सर्वच पक्षांकडून बंजारा समाजाला प्रतिनिधीत्व मिळवून देण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे मोतीलाल राठोड यांनी सांगितले.



## अकलूजमध्ये वीरशैव दिनदर्शिकेचे प्रकाशन

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि.२ जानेवारी-**

येथील महात्मा बसवेश्वर बहुद्देशीय संस्थेच्या वीरशैव दिनदर्शिका २०२६ चे प्रकाशन लिंगायत समाजाचे अध्यक्ष गोपाळ गुळवे यांच्या हस्ते झाले. यावेळी महादेव मंदिरास टीव्ही संच भेट देण्यात आला.

यावेळी महालिंग राऊत, मार्गदर्शक तात्यासो गुळवे, चंद्रकांत नाना, अशोक शेटे, नागेश नष्टे, आण्णा आर्वे, नगरसेवक विलास शिरसागर, महेश शेटे, रामलिंग सोनके, डॉ चंदन सरताळे, दिग्विजय शेटे, उदय शेटे, प्रा.रामलिंग सावळजकर, सुनील जठार, राजमाने, पप्पू आंधळकर, उमेश नडगिरे, महादेव मंदिर पुजारी जगदीश स्वामी व महिला अध्यक्ष राजश्री गुळवे, सोनाली शेटे, कीर्ती शेटे, स्वामी व समाजबांधव उपस्थित होते. नवीन टीव्ही संच मा.अध्यक्ष व समाजबांधव यांना १०८ राजगुरू सिध्दलिंग शिवाचार्य महाराज भंढारगृह शिखर शिंगणापूर यांच्या अभिष्टचिंतनानिमित्त देण्यात आला. सावळजकर यांनी मनोगत व्यक्त केले. संस्थेचे सचिन गुळवे, शिवकुमार गुळवे, संदीप कुंभार, भीमाशंकर वैद्य, योगेश गुळवे, सोमनाथ कथले, गणेश नरुळे, गणेश उंबरदंड, हृषिकेश शेटे, विश्वनाथ बनगार, महेश डिकोळे, मंगेश नरुळे, सुजित बामणकर, राहुल पाटील, संतोष मालगावे यांनी परिश्रम घेतले. योगेश गुळवे यांनी आभार मानले.

## डॉ. राजेंद्र चोरमले यांची पशुसंवर्धन विभाग सहाय्यक आयुक्तपदी पदोन्नती

**तभा वृत्तसेवा,**
**पिलीव,दि.२ जानेवारी-**

माळशिरस तालुक्यातील काळमवाडी येथील डॉक्टर राजेंद्र आगतराव चोरमले यांची पशुधन विकास अधिकारी या पदावरून नुकतीच सहहायक आयुक्त पशुसंवर्धन विभाग यवतमाळ याठिकाणी पदोन्नती झाली आहे. डॉक्टर राजेंद्र चोरमले यांचे दहावीपर्यंतचे शिक्षण पिलीव येथील कर्मवीर भाऊराव पाटील विद्यालयात तर बारावीचे शिक्षण देवापुर येथे तर बिव्हीएससिचे शिक्षण मुंबई येथे तर एरव्ही एससीचे शिक्षण अकोला येथे झाले आहे.सध्या ते फोंडशिरस येथे पशुधन विकास अधिकारी म्हणून कार्यरत होते.या पदोन्नतीबददल डॉकटर राजेंद्र चोरमले यांचे माजी विद्यार्थी संघटना आठवणी ९५ तसेच विविध क्षेत्रातील मान्यवरांकडून अभिनंदन व कौतुक होत आहे.



## जनतेला त्रास दिल्यास कोणाचीही गय करणार नाही

### आ. समाधान आवताडे यांनी आढावा बैठकीत अधिकाऱ्यांना भरला दम

**तभा वृत्तसेवा,**
**मंगळवेढा, दि.२ जानेवारी-**

मतदारसंघातील सर्वसामान्य जनतेला नाहक त्रासाला सामोरे जावे लागत असल्यास मी कोणाचीही गय करणारा आमदार नाही त्यामुळे प्रत्येक प्रशासकीय अधिकाऱ्याने आपापल्या कर्तव्य सेवेशी प्रामाणिक राहून सातत्यपूर्ण कामातून जनतेच्या व तालुक्याच्या सर्वांगीण विकासाला योगदान दिले पाहिजे असे मत पंढरपूर-मंगळवेढा विधानसभा मतदारसंघाचे आमदार समाधान आवताडे यांनी व्यक्त केले आहे.




जोगेश्वरी मंगल कार्यालयात मंगळवेढा पंचायत समितीच्या अधिकारी वर्गाची आढावा बैठकीप्रसंगी ते प्रत्येक शासकीय विभागांच्या विविध बाबींचा आढावा घेताना बोलत होते. बैठकीत नागरिकांशी संबंधित योजना वेळेत व प्रभावीपणे राबवणे, प्रलंबित कामे लवकरात लवकर पूर्ण करणे आणि प्रशासन अधिक लोकाभिमुख करण्याबाबत स्पष्ट सूचना त्यांनी दिल्या. ग्रामीण भागातील विकासकामांना गती देणे, शेतकरी, महिला, युवक आणि सर्वसामान्य नागरिकांना योजनांचा प्रत्यक्ष लाभ मिळवून देणे, हाच या बैठकीचा मुख्य उद्देश होता.

या बैठकीस उपमुख्य कार्यकारी अधिकारी सूर्यकांत भुजबळ, गटविकास अधिकारी जस्मिन शेख, नूतन नगरसेवक प्रा.येताळा भगत, प्रदीप खांडेकर, रामेश्वर मासाळ, अंबादास कुलकर्णी, काशिनाथ पाटील, सरोज काझी, सुधाकर मासाळ, रमेश भांजे, शिवाजी पटाप, नितीन पाटील, धनंजय पाटील, गौडाप्पा बिराजदार, महात्मा बसवेश्वर स्मारक कृती समितीचे कार्याध्यक्ष अँड.शिवानंद पाटील, माजी सरपंच काका मिसकर आदी उपस्थित होते.

## माळशिरसच्या अनेक सरपंच, चेअरमन सदस्यांचा भाजपात प्रवेश

### माजी आमदार राम सातपुते यांची उपस्थिती

### बांगर्डे चव्हाणवाडी, डोंबाळवाडी (कु), फडतरी, निटवेवाडी, शिवारवस्ती, पिंपरीतील कार्यकर्ते सहभागी

**तभा वृत्तसेवा,**
**माळशिरस, दि.२ जानेवारी-**

भारतीय जनता युवा मोर्चाचे राष्ट्रीय उपाध्यक्ष व माजी आमदार राम सातपुते यांच्या प्रमुख उपस्थितीत श्रीराम बंगला निवासस्थानी मतदारसंघातील बांगर्डे चव्हाणवाडी, डोंबाळवाडी (कु), फडतरी, निटवेवाडी, शिवारवस्ती, पिंपरी, पिलीव यासह अनेक गावातील सरपंच, ग्रा.पं. सदस्य, सोसायटी चेअरमन, संचालक, ज्येष्ठ नेते, तरुण कार्यकर्ते यांनी भाजपात जाहीर प्रवेश केला.



यावेळी भाजपचे वरिष्ठ नेते सोपानकाका नारनवर, बाळासाहेब वावरे, बबनबापू पालवे, शिवराज पुकळे नातेपुते मंडल अध्यक्ष संजय देशमुख, माळशिरस मंडल अध्यक्ष नितीन माळी मोहिते उपस्थित होते.

बांगर्डे चव्हाणवाडीचे सागर दडस, मोहन वाघमोडे, गांगर्डे, मोहन मेटकरी, विठ्ठल दडस, अशोक वाघमोडे, पांडुरंग दडस, तुषार वाघमोडे, समाधान वाघमोडे, सोमनाथ मेटकरी, रामदास मेटकरी, बिरदेव बुधावले, विशाल मेटकरी, बालाजी बोडरे, सुजित वाघमोडे, अमोल मदने, अमोल शिंदे, नितीन ढेकळे, अशोक ढेकळे, अमोल मेटकरी, सागर खिल्लारे, बबन मेटकरी, सागर देवकाते, महादेव मेटकरी, हनुमंत दडस, विठ्ठल दडस, ज्योतीराम दडस, हर्षदा हर्षदडस, बापूराव दडस, बापूराव खिलारे, माऊली खिलारे, सागर खिलारे, अजित केंगार, बबन मेटकरी, महावीर मदने यांनी तर डोंबाळवाडी(कु) गावातील धनंजय रुपनवर, किरण रुपनवर, ज्ञानदेव रुपनवर, हनुमंत रुपनवर, राजेंद्र रुपनवर, नितीन महारनवर, बाबा रुपनवर, हरिभाऊ माने, दशरथ केसकर, शुभम वायसे, माऊली डोंबाळे, आप्पा रुपनवर, निलेश महारनवर, गणेश रुपनवर, कुलदीप पवार, रोहित रुपनवर, नितीन रुपनवर, अमोल रुपनवर, महेश डोंबाळे यांनी तसेच मांडवे गावातील बबनबापू पालवे, अर्जुन दुधाळ अर्जुन गायकवाड, निलेश शिंदे, रामभाऊ सोनटक्के, नितीन मोरे, धनाजी पालवे, रणजीत कुंभार, सतीश कुंभार, संतोष कुंभार, दादा कुंभार, शामा कुंभार, प्रकाश कुंभार, राजकुमार सचिन कुंभार, विकास कुंभार, अंकुश कुंभार यांनी पक्ष प्रवेश केला. फडतरी गावातील बाबासो, रामचंद्र, वसंत, अभयसिंह, विश्वास, गणेश, बाळासो,रुपनवर, जनार्दन, योगेश, शिवशंकर व राहुल रुपनवर, दीपक व देविदास ननवरे, तुषार कोकडे, संपत रुपनवर तर पिंपरीतील हनुमंत, दत्ता, सदाशिव, निलेश, गणेश, सोमनाथ, जालिंदर, कुलदीप, समाधान, युवराज, ज्ञानेश्वर, सूर्या व सागर कर्चे, दत्तू बजबळकर,यांनी पक्ष प्रवेश केला.